अकोला । मंगळवार
दि. २० मे २०२५
वर्ष : १९ अंक : ७९
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये



एमएस धोनी सोशल मीडियावर ट्रोल
(पान ७ वर..)

# भारत धर्मशाळा वाटली काय? दुसऱ्या कोणत्यातरी देशात जा...!

## सुप्रीम कोर्टाची परखड टिप्पणी

नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था

**सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी निर्वासितांबाबत एक परखड टिप्पणी केली. भारत ही काही जगभरातील निर्वासितांना आश्रय देणारी धर्मशाळा नाही. आम्ही आधीच १४० कोटी लोकसंख्येशी संघर्ष करत आहोत. आम्ही कुठूनही येणाऱ्या निर्वासितांना आश्रय देऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.**



तुरुंगवासाची शिक्षा भोगल्यानंतर डिर्पोटेशनला आव्हान देणाऱ्या एका श्रीलंकेच्या नागरिकाने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीस नकार देताना ही टिप्पणी केली. भारत हा जगभरातील निर्वासितांना आश्रय कसा देईल? आम्ही आधीच १४० कोटी लोकसंख्येशी संघर्ष करत आहोत. भारत ही काही धर्मशाळा नाही; जिथे आम्ही सगळीकडून आलेल्या परदेशी नागरिकांना आश्रय देऊ शकतो, असे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. श्रीलंकेतील एका तमिळ नागरिकाने त्याच्या मायदेशी परतल्यास त्याच्या जीवाला धोका असल्याचे कारण देत डिर्पोटेशनला आव्हान दिले होते. दरम्यान, खंडपीठाने यावर असहमती दर्शवली आणि दुसऱ्या कोणत्यातरी देशात जावे, असे सुनावत त्याची याचिका फेटाळून लावली.

### प्रकरण काय?

बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायद्यांतर्गत दोषी ठरलेल्या सदर याचिकाकर्त्याला त्याने ७ वर्षांची शिक्षा भोगल्यानंतर त्याची त्याच्या देशात रवानगी करावी, असे निर्देश मद्रास उच्च न्यायालयाने दिले होते. याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. दरम्यान, आजच्या सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्याच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की, शिक्षा सुनावल्यानंतर कोणत्याही डिर्पोटेशनच्या प्रक्रियेविना तो जवळपास तीन वर्षे ताब्यात होता. श्रीलंकेतून व्हिसावर भारतात आलेल्या सदर याचिकाकर्त्याला श्रीलंकेला परत पाठवल्यास त्याच्या जीवाला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यावर न्यायमूर्ती दत्ता यांनी विचारणा केली, तुम्हाला येथे स्थायिक होण्याचा काय अधिकार आहे?. त्यावर वकिलांनी उत्तर दिले की, याचिकाकर्ता निर्वासित असून त्याची पत्नी आणि मुले आधीच भारतात स्थायिक झाली आहेत. न्यायमूर्ती दत्ता यांनी ही याचिका फेटाळून लावली. त्यांनी म्हटले की, कलम २१ चे उल्लंघन झालेले नाही. कारण त्याला ताब्यात घेण्याची कारवाई कायद्यानुसार झाली आहे. कलम १९ अंतर्गत भारतात स्थायिक होण्याचा मूलभूत अधिकार केवळ भारतीय नागरिकांनाच आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात

### सुवर्ण मंदिरावर हल्ल्याचा प्रयत्न!

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी छावण्यांवर हल्ला केला. त्यानंतर ८ मे रोजी पाकिस्तानने अमृतसरमधील सुवर्ण मंदिर आणि पंजाबमधील इतर शहरांना लक्ष्य करून क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले होते. पण भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने त्यांना उद्ध्वस्त केले. या संबंधीचा एक अहवाल समोर आला आहे.१५ व्या इन्फंट्री डिव्हिजनचे जनरल ऑफिसर कमांडिंग (जीओसी) मेजर जनरल कार्तिक सी. शेषाद्री यांनी आज बोलताना, लष्कराच्या हवाई संरक्षण दलाने सुवर्ण मंदिरावर लक्ष्य केलेले सर्व ड्रोन आणि क्षेपणास्त्रे पाडली आहेत असे म्हटले आहे.

### विजय शाहांना अटकेपासून दिलासा



**नवी दिल्ली :** कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावरील वादग्रस्त विधानावरून सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेशचे कॅबिनेट मंत्री विजय शाह यांना पुन्हा एकदा फटकारले आहे. तसेच या प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यास न्यायालयाने मान्यता दिली आहे.त्यामुळे आता विजय शाह यांच्या अडचणीत आता वाढ झाल्याचे दिसून येत आहे. सर्वोच्च न्यायालयाने आज सुनावणी दरम्यान विजय शहा यांची माफी नाकारली आहे. पण त्यांच्या तात्काळ अटकेलाही स्थगिती दिली आहे. यासोबतच या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या एसआयटीमध्ये तीन आयपीएस अधिकारी असतील, ज्यात एका महिला अधिकाऱ्याचा समावेश असेल असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

### संभल प्रकरणी न्यायालयाने पुनर्विचार याचिका फेटाळली

**अलाहाबाद :** उत्तर प्रदेशातील संभलमधील जामा मशीद सर्वेक्षण प्रकरणात अलाहाबाद उच्च न्यायालयाने मुस्लिम पक्षाला मोठा झटका दिला आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे, आता सर्वेक्षणाचा खटला संभलच्या जिल्हा न्यायालयात सुरू राहील हे स्पष्ट झाले आहे. न्यायमूर्ती रोहित रंजन अग्रवाल यांच्या एकल खंडपीठाने मुस्लिम बाजूचा युक्तिवाद फेटाळून लावत हा निर्णय दिला.१३ मे रोजी, मशीद समितीच्या दिवाणी पुनरीक्षण याचिकेवरील सुनावणी पूर्ण झाल्यानंतर, उच्च न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता.

# भारताच्या तपास संस्थांनी पकडले १२ हेर!

## उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाब राज्यांत पाकिस्तानी हेरांचे जाळे

हिसार, दि. १९ वृत्तसंस्था

भारतात हरियाणा आणि पंजाबसह एकूण तीन राज्यांत पाकिस्तानी हेरांचं जाळं पसरलेलं आहे. तीन राज्यांतून एकूण ११ दिवसांत भारताच्या तपास संस्थांनी एकूण १२ हेर पकडले आहेत. या सर्वच हेरगिरांच्या चौकशीतून आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे. दरम्यान, ज्योती मल्होत्राने लष्कर ए तैयबाचं अस्तित्त्व असलेल्या मुरिदके येथे जाऊन चक्क १४ दिवस हेरगिरीचं प्रशिक्षण घेतलं असल्याचं उघड झालं आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, देशातील गुप्तचर संस्था पूर्णपणे सतर्क झाली आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर ८ मे पासून सुरक्षा यंत्रणांनी १२ हेरांना अटक केली आहे. हे सर्वजण पाकिस्तानसोबत संवेदनशील माहिती शेअर करत असल्याचे सांगण्यात येत आहे. सुरक्षा एजन्सी पाकिस्तानशी संबंध असलेल्या आणखी अनेक लोकांचा शोध घेत आहेत. सर्वात अगोदर यामध्ये पंजाबमधून गजाला आणि यामीन मोहम्मद या दोन हेरांना पकडण्यात आले. या दोन्ही हेरांना पंजाबच्या मालेरकोटला पोलिसांनी अटक केली. या दोघांना अटक केल्यानंतर, नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयात काम करणारा दानिश त्यांना भेटत असे. तो पाकिस्तानचा व्हिसा मिळवण्यासाठी त्याच्याकडे जात असे. एवढेच नाही तर दानिशने त्याच्या मोबाईलवर ऑनलाइन पैसेही ट्रान्सफर केले आहेत. १४ मे रोजी पंजाब पोलिसांनी पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या नोमान इलाहीला अटक केली. नोमानची अजूनही चौकशी सुरू आहे. असा आरोप आहे की नोमान पाकिस्तानच्या काही एजंटांच्या संपर्कात आहे. तो त्यांना संवेदनशील माहिती पुरवत असे. नोमान हा कैराना गावचा रहिवासी आहे आणि सध्या तो पानिपतमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. हरियाणाच्या कैथल जिल्ह्यातून पाकिस्तानचा सहकारी देविंदरसिंग ढिल्लोन यालाही अटक करण्यात आली आहे. तपासात असे दिसून आले की त्याने भारताच्या लष्करी ऑपरेशन सिंदूर आणि लष्कराच्या कारवायांशी संबंधित माहिती पाकिस्तानला पुरवली होती. आरोपीने कबूल केले की तो कॉरिडॉरमधून पाकिस्तानमध्ये असलेल्या करतारपूर साहिब, ननकाना साहिब, लाहोर आणि पंजा साहिब यासारख्या धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी गेला होता. याच काळात तो पाकिस्तानी गुप्तचर संस्था (पान २ वर)



### यांच्यावर आहे हेरगिरीचा आरोप

ज्योती मल्होत्रा, गजाला, यामीन मोहम्मद, नोमान इलाही, देविंदरसिंग ढिल्लोन, अरमान, प्रियंका सेनापती, नवांकुर चौधरी, शहजाद, मोहम्मद मुर्तजा अली

# राज्यात अवकाळी पावसामुळे २३ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान

मुंबई, दि. १९ वृत्तसंस्था

राज्यात मागील १० दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. अवेळी पडणाऱ्या या पावसामुळे राज्यातील २३ जिल्ह्यांतील तब्बल २३ हजार ३३१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यामध्ये मुख्यतः भाजीपाला, फळ पिके आणि उन्हाळी हंगामातील पिकांचा समावेश आहे. या पावसाने शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षांवर पाणी फेरले असून शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवण्याची भीती निर्माण झाली आहे.

गेल्या दोन आठवड्यांपासून मराठवाडा, विदर्भ, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. विशेषतः विदर्भातील शेतकऱ्यांना अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. तेथील अनेक भागांत उभ्या पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. झाडांना लागलेली फळे गळून पडली असून इतर पिके आडवी झाली आहेत. कृषी विभागाने दिलेल्या (पान २ वर)



### जिल्हानिहाय बाधित क्षेत्र (हेक्टरमध्ये)

अमरावती- १०८८८; जळगाव - ४३९६; नाशिक - १७८७; जालना - १६९५; चंद्रपूर- १०३८; पालघर - ७९६; धुळे - ६४५; पुणे- ४८०; गडचिरोली- ४३२; वाशिम - २०३; परभणी - १८३; बुलढाणा - १८१; यवतमाळ - १७९; सोलापूर- १४३; गोंदिया - १४३; भंडारा- ७५; नंदुरबार- ५३; नागपूर - ४२; वर्धा- २३ रायगड - १७; अहिल्यानगर - १४; नांदेड - ७; ठाणे -१

# उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांसाठी एक पद, एक पेन्शन देण्याचा आदेश

नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था

उच्च न्यायालयांच्या निवृत्त न्यायाधीशांबाबत सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी एक दूरगामी निर्णय दिला आहे. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांनाही एक पद, एक पेन्शन योजनेच्या परिघात आणावे असा आदेश सरन्यायाधीश भूषण गवई, न्यायमूर्ती ए जी मसीह आणि के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला दिला.

उच्च न्यायालयांच्या संबंधित न्यायाधीशांच्या सुरुवातीच्या नियुक्तीचा स्रोत जिल्हा न्यायपालिकेतून किंवा वकिलांमधून, असा कोणताही असला तरी त्यांनाही दरवर्षी किमान १३.६५ लाख रुपये निवृत्तीवेतन देण्यात यावे. त्यांना पगारासोबत सेवानिवृत्तीवेळी मिळणारे फायदेही दिले पाहिजेत



असेही न्यायालयाने म्हटले आहे.

संविधानाच्या कलम १४ चा (समतेचा अधिकार) आधार घेऊन न्या. गवई यांच्या खंडपीठाने हे स्पष्ट केले की निवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती वकील म्हणून झालेली असो किंवा जिल्हा न्यायालयातून, सर्वांना समकक्ष निवृत्तीवेतन मिळाले पाहिजे. त्यांच्या कार्यकाळात केलेल्या योगदानावर आधारित भेदभाव केला जाऊ नये. जाणकारांच्या म्हणण्यानुसार सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय केवळ निवृत्त न्यायाधीशांच्या (पान २ वर)

# २०२६ अखेरपर्यंत शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज : मुख्यमंत्री

नागपूर, दि. १९ वृत्तसंस्था

राज्यात शेतकऱ्यांना दिवसाही विजेचा पुरवठा व्हावा, यासाठी केंद्र सरकारच्या कुसुम योजनेला आम्ही मुख्यमंत्री सौर कृषी योजनेची जोड दिली आहे. यातून १६ हजार मेगावॅट वीज निर्मितीचे काम आम्ही सुरु केले असून आजच्या घडीला यातील ४ हजार मॅगावॅटची निर्मिती पूर्णत्वास आली आहे. २०२६ च्या अखेरपर्यंत आम्ही दिवसाचे १२ तासही वीज देण्यासह राज्यात १२ महिने विजेची उपलब्धता करु, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



महाराष्ट्र शासन कृषी विभाग, भारतीय कृषी अनुसंधान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विकसित कृषी संकल्प अभियानअंतर्गत किसान संमेलनात ते बोलत होते. शेती व शेतकऱ्यांसाठी भारतीय कृषी अनुसंशाधन परिषदेअंतर्गत देशात १६ हजार वैज्ञानिक आहेत. त्यांचे विविध पिकांवर सतत संशोधन सुरु असते. याचबरोबर परिषदेअंतर्गत ११३ संशोधन केंद्र आहेत. यातील ११ केंद्र महाराष्ट्रात आहेत. याचा जोडीला जिल्हा कृषी केंद्र, प्रगतशील शेतकरी, राज्य सरकारचे कृषी कार्यालये आहेत. या सर्व यंत्रणेमध्ये एकसुत्रतेचा अभाव लक्षात घेऊन एक राष्ट्र - एक कृषी व एक टीम या संकल्पनेची नितांत गरज आहे, असे केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले. आमचे शेतकरी हे मेहनती आहेत. निसर्गाच्या प्रत्येक आव्हानाला ते धैर्याने तोंड देतात. आपल्या शेतातील उत्पादनासाठी घाम गाळतात. त्यांच्या घामाला, कष्टाला न्याय देण्यासाठी भारतातील कृषी क्षेत्रासाठी काम करणारे सर्व संशोधक, केंद्र सरकार, राज्य सरकार व सर्व संस्था एकत्र येऊन मिशन मोडवर काम करण्याची गरज आहे. एक महिना कृषी संशोधक, अधिकारी हे शेताच्या बांधावर जाऊन (पान २ वर)



# यूको बँकेच्या माजी अध्यक्षाला अटक; ६२१० कोटींचा घोटाळा

नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था

सक्तवसुली संचलनालयाने युको बँकेचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सुबोध कुमार गोयल यांना ६२१०.७२ कोटी रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणी अटक केली आहे.

ही फसवणूक कन्कास्ट स्टील अँड पॉवर लिमिटेड या कंपनीशी संबंधित आहे. गोयल यांना १६ मे रोजी त्यांच्या दिल्लीतील राहत्या घरातून अटक करण्यात आली. हा तपास मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायदा, २००२ अंतर्गत सुरू असून त्यात कन्कास्ट स्टील अँड पॉवर लिमिटेड आणि इतरांची चौकशी केली जात आहे. १७ मे रोजी गोयल यांना कोलकाता येथील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले आणि न्यायालयाने त्यांना २१ मेपर्यंत सक्तवसुली संचलनालयाच्या कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या प्रकरणात कन्कास्ट (पान २ वर)

# पाकिस्तानात १ कोटी १० लाख नागरिक उपासमारीच्या उंबरठ्यावर!

## संयुक्त राष्ट्राने दिला गंभीर इशारा

इस्लामाबाद, दि. १९ वृत्तसंस्था

**दहशतवादाने पोखरलेल्या पाकिस्तानला जागतिक व्यासपीठावर भारताशी तुलना करण्याची खूप सवय आहे. तथापि, संयुक्त राष्ट्राच्या एका अहवालातून पाकिस्तानची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. पाकिस्तानातील १.१ कोटी नागरीक तीव्र भुकेच्या समस्येला तोंड देत आहेत, त्यापैकी अनेक जण उपासमारीच्या थेट उंबरठ्यावर आहेत. त्यावरून संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानला गंभीर इशाराही दिला आहे.**



पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्यासमोर पाकिस्तानचे हे गंभीर सत्य संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालाद्वारे उघड झाले आहे. दरम्यान, भारताने मात्र जागतिक अन्न संकटाच्या काळात अन्न पुरवठादार म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. हा धक्कादायक अहवाल 'ग्लोबल रिपोर्ट ऑन फूड क्रायसिस २०२५' मध्ये नमूद करण्यात आला आहे, जो १६ मे रोजी संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेने प्रसिद्ध केला. विशेषतः बलुचिस्तान, सिंध आणि खैबर पख्तूनख्वा या संघर्षग्रस्त आणि गरीब भागांमध्ये अन्नटंचाईची परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे. या अहवालानुसार, सुमारे १.१ कोटी लोक अन्न असुरक्षिततेचा सामना करत असून, त्यापैकी सुमारे १७ लाख लोक अन्न व कृषी संघटनेच्या निकषानुसार आपत्कालीन परिस्थितीत आहेत जे दुष्काळ किंवा उपासमारीच्या थेट आधीचे टप्पे मानले जातात. २०२४ च्या तुलनेत या वर्षी अन्नटंचाईने ग्रासलेल्या लोकसंख्येत ३८ टक्के वाढ झाली आहे, यावरून पाकिस्तानमधील अन्नसंकट केवळ टिकून नाही, तर अधिक भीषण होत चालले आहे. या संकटाचे मूळ पाकिस्तानातील ६८ ग्रामीण जिल्ह्यांत आहे, जे अनेक वर्षांच्या राजकीय दुर्लक्षामुळे, अत्यधिक (पान २ वर)

### २१ लाखांवर बालकांचा तीव्र कुपोषणाशी सामना

राज्य यंत्रणेच्या अपयशाचे ठोस उदाहरण म्हणून अहवालात नमूद केले आहे, की मार्च २०२३ ते जानेवारी २०२४ दरम्यान, २१ लाखांहून अधिक पाकिस्तानी बालकांना तीव्र कुपोषणाचा सामना करावा लागला. सिंध, खैबर पख्तूनख्वा आणि बलुचिस्तान या भागांमध्ये ढासळलेली आरोग्य सुविधा आणि दुर्गम रस्त्यांमुळे ही समस्या आणखीनच बिकट झाली आहे. अन्न व कृषी संघटनेच्या या निष्कर्षांमुळे पाकिस्तानच्या नेतृत्वावर प्रचंड दबाव वाढला आहे, विशेषतः अशा काळात जेव्हा पंतप्रधान शरीफ पाकिस्तानला भारताच्या समकक्ष म्हणून सादर करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारत जगभर अन्नधान्याची निर्यात करत असताना, पाकिस्तानमधील अंतर्गत अस्थिरता पाहता, कदाचित त्याला अन्नधान्य आयात करावी लागू शकेल.

# मोहिनी दत्ता यांना मिळणार रतन टाटा यांच्या संपत्तीतील ५८८ कोटींचा वाटा!



मुंबई, दि. १९ वृत्तसंस्था

मुंबई उच्च न्यायालयात रतन टाटांच्या ₹३,९०० कोटींच्या संपत्तीच्या वसीयताच्या कायदेशीर मान्यतेसाठी (प्रोबेट) अखेरचा अडथळा दूर झाला आहे.

टाटा समूहाच्या ताज हॉटेल्समध्ये माजी संचालक असलेल्या व रतन टाटांचे अनेक वर्षांचे निकटवर्तीय मोहिनी मोहन दत्ता यांनी रतन टाटा यांच्या मृत्यूपत्रातील अटी मान्य केल्या आहेत. टाटांच्या मृत्यूपत्रानुसार मोहिनी दत्ता यांच्या टाटांच्या उरलेल्या संपत्तीपैकी एक-तृतीयांश हिस्सा म्हणजेच सुमारे ₹५८८ कोटी मिळणार आहेत. रतन टाटा आणि मोहिनी दत्तांमधील संबंध तब्बल ६० वर्षांचा आहे. १३ वर्षांचे असताना जमशेदपूरच्या डीलर्स हॉस्टेलमध्ये दत्तांची टाटांशी पहिली भेट झाली होती. टाटा त्यावेळी २५ वर्षांचे होते. त्यानंतर दत्ता मुंबईत आले आणि कोलाबातील बख्तावर निवासस्थानी टाटांसोबत राहिले. दत्तांनी ताज ट्रॅव्हल (पान २ वर)

### उर्वरीत वाटा रतन टाटांच्या बहिणींना

रतन टाटांच्या उरलेल्या दोन-तृतीयांश संपत्तीचा वाटा त्यांच्या सावत्र बहिणींना- शिरीन जेजीभॉय (वय ७२) आणि डिआना जेजीभॉय (वय ७०) यांना देण्यात आला आहे. या दोघी मृत्यूपत्राच्या कार्यवाहक म्हणूनही कार्यरत आहेत. दत्ता हे टाटा कुटुंबाबाहेरचे एकमेव लाभार्थी होते ज्यांना इतका मोठा वाटा मिळाला. त्यांनी काही मौल्यवान वस्तू जसे की गणेश मूर्ती बघण्याची मागणी केली होती, पण त्यांना टाटांचे हालेकाई निवासस्थान, कोलाबा येथे प्रवेश नाकारण्यात आला होता. या सर्व वस्तू सध्या कार्यवाहकांच्या ताब्यात आहेत. न्यायालय मृत्यूपत्रास प्रोबेट मंजूर केल्यानंतर, मोहिनी दत्तांना कोणताही वारसा कर लागणार नाही, कारण भारतात वारसावर कर लावला जात नाही.

# पान 1 वरून...

## भारताच्या तपास संस्थांनी ...

आयएसआयच्या संपर्कात आला. पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली हरियाणाच्या हिसार पोलिसांनी युट्यूबर ज्योती मल्होत्राला अटक केली आहे. ज्योती पाकिस्तान उच्चायुक्तालयात काम करणाऱ्या दानिश नावाच्या अधिकाऱ्याच्या संपर्कात होती, ज्याला भारत सरकारने १३ मे रोजी देश सोडण्यास सांगितले होते. ट्रॅव्हल ब्लॉगर ज्योती पाकिस्तानला गुप्त माहिती शेअर करत होती. २०२३ मध्ये तिने पहिल्यांदाच पाकिस्तानला भेट दिली. २०२३ पासून तिने तीनदा पाकिस्तानला भेट दिली आहे. ज्योतीने तिच्या इंस्टाग्रामवर पाकिस्तानशी संबंधित अनेक व्हिडिओ देखील शेअर केले आहेत. तिची दानिशशी पाकिस्तानात भेट झाली, त्यानंतर ती सतत दानिशच्या संपर्कात होती. ज्योतीची पाच दिवसांच्या रिमांडवर चौकशी सुरू आहे. ज्योती सतत पाकिस्तानी एजंटांच्या संपर्कात होती.

**ज्योतीने दिली कबुली!**

एनआयए तसेच मिलिटरी इन्टेलिजन्स ज्योती मल्होत्राची चौकशी करणार आहे. मुरिदके इथं दहशतवादी हाफीज सईद याच्या लष्कर ए तैयबा दहशतवादी संघटनेचं मुख्यालय आहे. ज्योती मल्होत्रा हिने याच ठिकाणी एकूण १४ दिवस होती. या काळात तिने हेरगिरीचं प्रशिक्षण घेतल्याचं म्हटलं जातं. हिसार पोलिसांनी केलेल्या चौकशीत ज्योतीने याची कबुलीही दिली आहे.

## राज्यात अवकाळी पावसामुळे ...

माहितीनुसार, ६ ते १६ मे या कालावधीत राज्यभरात झालेल्या अवकाळी पावसामुळे पपई, केळी, आंबा, डाळिंब, चिकू, लिंबू, संत्रा अशा फळपिकांबरोबरच कांदा, भाजीपाला, बाजरी, मका आणि उन्हाळी भात अशा पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका अमरावती जिल्ह्याला बसला आहे. अचलपूर, भातकुली, चांदूरबाजार आणि चिखलदरा या तालुक्यांमध्ये तब्बल १० हजार ८८८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.

गेले दहा दिवस उत्तर महाराष्ट्रात अवकाळी पावसाचे धुमशान सुरू होते. या पावसाने आतापर्यंत १२ जणांचा बळी घेतला आहे. त्यापैकी सात जणांचा मृत्यू वीज पडून झाल्याची माहिती प्रशासनातील सूत्रांनी दिली. १२ पैकी सर्वाधिक पाच बळी नाशिक जिल्ह्यात झाले आहेत.पाच जिल्ह्यांत एकूण १२ जणांनी या पावसामुळे जीव गमावला आहे. ज्यापैकी सात जणांचा मृत्यू वीज अंगावर पडून झाला आहे. झाड अंगावर पडणे, घराचे छत अंगावर पडणे, पावसामुळे विद्युत तारेचा शॉक लागणे अशा कारणांमुळे काही जणांचा मृत्यू झाला. नाशिक आणि नंदुरबारमध्ये प्रत्येकी दोन जणांचा वीज अंगावर पडून मृत्यू झाला.

## उच्च न्यायालयाच्या निवृत्त ....

सन्मानासाठी नव्हे, तर न्यायपालिका स्वायत्ततेचा आणि न्यायदानाच्या साखळीतील प्रत्येक व्यक्तीच्या योगदानाचा सन्मान करणारा आहे. हा निर्णय भविष्यातील न्यायाधीशांना देखील सेवानिवृत्तीनंतर आर्थिक स्थैर्य आणि सन्मानित जीवन जगण्याचा हक्क मिळवून देणारा ठरणार असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. या निकालाचे अन्य ठळक पैलू असे -निवृत्त न्यायाधीशांच्या दरम्यान भेदभाव करणे म्हणजे समतेच्या तत्त्वांचे उल्लंघन ठरेल, न्यायालयाच्या स्वातंत्र्यासाठी केवळ पगार नव्हे तर निवृत्ती लाभ देखील महत्त्वाचे आहेत.सेवेत असताना उच्च न्यायालयाच्या एखाद्या न्यायाधीशांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना कुटुंब निवृत्तीवेतनाचा लाभ मिळेल. त्यांना ग्रॅच्युइटी देखील लागू होईल. ''उच्च न्यायालय न्यायाधीश (पगार व सेवाशर्ती) कायदा १९५४'' अंतर्गतरजा रोख रक्कम, पेन्शनचे रूपांतर, भविष्यनिर्वाह निधी आदी सर्व लाभ संबंधित निवृत्त न्यायमूर्तींना लागू होतील.

## २०२६ अखेरपर्यंत शेतकऱ्यांना ...

शेतकऱ्यांसोबत काम करतील , असे केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी स्पष्ट केले. विदर्भ आणि मराठवाड्यातील पाणीप्रश्न मार्गी लागावा, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना सावरता यावे यादृष्टीने देशातील सर्वात मोठा नदीजोड प्रकल्प म्हणून ज्याकडे पाहिले जात आहे. त्या नळगंगा-वैनगंगा या प्रकल्पाचे काम यावर्षी सुरु करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील कृषी क्षेत्राला सावरण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवन योजना आपण जागतिक बँकेशी चर्चा करुन सुरु केली. सुरुवातीला आपण ५ हजार गावे यासाठी निवडले. आता त्यांच्या सहयोगातून राज्यातील सुमारे ७ हजार ५०० गावात एकात्मिक पद्धतीने काम करुन कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तापी मेगा रिचार्ज हा जगातील आश्चर्य असणाऱ्या प्रकल्पाचे काम आपण हाती घेतले आहे. समुद्राला वाहून जाणारे सुमारे ३५ टीएमसी पाणी या प्रकल्पातून आपण आणणार आहोत. बुलडाणा, अकोला, अमरावती या जिल्ह्यातील खारपाणपट्टा क्षेत्राला याचा लाभ होणार आहे.

## पाकिस्तानात १ कोटी १० ...

हवामान, पूर, आणि दारिद्र्यामुळे ढवळून निघाले आहेत. महापूरानंतर या भागांतील जवळपास २२ टक्के लोकसंख्या उपासमारीच्या कड्यावर उभी आहे. बलुचिस्तान आणि सिंधमधील अनेक भागांत, जिथे स्वायत्ततेच्या किंवा स्वातंत्र्याच्या मागण्या सतत सुरू आहेत, तेथे कुपोषण ही एक 'मूक महामारी' बनली आहे. २०१८ ते २०२४ या कालावधीत काही जिल्ह्यांमध्ये 'ग्लोबल ॲक्युट मॅलन्यूट्रिशन ' दर ३० टक्क्यांपेक्षा अधिक होता जो जागतिक आरोग्य निकषांनुसार अत्यंत धोकादायक मानला जातो. 'सामान्य' परिस्थितीतही १० टक्के पेक्षा जास्त 'ग्लोबल ॲक्युट मॅलन्यूट्रिशन ' दर सार्वजनिक आरोग्य आणीबाणी सूचित करतो. गेल्या वर्षीच्या तुलनेत काही किरकोळ सुधारणा झाली असली, तरी संपूर्ण परिस्थिती अजूनही अत्यंत चिंताजनक आहे. हवामान बदलामुळे वाढलेली हवामानातील अनिश्चितता शेती, उत्पन्न, आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर गंभीर परिणाम करत आहे.

## मोहिनी दत्ता यांना मिळणार रतन ...

डेस्कपासून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली आणि १९८६ मध्ये टाटा इंडस्ट्रीजच्या मदतीने स्टॅलियन ट्रॅव्हल सर्व्हिसेस सुरू केली. २००६ मध्ये हे व्यवसाय ताज हॉटेल्सच्या उपकंपनीमध्ये विलीन झाले व तेथून दत्ता इंडिट्रॅव्हल या नव्याने स्थापन झालेल्या कंपनीचे संचालक झाले. २०१५ मध्ये हा व्यवसाय टाटा कॅपिटलकडे गेला आणि २०१७ मध्ये थॉमस कुक इंडिया ने विकत घेतला. दत्ता २०१९ पर्यंत संचालक म्हणून कार्यरत होते. मोहिनी दत्तांच्या सहमतीनंतर, टाटांच्या मृत्यूपत्राचे कार्यवाहक न्यायालयात मृत्यूपत्राला कायदेशीर मान्यता मिळवण्यासाठी (प्रोबेट)ची प्रक्रिया पुढे नेऊ शकतात. ७७ वर्षांचे दत्ता हे एकमेव लाभार्थी होते ज्यांनी त्यांच्या वाट्याच्या किंमतीबाबत आक्षेप नोंदवला होता.

## यूको बँकेच्या माजी अध्यक्षाला ...

स्टील अँड पॉवर लिमिटेडला मंजूर करण्यात आलेल्या क्रेडिट सुविधांचा गैरवापर होऊन सुमारे ६२१०.७२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे आढळले आहे. ही रक्कम केवळ मूळ रक्कम असून त्यात व्याजाचा समावेश नाही. गोयल यांच्या कार्यकाळात कन्कास्ट स्टील अँड पॉवर लिमिटेडला मोठ्या प्रमाणात कर्ज सुविधा मंजूर करण्यात आल्या होत्या आणि नंतर संबंधित गटाने त्या रकमा वळवून गैरवापर केला. याच्या मोबदल्यात, गोयल यांनी कन्कास्ट स्टील अँड पॉवर लिमिटेड कडून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर फायदे मिळवले, असे उघड झाले आहे. या बेकायदेशीर फायद्यांचे स्वरूप रोख रक्कम, मालमत्ता, महागड्या वस्तू, हॉटेल बुकिंग्स अशा विविध प्रकारात होते. हे फायदे शेल कंपन्या, बनावट व्यक्ती आणि कुटुंबीयांच्या नावावरून दिले गेले होते जेणेकरून पैशाचा मूळ स्रोत लपवता येईल. या कंपन्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सुबोध गोयल आणि त्यांच्या कुटुंबियांच्या ताब्यात होत्या. या शेल कंपन्यांना मिळालेले निधी हे थेट कन्कास्ट स्टील अँड पॉवर लिमिटेडकडून आले असल्याचे समोर आले आहे.

# 'अमृत भारत' योजनेअंतर्गत मूर्तिजापूर स्थानकात प्रवासी सुविधावृद्धी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. १९ :** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील मुर्तिजापूर स्थानकाचा 'अमृत भारत' स्टेशन योजना अंतर्गत अमृत भारत' योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरते.मूर्तिजापूर रेल्वे स्थानकात सर्व अद्ययावत सुविधां उपलब्ध करून दिल्याने मुर्तिजापूर रेल्वेस्थानक अधिक आकर्षक, सुरक्षित व प्रवाशीकेंद्रित झाले असून स्थानिक प्रवाशांसाठी अद्यावत सोई उपलब्ध झाल्या आहेत.

प्रवाशांच्या सोयीसाठी, सौंदर्यीकरण व सुरक्षिततेच्या दृष्टीने स्थानकाच्या पुनर्विकासाची पायाभरणी सन २०२३ मध्ये करण्यात आली होती. प्रवाशांच्या सुविधा वाढविण्याच्या दृष्टीने नवीन आरक्षण व तिकिट बुकिंग कार्यालयाची इमारत उभारण्यात आली आहे. प्रवाशांच्या सुलभ हालचालीसाठी दोन स्वतंत्र प्रवेश व निर्गमनद्वार उपलब्ध करून देण्यात आले आहेत. प्लॅटफॉर्मवर सुलभ प्रवेशासाठी तीन लिफ्ट बसवण्यात आल्या आहेत. १,६०० चौ. मी. क्षेत्रफळामध्ये सर्क्युलेटिंग एरिया व वाहनतळ विकसित करण्यात आले आहे. प्लॅटफॉर्म क्र. १ वर ५ पिण्याच्या पाण्याचे स्टँड बसवण्यात आले आहेत. प्लॅटफॉर्म क्र. १ व २ वर प्रत्येकी एक नवीन स्वच्छतागृह उभारण्यात आले आहे.

प्लॅटफॉर्म १ वर १,९०० चौ.मी.शेड्स , प्लॅटफॉर्म २ २,१०० चौ.मी.शेड्स उभारण्यात आले आहेत. प्लॅटफॉर्म १ ४,००० चौ.मी., प्लॅटफॉर्म २ ५,५०० चौ.मी. विस्तार करण्यात आला आहे. प्लॅटफॉर्म क्र. १ वरील १० कार्यालयांचे नूतनीकरण करण्यात आले असून त्यात व्हीआयपी कक्ष, स्टेशन मास्टर कार्यालय, ओएस कार्यालय, पुरुष व महिला प्रतीक्षालय, दूरसंचार व सिग्नल/टेलिकॉम कक्ष (२ खोली) यांचा समावेश आहे. प्लॅटफॉर्म क्र. २ वरील २ प्रतीक्षालये (पुरुष व महिला) यांचेही नूतनीकरण करण्यात आले आहे. तसेच हाय मास्ट लाइटिंग व स्टेडियम मास्ट लाइटिंग यंत्रणा उभारण्यात आली आहे. राष्ट्रध्वजासाठी फ्लॅग मस्त बसवण्यात आला आहे. नवीन विद्युत सबस्टेशन इमारत उभारण्यात आली असून त्यामुळे वीजपुरवठा अधिक विश्वासार्ह झाला आहे. रेल्वे स्थानकाच्या सुरक्षेसाठी २५० मीटर लांबीची कंपाऊंड वॉल उभारण्यात आली आहे. ह्या सर्व सुविधा अमृत भारत' योजनेअंतर्गत मुर्तिजापूर स्थानकात करण्यात आल्या असून प्रवासी सुविधावृद्धी झाल्याने प्रवाशी समाधान व्यक्त करीत आहेत.

## जवाहर नवोदय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सुयश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १९ :** पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दहावी व बारावीच्या परीक्षेत संपूर्ण उत्तीर्ण (१०० टक्के) निकालाची परंपरा कायम ठेवत भरघोस गुणही प्राप्त केले आहेत.दहावीच्या परीक्षेत आयुष्य रेखाते (९८ टक्के), आनंद पाटील (९७.२० टक्के), सार्थक काकड (९७ टक्के), बारावी विज्ञानमध्ये शुभम वडतकर (९३ टक्के), गौरी राऊत (९०.४० टक्के), अनुराग गणोरकर (८९ टक्के), बारावी वाणिज्यमध्ये रजनी चालाख (९४.२० टक्के), दिशा शेवाळे (९२.४० टक्के), प्रतीक्षा तांगडे (९१.४० टक्के) हे गुणवंत ठरले आहेत. प्राचार्य आर. एस. चंदनशिव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अकोल्यात नि:शुल्क उन्हाळी कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १९ :** क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, अकोला जिल्हा क्रीडा कार्यालय, अकोला जिल्हा ॲम्येचर कराटे असोसिएशन आणि स्ट्राग सोतोकान ऑर्गनायजेशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने अकोल्यात एक विशेष नि:शुल्क ग्रीष्मकालीन कराटे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. उन्हाळी सुट्टीचा लाभ घेत विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण करण्यासाठी आणि त्यांचे शारीरिक-मानसिक आरोग्य सशक्त करण्याच्या उद्देशाने हे शिबिर घेण्यात येणार आहे.

शिबिर दिनांक २५ मे ते ३१ मे २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आले असून, दररोज सायंकाळी ६ ते ७ या वेळेत प्रशिक्षण दिले जाईल. शिबिराचे ठिकाण स्थानिक शारदा समाज मंदिर, मराठा नगर, रामदास पेठ, अकोला येथे निश्चित करण्यात आले आहे.

शिबिरामध्ये कराटेचे प्राथमिक व प्रगत तंत्र शिकवले जाणार असून विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाची तसेच आत्मविश्वास वाढवणारी मूल्ये दिली जातील. प्रशिक्षणासाठी अनुभवी प्रशिक्षक सिहान अरुण सारवान आणि सेन्साई डॉ. खुशबू चोपडे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच इच्छुक खेळाडूंनी किंवा विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी थेट डॉ. सेन्साई खुशबू चोपडे, सिहान अरुण सारवान किंवा अकोला जिल्हा क्रीडा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.अशा प्रकारचे शिबिरे विद्यार्थ्यांना शिस्त, आत्मसंयम व आत्मरक्षणाचे धडे देतात. त्यामुळे अकोल्यातील पालक व विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## अनुसुचित जाती मुलींच्या निवासी शाळेत प्रवेश सुरू

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १९** सामाजिक न्याय विभागाच्या गोरेगाव खुर्द येथील अनुसुचित जाती मुलींच्या शासकीय निवासी शाळेत शैक्षणिक सत्र २०२५ -२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.या शाळेत वर्ग सहावीकरिता नवीन प्रवेश व वर्ग ७ वी ते वर्ग १० वीपर्यंतच्या काही मोजक्याच रिक्त जागांवरील प्रवेशाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. अनु. जाती व नवबौध्दासाठी ८० टक्के, अनु.जमाती १० टक्के , विजाभज ५ टक्के, दिव्यांगासाठी ३ टक्के व एस.बी.सी. २ टक्के याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल. इच्छूकांनी शाळेत संपर्क साधावा.

## लेट दिवाली बेन सेदानी इंग्लिश स्कूलची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**आकोट, दि. १९ :** येथील लेट दिवाली बेन सेदानी इंग्लिश स्कूल ने दहावी च्या उत्कृष्ट निकालाची परंपरा यावर्षी सुद्धा कायम ठेवली आहे.

स्कूल मधील पियुष कोकाटे या विद्यार्थ्याने ९७.२०% गुण मिळवून तालुक्यातून प्रथम आला आहे तर कु. शर्वरी सावरकर हिने ९७.०० टक्के गुण मिळवून तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. पियुष कोकाटे हा दुर्गम भागात राहत असून कुठल्याही खाजगी शिकवणी वर्ग न लावता त्याने उत्कृष्ट यश संपादन केले आहे. स्कूल मधील श्रावणी आवंडकार ९६.२०, कुलदीप ताडे ९३.६०, पूनम केदार ९३.६० परी घोरड, ९१.६० शिझा हयात ९१.२०, ऋतुजा माकोडे ९०.८०, आचल चिरडे ९०.८०, तनुश्री चांदुरकर ९०.०० एवढे गुण घेऊन सदर विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेशभाई सेदानी, अध्यक्ष स्मिता सेदानी, प्राचार्य विजय भागवतकर, मुख्याध्यापक प्रशांत मगळे, शिक्षक काकडे,कहार, जवंजाळ, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## 'एल्डर लाईन' १४५६७ ज्येष्ठांसाठी मदतीचा आधार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १९ :** ''घरात आम्ही दोघं एकटेच, मुलगा परदेशात आहे'', ''नातेवाइकांनी आमचं घर बळकावलंय'', ''कुटुंबात कुणाशी बोलणंच होत नाही'' अशा असंख्य व्यथा, वेदना, तक्रारी महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिक ''एल्डर लाईन'' हेल्पलाइनवर मोकळेपणाने मांडत आहेत. ज्येष्ठांना मदतीसाठी १४५६७ ही एल्डर हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. गरजूंनी त्याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्था आणि राज्य सरकारच्या सहकार्याने ही सेवा देशभरातील सर्व राज्यात आणि केंद्रशासीत प्रदेशात वयोवृद्धांसाठी सुरू करण्यात आली आहे. जनसेवा फाउंडेशन, पुणे यांच्यामार्फत ही सेवा महाराष्ट्रात राबवली जाते. ''मानवसेवा हीच ईश्वर सेवा'' हे ब्रीद वाक्य घेऊन संस्थापक अध्यक्ष डॉ. विनोद शहा यांच्या मार्गदर्शनाखाली जनसेवा फौन्डेशन पुणे गेली ३७ वर्षापासून सातत्याने आपल्या विविध प्रकल्पाद्वारे गरीब, आजारी, वृद्ध, अपंग, निराधार, गरीब मुले मुली आणि महिला यांची सेवा करीत आहेत.

**हेल्पलाइनद्वारे मिळणाऱ्या मोफत प्रमुख सेवा**

**माहिती:** आरोग्य, पोषण, निवारा, आश्रयगृह व वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, याबाबत माहिती.

**मार्गदर्शन:** कायदेविषयक, मालमत्ता व कौटुंबिक वादांमध्ये मोफत कायदेशीर सल्ला, पेन्शन योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम २००७.

**भावनिक आधार** मानसिक आजार व चिंता, ताण, राग इत्यादी व्यवस्थापन.

बेघर व अत्याचारग्रस्त वृद्धांसाठी मदत आणि पुनर्वसन, कुटुंबीयांशी संवाद, पुनर्स्थापनेसाठी प्रयत्न, पोलिस प्रशासनाशी समन्वय, समुपदेशन.

## धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातूर, दि. १९ :** धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांचा जन्मोत्सव पातूर शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवून अतिशय उत्साहाने साजरा करण्यात आला.

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान च्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गुरूदेव सेवा आश्रम येथे प्रा.विलास राऊत,हिम्मतराव डिगोळे,शरद निखाडे,गजानन गि-हे, काळपांडे गुरूजी, सुधाकर उगले,डॉ. शिवकुमारसिंह बायस,धारकरी विजय राऊत,दिलीप खाकरे या मान्यवरांनी धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले.

छत्रपती श्री संभाजी महाराज चौकातही प्रतिष्ठानच्या वतीने मान्यवरांच्या शुभहस्ते त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले याप्रसंगी धारकरी विजय राऊत यांनी उपस्थित शंभू प्रेमींकडून प्रेरणा मंत्र,ध्येय मंत्र म्हणवून घेत लोक जागरण केले.गायक प्रल्हाद गवई, रवी मेसरे आणी सुर्यकांत जोशी यांनी त्यांच्या सुरेल वाणीतून देशभक्ती पर गिते सादर करत सम्पूर्ण वातावरण देशभक्तीमय केले तसेच बाल कलाकार शिवश्री वेदांस देशमुख यांनी संभाजी महाराज यांच्यावर खुप चांगली गित सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

प्रतिष्ठिनच्या माध्यमातून शहरातील नलिनीताई आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या रूग्णालयात उपचार घेत असलेल्या रूग्णांना फळे, बिस्कीट वाटप करण्यात आली तसेच पालीमध्ये स्वाभिमानाने आपले सामान्य जीवन जगणाऱ्या गोरगरीब कुटूंबांना बिस्किटे व फळांचे वाटप करण्यात आले.

नुकतेच जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त झालेल्या सौ.पल्लवी राखोंडे,सागर पडघन आणी श्याम उगले यांना यावेळी शाळ श्रीफळ आणी पुष्पहार देऊन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान च्या वतीने सन्मानित करण्यात आले.

## किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलचा शंभर टक्के निकाल

### हर्षल वानखडे प्रथम तर श्रुती तायडे दुसरी व तृतीय क्रमांक सिद्धांत वानखडे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**पातूर, दि. १९ :** येथिल किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून हर्षल वानखडे याने ९२.२० टक्के घेऊन शाळेतून प्रथम तर श्रुती तायडे हिने ८९ टक्के मिळवून द्वितीय व सिद्धांत वानखडे याने ८८ टक्के मिळवून तिसरा येण्याचा बहुमान मिळवला आहे. गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे व कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे, शिक्षक नरेंद्र बोरकर, हरिष सौंदळे प्रामुख्याने उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षेत किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. यामध्ये हर्षल वानखडे ९२.२०टक्के, श्रुती तायडे ८९टक्के, सिद्धांत वानखडे ८८टक्के पूर्व बंड ८६टक्के, अश्विन निमकंडे ८४.६०टक्के, हरीश घुगे ८३.६०टक्के चक्रधर भगत ८३.२०टक्के कल्याणी हिरळकार ८३टक्के समृद्धी ढाकोलकर ८२.२०टक्के, प्रेरणा कांबळे ८१.४०टक्के, आस्था राऊत ८० .४०टक्के, अनुष्का घुगे ७९.८०टक्के, यश गवई ७८.२०टक्के, विधी बंड ७७.८०टक्के, सय्यद शाहिद ७७.६०टक्के, वेदांत ढाकोलकर ७७.२०टक्के, शिवम गिऱ्हे ७६.४०टक्के, आदित्य माळी ७६.४०टक्के, कुंजल राठोड ७४टक्के, मोहंमद माज ७३.८०टक्के, अनिकेत घुगे ७३.२०टक्के, मोहम्मद मोजेबा ६९.८० टक्के, प्रफुल फुलारी ६८.४० टक्के, मोहम्मद आयशा ६२ टक्के आदी विद्यार्थ्यांनी गुण मिळवून यश संपादन केले.

# २२ मे पासून अकोला नगरीत नि:शुल्क नाट्य प्रशिक्षण शिबिर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १९ :** उन्हाळी सुट्ट्यांचा वेळ सार्थकी लावण्यासाठी अकोला नगरीत २२ मे ते ३१ मे २०२५ या कालावधीत निशुल्क नाट्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. वय वर्षे १४ च्या वरील वयोगटातील विद्यार्थ्यांना या शिबिरात भाग घेता येईल. आर. डी. जी. इन्स्टिट्यूट ऑफ फिल्म टेलिव्हिजन अँड ड्रामा टिक तसेच सिद्धी गणेश प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे

रंगभूमीचे जतन व संवर्धन करून नवीन कलाकार निर्माण व्हावेत व त्यांना योग्य मार्गदर्शनासह व्यासपीठ मिळावे या हेतूने सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय सेवा सदनाचे संचालक दिलीपराज गोयनका यांच्या संकल्पनेतून आर. डी. जी. महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. चारुशीला रुमाले यांच्या मार्गदर्शनात सिद्धी गणेश प्रोडक्शन चे संचालक सचिन गिरी यांच्या नियोजनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे नाट्य व सिने सृष्टीतील अनेक दिग्गज या शिबिरात मार्गदर्शन करणार आहेत हे विशेष. सदर शिबिराचे उद्घाटन दिनांक २२ मे रोजी सकाळी दहा वाजता आर. डी. जी. महिला महाविद्यालयात करण्यात येईल. याप्रसंगी उद्घाटक व प्रमुख अतिथी म्हणून अकोला जिल्हा नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड चे अध्यक्ष तथा अ. भा. लोक स्वतंत्र पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रदीप खाडे व जेष्ठ नाट्यकर्मी तसेच रंगभूमी प्रयोग परीक्षण मंडळाचे सदस्य रमेश थोरात हे उपस्थित राहतील. या नाट्य प्रशिक्षण शिबिरामध्ये मार्गदर्शक म्हणून नाट्य क्षेत्रातील व नाट्य प्रशिक्षणासाठी संपूर्ण महाराष्ट्रात सुपरिचित असलेले देवदत्त पाठक आणि त्यांचे सहकारी मिलिंद केळकर यांच्यासह सी. आय. डी., क्राइम पेट्रोल, कुछ ना कहो आदी प्रख्यात टीव्ही सिरीयल मध्ये काम करणाऱ्या किरण ठाकरे पावसकर या प्रामुख्याने मार्गदर्शन करणार आहेत. आपल्या आगळ्यावेगळ्या पद्धतीमुळे संपूर्ण भारतभर प्रख्यात असलेले नाट्य प्रशिक्षक व सीने दिग्दर्शक हरीश इथापे तसेच आदिपुरुष, औरो मे दम कहा था, मोगरा फुलला, काली व्हिडिओ पार्लर, स्पेशल फाईव्ह आधी चित्रपट व वेब सिरीज मध्ये काम करणारे सौरभ ठाकरे हे सुद्धा प्रामुख्याने उपस्थित राहून शिविरार्थीना मार्गदर्शन करणार आहेत.कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क नसलेल्या व आर. डी. जी. महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या या शिबिरात प्रवेश घेण्यासाठी सदर महाविद्यालयात सचिन गिरी यांच्याशी संपर्क साधावा तसेच या शिबिराचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन सिद्धी गणेश प्रोडक्शन चे संचालक सचिन गिरी, गीता जोशी, विष्णू क्षीरसागर, अश्विनी ठाकरे, मोनिका अनासने, महेश इंगळे, रोशन समदुरे, प्रमोद वानखडे, स्वराज पाटोळे, अक्षय पिंपळकर, साहिल सप्रे यांनी केले आहे.

**नगर परिषद कार्यालय मेहकर, जि. बुलडाणा**

**निविदा सुचना**

जावक क्र. ११६३/२५ दि.१९/०५/२०२५

Development of Web Based Voice Chatbot Using Artificial Intelligence Technology with LED Interactive Panel या कामासाठी निविदा भरने करिता नगर परिषद मेहकर अधिकृत पुरवठादारंकडून तांत्रिक व वित्तीय अशा दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने GST दरासह निविदा मागवीत आहे. निविदा फॉर्म विक्री व सादर करण्याची तारीख दि.२०.०५.२०२५ ते दि. २७.०५.२०२५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. निविदा फॉर्म न.प. कार्यालयात रोखपाल यांचेकडे कार्यालयीन वेळात रोखीने भरून प्राप्त करावे. दि. २८.०५.२०२५ रोजी निविदा कार्यालयीन वेळेत उघडण्यात येईल. शर्ती व अटी नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. तसेच अटी व शर्ती पाहुन निविदा भरावी.

**प्रशासक तथा मुख्यधिकारी**
**नगर परिषद मेहकर**

## थोडक्यात

### युट्यूबर ज्योती मल्होत्राचे इंस्टाग्राम अकाउंट अचानक बंद!



**दिल्ली :** युट्यूबर ज्योती मल्होत्रा सध्या चर्चेत आहे, याचे कारण म्हणजे तिच्यावर पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा आरोप. ज्योती यूट्यूबवर ट्रॅव्हल विथ जो या नावाने प्रसिद्ध आहे. सध्या तिला पाकिस्तानसाठी गुप्त हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली असून तिची चौकशी सुरू आहे. दरम्यान, ज्योतीच्या सोशल मीडिया खात्यांबाबत मोठी बातमी समोर येत आहे.ज्योती मल्होत्रा हरियाणाच्या हिसार जिल्ह्यातील रहिवासी आणि एक प्रसिद्ध ट्रॅव्हल ब्लॉगर आहे. तिचे युट्यूबवर ३७ लाखांहून अधिक सबस्क्राइबर आहेत. तिला प्रवासाची आवड आहे आणि ती त्याचे व्हिडिओ देखील अपलोड करते. तिचे पाकिस्तान, चीन आणि इंडोनेशियामध्ये नेटवर्क असल्याचे तपासातून पुढे आले आहे. आयएसआय या पाकिस्तानी गुप्तचर संस्थेसाठी हेरगिरी केल्याचा तिच्यावर संशय आहे. अलीकडच्या काळात जम्मू-काश्मीरमधील पहलगामलाही तिने भेट दिली होती. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर तपास यंत्रणांकडून तिची कसून चौकशी सुरू आहे.

### साखर उत्पादनात ५८ लाख टनांनी घट



**मुंबई :** गाळपासाठी उसाची कमी उपलब्धता, हंगाम सुरू होण्यास झालेला विलंब आणि साखर उताऱ्यात झालेली घट आदी कारणांमुळे देशाच्या साखर उत्पादनात १८ टक्क्यांनी घट झाली आहे. १५ मेअखेर देशाचे साखर एकूण साखर उत्पादन २५७.४० लाख टनांवर गेले असून, गतवर्षी ३१५.४० लाख टन साखर उत्पादन झाले होते. म्हणजेच साखर उत्पादनात ५८ लाख टनांनी घट झाली आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, देशात १५ मेपर्यंत एकूण साखर उत्पादन १८ टक्क्यांनी कमी झाले आहे. २०२३-२४ मध्ये ३१५.४० लाख टन साखर उत्पादन झाले होते, त्या तुलनेत चालू हंगामात ५८ लाख टनांनी घट होऊन २५७.४० लाख टन साखर उत्पादन झाले आहे. एकीकडे गाळपासाठी उसाची उपलब्धता घटली असतानाच दुसरीकडे सरासरी साखर उताऱ्यातही घट झाली आहे. गतवर्षीच्या १०.१० टक्क्यांवरून, चालू हंगामात ९.३० टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. हंगामअखेर देशाचे साखरेचे उत्पादन २६१.१० लाख टन होण्याचा अंदाज आहे. निर्यात, घरगुती उपयोग आणि इथेनॉलसाठी वळविलेली साखर वगळून ४८ ते ५० लाख टन साखर शिल्लक राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे साखरेचा तुटवडा जाणवणार नाही, असे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केले.

### मुंबईत दोन करोनाबाधित रुग्णांचा मृत्यू

**मुंबई :** हाँगकाँग आणि सिंगापूरमध्ये करोनाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत असताना मुंबईतील केईएम रुग्णालयामध्ये करोनाबाधित असलेल्या दोन रुग्णांचा मृत्यू झाला. मात्र हे मृत्यू करोनामुळे झाले नसून त्यांच्यावर उपचार सुरू असलेल्या आजारामुळे झाल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. केईएम रुग्णालयात रविवारी सकाळी ५८ वर्षीय एका महिलेचा संशयित करोनाने मृत्यू झाला असल्याचे उघडकीस आले. परळ येथे राहत असलेल्या या ५८ वर्षीय महिलेला १४ मे रोजी श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने तिला केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयाच्या रुग्णकक्ष क्रमांक २० मध्ये तिच्यावर उपचार सुरू होते.
रविवारी सकाळी तिचा मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी घेण्यात आलेल्या स्वॅबच्या चाचण्यांमध्ये इतर कोणत्याही आजारांची लागण असल्याचे आढळले नाही. मात्र आरटीपीसीआर चाचणीच्या अहवालामध्ये त्या महिलेला करोना असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे मृत्यूचे कारण करोना असल्याचे दिसते,'' असे माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी माध्यमांना सांगितले.त्याचप्रमाणे काही दिवसांपूर्वी केईएम रुग्णालयामध्ये १३ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला होता. या दोन्ही रुग्णांना करोना झाला असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले. मात्र या दोन्ही रुग्णांचा मृत्यू करोनामुळे झाला नसल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती आधी पाकिस्तानला का देण्यात आली ?

## राहुल गांधींचे मोदी सरकारला तिखट सवाल

नवी दिल्ली, दि.१९ वृत्तसंस्था

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर प्रश्न उपस्थित केले आहेत. राहुल गांधी यांनी यांनी आज पत्रकार परिषद घेत सरकारला घेरले. यावेळी त्यांनी,''जयशंकर स्वतः म्हणत आहेत की पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्यांवर हल्ला करण्यापूर्वी त्यांनी पाकिस्तानला माहिती दिली होती. ही राजनयिकता नाही, ही हेरगिरी आहे.'' असा गंभीर आरोप देखील त्यांनी केला. काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांनी, ''काही हेरांना अटक करण्यात आल्याची बातमी होती पण नंतर लपवाछपवी सुरू झाली'' असे म्हटले. राहुल गांधींनी यावेळी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांना प्रश्न विचारत, ''पाकिस्तानला माहिती दिल्यामुळे आपण किती भारतीय विमाने गमावली?'' ''हा गुन्हा आहे आणि देशाला सत्य कळले पाहिजे.'' असे म्हटले. तसेच अलिकडेच राहुल गांधी यांनी परराष्ट्रमंत्र्यांच्या एका विधानाबाबत प्रश्न उपस्थित केला होता




की ऑपरेशन सिंदूरची माहिती आधी पाकिस्तानला का देण्यात आली ?तसेच, परराष्ट्र मंत्रालयाने यावर एक निवेदन जारी करत ,''राहुल गांधी चुकीचे तथ्य सादर करत आहेत.''असे म्हटले होते.
पवन खेरा यांनीही केंद्र सरकारवर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, ''काल बातमी आली की काही हेरांना अटक करण्यात आली आहे आणि मग गुप्तहेर सुरू होतात. ही कसली हेरगिरी आहे? मोदीजी गुजरातचे मुख्यमंत्री असताना ते म्हणायचे की समस्या सीमेवर नाही, समस्या दिल्लीत आहे. आम्ही त्यांना हेच सांगू इच्छितो की समस्या दिल्लीत आहे.''असे म्हणत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.
पवन खेरा यांनी पहलगाम आणि पुलवामा दहशतवादी हल्ल्यांचा उल्लेख करत म्हटले की, ''जयशंकर यांच्या विधानाची पाकिस्तानमध्ये चर्चा होत आहे. आपल्या देशाची खिल्ली उडवली जात आहे. जगभरात आपली खिल्ली उडवली जात आहे. म्हणूनच राहुल गांधी हा प्रश्न विचारत आहेत. तुम्ही विचार करत आहात की विरोधी पक्ष संवेदनशील प्रश्नांवर गप्प राहतील, पण आम्ही नक्कीच प्रश्न विचारू. अन्यथा पुलवामा आणि पहलगामसारख्या घटना घडत राहतील.'' असे म्हटले.

## पाकिस्तान कोणत्याही परिस्थितीत झुकणार नाही

### पाकिस्तानी जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी पुन्हा ओकली गरळ

इस्लामाबाद , दि.१९ वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तानमधील अलिकडेच झालेल्या लष्करी संघर्षानंतर, पाकिस्तानच्या इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स () चे महासंचालक लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी पुन्हा एकदा गरळ ओकली आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी, ''पाकिस्तान कधीही भारतीय राजवटीसमोर झुकणार नाही आणि आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी कोणत्याही थराला जाण्यास तयार आहे.' असे महंत एक प्रकारे भारताला धमकीच दिली आहे.
पाकिस्तानी लेफ्टनंट जनरल चौधरी यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, ''भारत अमेरिका नाही आणि पाकिस्तान अफगाणिस्तान नाही. भारत इस्रायल नाही आणि पाकिस्तान पॅलेस्टाईन नाही. पाकिस्तानला कधीही थांबवता येणार नाही किंवा सक्ती करता येणार नाही.'' पुढे त्यांनी आरोप केला की, ''भारतात मुस्लिम आणि शिखांचा छळ केला जात आहे, ज्यामुळे तेथे द्वेष आणि अतिरेकीवाद वाढला आहे.''
भारताने अलिकडेच केलेल्या ऑपरेशन सिंदूरला प्रत्युत्तर म्हणून, पाकिस्तानने परिपक्वता आणि जबाबदारीने प्रतिसाद दिल्याचा दावा केला. मात्र, ते जे म्हणतात ते खोटे आहे. त्यांनी पूंछ आणि सीमेवरील इतर भागांवर अंदाधुंद गोळ्या आणि तोफगोळ्यांचा मारा केला, ज्यामुळे डझनभर निष्पाप भारतीयांना आपले प्राण गमवावे लागले.




डीजी आयएसपीआरच्या म्हणण्यानुसार, भारत आणि पाकिस्तानमधील संघर्ष वाढत असताना अमेरिकेला हस्तक्षेप करावा लागला. त्यांनी दावा केला की भारतीय संरक्षण मंत्रालयाने वैयक्तिकरित्या युद्धबंदीची विनंती केली होती. तथापि, पाकिस्तानचे हे विधान देखील खोटे आहे. लेफ्टनंट जनरल चौधरी यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यासाठी भारताने पाकिस्तानवर लावलेले आरोप फेटाळून लावले आणि म्हणाले, ''भारत कोणत्याही तपासाशिवाय आणि पुराव्याशिवाय आरोप करत आहे. आमच्या सरकारने स्पष्ट केले होते की जर काही पुरावे असतील तर ते शेअर केले पाहिजेत.'' तथापि, पाकिस्तान या प्रकरणातही पोकळ दावे करत आहे. पहलगाम हल्ला करणाऱ्या ४ जणांपैकी २ जण पाकिस्तानचे होते, हे आम्ही तुम्हाला सांगतो.
पुढे ते म्हणाले की, भारताने ६ ते १० मे दरम्यान पाकिस्तानी लष्करी तळांवर हवाई हल्ले आणि क्षेपणास्त्र हल्ले केले,

## पाकचा पर्दाफाश करणाऱ्या संसदीय पथकासोबत जाण्यास युसूफ पठाणचा नकार

नवी दिल्ली, दि.१९ वृत्तसंस्था

दहशतवाद्यांचे उगमस्थान असणाऱ्या पाकिस्तानवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर, भारताने आता राजकीय राजनैतिक हल्ल्याची घोषणा केली आहे. पाकिस्तानचा पर्दाफाश करण्यासाठी सरकारने वेगवेगळ्या देशांमध्ये संसदीय शिष्टमंडळे पाठवण्याची घोषणा केली आहे. या संसदीय पक्षात पश्चिम बंगालचे सत्ताधारी तृणमूल काँग्रेस (टीएमसी) खासदार आणि माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू युसूफ पठाण यांचेही नाव समाविष्ट करण्यात आले.
शिष्टमंडळात समाविष्ट असणाऱ्या



युसूफ पठाणने मोठा निर्णय घेत भारत सरकारला, आपण या दौऱ्यासाठी उपलब्ध राहणार नाही. '' असे म्हटले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार,''पाकिस्तानचा पर्दाफाश करण्यासाठी परदेश दौऱ्यावर जाणाऱ्या खासदारांच्या गटात युसुफ पठाण यांचा समावेश केला जाणार नाही. तसेच भारत सरकारने थेट खासदार युसूफ पठाण यांच्याशी संपर्क साधला होता.

## 'ऑपरेशन सिंदूर'नंतर प्रथमच विदेश दौऱ्यावर जाणार परराष्ट्र मंत्री जयशंकर

नवी दिल्ली, दि.१९ वृत्तसंस्था

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हे युरोपच्या सहा दिवसांच्या महत्त्वपूर्ण दौऱ्यावर रवाना होत आहेत. 'ऑपरेशन सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हे युरोपच्या सहा दिवसांच्या महत्त्वपूर्ण दौऱ्यावर रवाना होत आहेत. नेदरलँड्स, डेन्मार्क आणि जर्मनी या तीन देशांच्या नेत्यांशी ते राजनैतिक, सामरिक आणि आर्थिक सहकार्याबाबत चर्चा करणार असून, विशेषत: पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाचा मुद्दा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर ठळकपणे मांडला जाण्याची शक्यता आहे. परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी



अधिकृत माहिती देताना सांगितले की, जयशंकर यांचा हा दौरा १९ ते २४ मे दरम्यान पार पडणार आहे. हे दौरे केवळ द्विपक्षीय संबंधच मजबूत करतील असे नाही, तर भारताच्या जागतिक धोरणात्मक उपस्थितीलाही नवे परिमाण देणार आहेत.पाहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ७ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळ उद्‌ध्वस्त केले.

## दिल्लीसह दक्षिण भारतात पावसाचा इशारा; उ.प्रदेश, राजस्थानमध्ये उष्णतेची लाट

### मध्य महाराष्ट्र , मराठवाड्यातही वादळी पाऊस

नवी दिल्ली , दि.१९ वृत्तसंस्था

भारतीय हवामान विभागाने ( अनेक राज्यांमध्ये हवामानाचा हायअलर्ट इशारा जारी केला आहे. ज्यामध्ये येत्या आठवड्यात भारताच्या बहुतांश भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. रविवारी जारी केलेल्या सतर्कतेनुसार, १८ मे ते २४ मे दरम्यान देशाच्या किनारी आणि ईशान्य भागात हवामान बदल होण्याची शक्यता आहे.
कर्नाटक, कोकण, गोवा आणि केरळसह पश्चिम किनारा आणि द्वीपकल्पीय भारतातील लगतचे भाग १८ मे ते २४ मे दरम्यान मुसळधार पावसाची तयारी करत आहेत. या भागात सतत पाऊस पडण्याची शक्यता आहे, ज्यामुळे स्थानिक पूर आणि पाणी साचण्याची चिंता वाढली आहे.



पुढील ५-६ दिवसांत ईशान्य भारत, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये वादळ आणि विजांसह मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. या प्रदेशांमधून ३० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे, ज्यामुळे झाडे कोसळण्याचा आणि इमारतींचे किरकोळ नुकसान होण्याचा धोका वाढेल.
राजधानी दिल्लीत हवामान अंशतः ढगाळ राहील आणि गडगडाटी वादळे, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा ३०-४० किमी प्रतितास वेगाने वाहिल, जे तात्पुरता ५० किमी प्रतितास वेग धारण करू शकतो. कमाल तापमान ३८-४० सेल्सिअस आणि किमान तापमान २७-२९ सेल्सिअस दरम्यान राहण्याची अपेक्षा आहे.

**मान्सून १२ जूनपर्यंत कोल्हापुरात दक्षिण भारतात पाऊस**

रविवार १८ ते मंगळवार २० मे दरम्यान तामिळनाडू, पुडुचेरी आणि कराईकलसह विविध राज्यांमध्ये, १८ ते २४ मे दरम्यान केरळ, माहे, किनारी कर्नाटक आणि उत्तर अंतर्गत कर्नाटक, २० ते २२ मे दरम्यान किनारी आंध्र प्रदेश आणि यानम, १८ ते २० मे दरम्यान रायलसीमा आणि १८ ते २१ मे दरम्यान दक्षिण अंतर्गत कर्नाटक यासह विविध राज्यांमध्ये तुरळक मुसळधार पावसाचा अंदाज आहे.
याव्यतिरिक्त, २० ते २२ मे दरम्यान किनारी कर्नाटक, १८ ते २० मे दरम्यान दक्षिण अंतर्गत कर्नाटक आणि १९ ते २२ मे दरम्यान उत्तर अंतर्गत कर्नाटक यासारख्या भागात खूप मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. २० मे रोजी कर्नाटकच्या किनारी भागात अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.
ईशान्य भारतात, १८-२० मे दरम्यान अरुणाचल प्रदेशात, १८-२४ मे दरम्यान आसाम आणि मेघालयात आणि १८ मे रोजी त्रिपुरा आणि नागालँडमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. १८-२० मे दरम्यान आसाम आणि मेघालयात एकेकाळी खूप मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांना 'प्रोस्टेट कर्करोगा'चे निदान

वाशिंग्टन, दि.१९ वृत्तसंस्था

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्याविषयी धक्कादायक बातमी समोर आली आहे. जो बायडेन यांना 'प्रोस्टेट कर्करोगा'चे निदान झाले आहे. माजी राष्ट्रपतींना कर्करोगाचा एक अतिशय आक्रमक प्रकार आहे. तो त्यांच्या हाडांमध्ये पसरला आहे, असे सांगितले जात आहे. काल डेमोक्रॅट कार्यालयाने ही माहिती दिली.
माध्यमांना दिलेल्या निवेदनात, ''जो बायडेन यांना लघुशंकेशी संबंधित लक्षणे जाणवल्यानंतर त्यांची चाचणी करण्यात आली, त्यानंतर त्यांना 'प्रोस्टेट कर्करोग' असल्याची पुष्टी झाली. आता बायडेनचे कुटुंब उपचारांच्या पर्यायांची योजना आखत आहे. दरम्यान, हा कर्करोग किती धोकादायक आहे आणि त्याचे उपचार काय



आहेत? याविषयीची माहिती जाणून घेऊ निवेदनानुसार, जो बायडेन ज्या प्रोस्टेट कर्करोगाने ग्रस्त आहेत तो अत्यंत आक्रमक स्वरूपात आहे. मात्र, हा कर्करोग हार्मोन्सनाही संवेदनशील असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत, माजी राष्ट्रपती आणि त्यांचे कुटुंब उपचारांच्या पर्यायांबद्दल त्यांच्या डॉक्टरांशी सतत बोलत आहेत. ८२ वर्षीय जो बायडेन यांचा मुलगा ब्यू बायडेन यांचे २०१५ मध्ये कर्करोगाने निधन झाले. निवेदनानुसार, बायडेन ज्या कर्करोगाशी झुंजत आहेत त्याचा ग्लीसन स्कोअर ९ आहे आणि ग्रेड ग्रुप ५ आहे.
अमेरिकन कॅन्सर सोसायटीच्या मते, प्रोस्टेट कर्करोग हा अत्यंत असामान्य असल्याचे दिसून येते. त्याला सर्वोच्च रेटिंग ग्रेड ५ देण्यात आला आहे. त्याच वेळी, त्याचा ग्लीसन स्कोअर १० पर्यंत आहे. यावरून बायडेनच्या आजाराचे गांभीर्य दिसून येते.
अमेरिकन कॅन्सर सोसायटीच्या मते, 'प्रोटेस्ट कर्करोग' हा पुरुषांमध्ये सर्वात सामान्य कर्करोग आहे. अमेरिकेतील दर आठ पुरूषांपैकी एकाला त्याच्या आयुष्यात या कर्करोगाचा त्रास होईल. जर सुरुवातीलाच हे लक्षात आले तर त्यावर उपचार करणे खूप सोपे आहे. तथापि, आकडेवारी असेही सांगते की कर्करोगामुळे जीव गमावणाऱ्या पुरुषांमध्ये प्रोस्टेट कर्करोग हा मृत्यूचे दुसरे सर्वात मोठे कारण आहे.

## कामाचा ताण सहन न झाल्याने इंजिनिअरची आत्महत्या

बंगळुरु, दि.१९ वृत्तसंस्था

८ मे च्या दिवशी बंगळुरुच्या अगरा तलावात निखिल सोमवंशी या इंजिनिअरचा मृतदेह आढळून आला होता. या प्रकरणात पोलिसांनी तक्रार केली आहे. दरम्यान निखिल सोमवंशीने आत्महत्या का केली? ही बाब समोर आली नव्हती. ज्याबाबत आता चर्चा सुरु झाली आहे. ही चर्चा सुरु होण्याचं कारण आहे रेडिट पोस्ट. या आयडीवरुन ही पोस्ट लिहिण्यात आली आहे. ही पोस्ट लिहिणाऱ्याचा दावा आहे की निखिल सोमवंशी आणि मी बरोबर काम करत होतो. या पोस्टमध्ये जे आरोप करण्यात आले आहेत त्यावरुन कामाचा प्रचंड ताण, वर्क कल्चर हे सगळं सहन न झाल्याने निखिलने आत्महत्या केल्याची चर्चा सुरु झाली आहे.
मला माहीत नाही की हा मुद्दा अजून चर्चेत का आला नाही? माझ्या एका सहकाऱ्याने कामाचा प्रचंड ताण सहन न झाल्याने शेवटी आयुष्य संपवलं. तो 'ओला कृत्रीम' या एआय कंपनीत काम करत होता. दोघांच्या टीमसह टीम लीड करत होता. बाकी दोघांनी कंपनी सोडली त्यामुळे तो कामाचा ताण सहन करत होता आणि त्याला त्याचा त्रास सहन करत होता. मी नाव घेणं योग्य नाही पण राजकिरण पनुगंतीला हे माहीतही नाही की लोकांना कसं सांभाळून घेतलं पाहिजे. असा दावा या पोस्टमध्ये करण्यात आला आहे. या पोस्टमध्ये पुढे म्हटलंय की, राजकिरण फक्त फोनवर बोलत असतो, लोकांना दोष देतो आणि त्यानंतर कुठे गायब होतो माहीत नाही. कारण तो अमेरिकेत असतो आणि कंपनीचे बहुतांश कर्मचारी बंगळुरुमध्ये राहतात. तो जेव्हा मिटिंग घेतो तेव्हा जे शब्द वापरतो ते तर फारच वेदनादायी असतात. नव्या लोकांना तो वाट्टेल तसं बोलतो. राजकिरण कायमच त्याचा राग लोकांवर काढतो.

## म्यानमार, बांगलादेशमधील बेकायदेशीर स्थलांतरित होणार हद्दपार

### केंद्रीय गृह मंत्रालयाने राज्यांसह केंद्रशासित प्रदेशांना दिली ३० दिवसांची डेडलाईन

नवी दिल्ली, दि.१९ वृत्तसंस्था

गेल्या महिन्यात जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत जोरदार प्रत्युत्तर दिले होते. आता अंतर्गत सुरक्षेबाबत कोणतही तडजोड करणार नसल्याचे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या नव्या आदेशाने स्पष्ट झाले आहे. बांगलादेश आणि म्यानमारमधून आलेल्या संशयित बेकायदेशीर स्थलांतरितांची ओळख पटविण्याचे काम पुढील ३० दिवसांमध्ये करावे, असा आदेश केंद्रीय गृह मंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिला आहे. ३० दिवसांच्या कालावधीनंतर त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी झाली नाही तर त्यांना हद्दपार केले जाईल, असेही केंद्रीय गृह मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.
गृह मंत्रालयाने () राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना त्यांची कागदपत्रे तपासण्यासाठी ३० दिवसांची मुदत दिली आहे. मंत्रालयाच्या सूचनांनुसार, जर त्यांच्या कागदपत्रांची ३० दिवसांच्या आत पडताळणी झाली नाही तर त्यांना देशातून हद्दपार केले जाईल. केंद्रीय गृह मंत्रालयाने जारी केलेल्या सूचनांनुसार, गृह मंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना बेकायदेशीर स्थलांतरित ओळखण्यासाठी आणि त्यांना हद्दपार करण्यासाठी त्यांच्या वैधानिक अधिकारांचा वापर करण्यास सांगितले. हद्दपारी होईपर्यंत व्यक्तींना ठेवण्यासाठी पुरेसे जिल्हास्तरीय बंदी केंद्रे स्थापन करण्यास सांगितले आहे. हे निर्देश बांगलादेश आणि म्यानमारमधील बेकायदेशीर स्थलांतरितांविरुद्ध केंद्र सरकारच्या नवीन मोहिमेचा एक भाग आहेत. सीमा सुरक्षा दल () आणि आसाम रायफल्सच्या महासंचालकांना () देखील हे निर्देश जारी करण्यात आले आहेत.फेब्रुवारीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले होते की, बेकायदेशीर घुसखोरांचा मुद्दा राष्ट्रीय सुरक्षेशी



देखील संबंधित आहे. या प्रश्नावर कठोर कारवाई केली पाहिजे. बेकायदेशारी वास्तव्यास असणाऱ्यांना ओळखले पाहिजे. त्यांना हद्दपार केले पाहिजे. राजस्थान आणि गुजरात राज्यांनी बांगलादेशातून आलेल्या बेकायदेशीर स्थलांतरितांच्या संशयावरून लोकांना ओळखण्यासाठी आणि त्यांना ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. गुजरात सरकारने सुरत आणि अहमदाबादमध्ये शोध मोहिमा राबवल्या. या वेळी ६,५०० लोकांना ताब्यात घेतले होते. राजस्थानने या आठवड्यात १४८ बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांची पहिली तुकडी एका विशेष विमानाने पश्चिम बंगालला पाठवली, त्यानंतर त्यांना त्यांच्या देशात परत पाठवले जाईल, असे पोलिस सूत्रांनी सांगितले.मंत्रालयाच्या नवीन सूचनांबद्दल द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना अधिकाऱ्याने सांगितले की, ''पूर्वी बेकायदेशीर स्थलांतरितांना हद्दपार करण्यासाठी कालमर्यादा नव्हती. दुसऱ्या राज्याकडून पडताळणी अहवाल मिळविण्यासाठी अनेक दिवस जात होते; परंतु आता केंद्राने राज्ये/केंद्रशासित प्रदेश आणि जिल्हाधिकाऱ्यांना/जिल्हा दंडाधिकाऱ्यांना ३० दिवसांच्या आत हद्दपार केलेल्या राज्य/केंद्रशासित प्रदेशाला योग्य ओळखपत्र अहवाल पाठवण्यास सांगितले आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## सैन्यदलाच्या कारवाईमागे सूचक इशारा!

पाकिस्तानने भारताच्या सीमेलगत शहरांना, नागरी वस्त्यांना लक्ष्य केलेले तुर्की ड्रोन्स परतवून लावत भारतीय सैन्यदलाने 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत पाकिस्तानात घुसून लष्करी तळ उद्ध्वस्त केले. नव्हे, पाकिस्तानच्या लष्कराची लक्तरे वेशीवर टांगण्याचे काम केले. या धडक कारवाईने सर्वच फुटीरतावादी शक्तींना एक सूचक इशारा मिळाला आहे. भारताच्या लष्करी कारवाईने पाकिस्तानी राजवटीची हाडे खिळखिळी झाली आहेत; पण लष्कराने केलेल्या कारवाईत एका दगडामध्ये पाकिस्तानसह अनेकांना इशारा दिला आहे. हा इशारा भारताची कुरापत काढू इच्छिणाऱ्या शक्तींना पुरेसा आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी २६ निष्पापांची हत्या केली. या दहशतवादी कारवायांमागे पाकिस्तान असल्याचे स्पष्टपणे पुढे आले. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय लष्कराच्या हालचाली सुरू होत्या. यादरम्यान विखारी राजकारणाने प्रभावित झालेल्या काही शक्तींनी भारताने पाकिस्तानला गुडघे टेकविण्यास भाग पाडल्यानंतरही भारत शस्त्रसंधी करण्यासाठी अमेरिकेच्या दबावाला बळी पडला, असा विषारी प्रचारही सुरू केला. देशाच्या परराष्ट्रमंत्र्यांनी याविषयी पारदर्शक असे स्पष्टीकरणही दिले. तसेच पंतप्रधान मोदी यांनीही भारत कोणाच्याही दबावाला भीक घालणार नाही आणि यापुढे आण्विक युद्धाची धमकी कदापि सहन करणार नाही, असे जगापुढे स्पष्ट केले. यामुळे भारताने पाकिस्तानविरोधात कारवाई करून एकप्रकारे जगातील राष्ट्रांनाही विशेषतः सीमेवरील चीनलाही संदेश दिला आहे. भारतीय लष्कराचा हा संदेश जागतिक पटलावर पाकिस्तानची तळी उचलणाऱ्या काही मुस्लीम राष्ट्रांनाही आहे. कोणत्याही स्थितीला भारत सामोरे जाऊ शकतो, याचे उदाहरणही भारताने जागतिक महासत्तांपुढे ठेवले आहे. तसेच केवळ भारताच्या कृपेने स्वातंत्र्य मिळविलेल्या आणि इस्लामच्या नादामध्ये हिंदूंना लक्ष्य करणाऱ्या शेजारील बांगला देशालाही हा एक प्रकारचा सज्जड दम आहे; पण त्याहीपेक्षा भारतात विविध राज्यांमध्ये कार्यरत असलेल्या फुटीरतावादी शक्तींनाही तो एक कडक संदेश समजला जात आहे. भारतामध्ये पूर्वोत्तरी राज्यात गेल्या काही वर्षांपासून अशांतता आहे. दक्षिणेकडील तामिळनाडू, केरळ या पूर्वीच्या द्रवीडस्तानातील राज्यांनाही सध्या स्वायत्ततेचे डोहाळे लागले आहेत. भाजप सरकार सत्तेत आल्यापासून पूर्वोत्तर राज्यांमध्ये फुटीरतावाद्यांच्या कारवायांवर काही प्रमाणात अंकुश बसला असला, तरी उत्तर पूर्वेतील आठ राज्यांमध्ये या कारवाया अधूनमधून डोके वर काढतात. या राज्यांमध्ये कार्यरत असलेल्या फुटीरतावादी संघटनांना चीनकडून रसद मिळते आणि त्याच्या जोरावर राज्य वेगळे करून चीनमध्ये समाविष्ट करण्याची स्वप्ने या फुटीरतावादी शक्ती पाहतात. या शक्तींना भारतीय सेना दलाच्या कारवाईने ७२ तासांत पाकिस्तान हालवून सोडले जाते, तर फुटीरतावाद्यांच्या मुसक्या बांधण्यासाठी किती वेळ लागेल, याचे गणितही फुटीरतावाद्यांपुढे मांडले आहे. ७५ वर्षांपूर्वीचे भारतीय लष्कर आणि लष्कराची आजची स्थिती यामध्ये देशापोटी त्याग, निष्ठा आणि समर्पणाची भावना कायम असली, तरी तंत्रज्ञानाच्या अंगाने भारतीय लष्कर प्रचंड सक्षम झाले आहे. भारत आर्थिकदृष्ट्या मजबूत होताना विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही कोसो मैल पुढे गेला आहे. आमच्या माता-भगिनींच्या कपाळावरील सिंदूर पुसण्याचा परिणाम काय होतो, हे आता प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांच्या संघटनांना समजले असेल. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तान हतबद्ध झाला. परंतु तरीदेखील जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही. मोहिमेत भारताचा मोस्ट वाँटेड दहशतवादी मसूद अझहर याच्या कुटुंबातील १४ सदस्य मारले गेले. या सर्वांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी याप्रमाणे १४ कोटी रुपये देण्याचा निर्णय पाकिस्तान सरकारने घेतला. पंतप्रधान शाहबाझ शरीफ यांनी त्यांच्यासाठी विशेष 'शुहाद पॅकेज'ची घोषणा करीत दहशतवाद्यांची उघड पाठराखण केली आहे. भारताच्या केंद्रीय सुरक्षा समितीने सिंधू जल करार स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात, रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, असे ठामपणे म्हटले होते. सिंधू करार स्थगितीचा निर्णय हा मुळीच बेकायदेशीर नाही. कारण मूळ करारातच बदलत्या परिस्थितीमुळे त्याचा फेरविचार करण्याची तरतूद आहे. पाकने अतिरेकी प्रवृत्तींना खतपाणी घालूनच ही परिस्थिती निर्माण केली आहे. भारताकडे वक्र नजरेने पाहिल्यास काय स्थिती होते, हे पाकिस्तानने अनुभवले आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या उरात धडकी भरली आहेच शिवाय शेजारील बांगला देशला या सामर्थ्याची कल्पना आली असेल; परंतु त्याहीपेक्षा देशाशी गद्दारी करून देशाचे सार्वभौमत्त्व धोक्यात आणणाऱ्या फुटीरतावादी शक्तींसाठी हा एक मोठा धडा आहे. त्यातून त्यांनी बोध घेणे आवश्यक आहे अन्यथा त्यांचीही गय नाही, हा सूचक इशारा भारतीय सैन्यदलाच्या कारवाईमागे आहे.

### गद्दार ज्योती





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

**येथे गद्दारीला माफी नाही**
**शिकवा तौफिकलाही धडा**
**अशा हरामखोरांची गय नाही**
**त्यांना आता यमसदनी धाडा**

**पाकिस्तानशी केली यारी**
**हिंदू ज्योती निघाली बेगडी**
**आमिषा बळी पडली नारी**
**पेटवली तिने स्वार्थाची शेगडी**

**प्राण हाती घेऊन लढतात**
**धीर शूर ते सैनिक आपले**
**यूट्यूबच्या फालतू धंद्यात**
**कमाई करती नालायक इथले**

### ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



इतके तू मित्रा
असावे विस्तीर्ण ।
नसावे ते जीर्ण
कणभर ।।

असावे तू मित्रा
इतके समृद्ध ।
वाटावा समुद्र
थेंब पुढे ।।

असावे तू मित्रा
इतके प्रगल्भ ।
नसावा विकल्प
तुझ्याविना ।।

इतका असावा
विश्वास अढळ ।
गाळात कमळ
जसा उगे ।।

# घराच्या चिरेबंदीतील वास्तव...



### सप्तरंग

डॉ. विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९



शांततेच्या सावलीत असतो आक्रोश दडलेला, मौनात असतो एक वेदनेचा सूर जडलेला. बाहेरून भासतो जणू सुखाचा देखावा, पण अंत:र्मनात चालतो वेदनांचा संघर्षमयी थवा.

''बाहेरून सगळं शांतच दिसत असतं, आत काय वादळ उठलंय ते फक्त घराच्या भिंतींनाच ठाऊक असतं''... कधी कधी एखादं घर दिसतं .... मस्तपैकी टुमदार, नीटनेटकं, एकसंध. खिडक्या नीट बंद केलेल्या, गच्चीवर फुलझाडं, अंगणात सडा - सारवण , दिवा लावलेलं तुळशीवृंदावन , सुबक रांगोळी आणि दारावर तोरण. पाहणाऱ्याला वाटतं .... काय सुसंस्कृत, गोड, समाधानी घर आहे ....! पण माणसांच्या चेहऱ्यांवरचे हसू आणि घराच्या रंगीत भिंतींवरचे रंग, खरे किती ....?

घरातल्या दिवाणखान्यात एखादा हसरा फोटो लावलेला असतो .... पती, पत्नी, मुले, भाऊ , आजी-आजोबा एकत्र. तो फोटो पाहताना कोणालाच वाटत नाही, की ह्या घरात काही वर्षांपूर्वी इतकं प्रचंड भांडण झालं होतं, की एकमेकांचं तोंड न पाहण्याची शपथ घेण्यात आली होती. कुणाला कळत नाही, की ह्या घरात एकेकाळी तिन रात्री जागून कुणीतरी मनाची चिरेबंदी केली होती, स्वतःशी लढा दिला होता. घराच्या भिंती हे केवळ विटा-माती-सिमेंट नसतात .... त्या स्मृतींच्या, वेदनांच्या, आणि मौनाच्या थरांनी बांधलेल्या असतात.

त्या भिंतींच्या आड एक आई कित्येक वर्षं स्वतःच्या अश्रूंना गुपचूप गिळून मुलांच्या हसण्याचा आवाज ऐकायचा प्रयत्न करत राहते. एका खोलीत एक वृद्ध माणूस झोपतो .... तो बोलत नाही फार, पण त्याच्या डोळ्यांत घराबद्दल असलेल्या अपेक्षांचं शून्य पसरलेलं असतं. एखाद्या दुपारी जेव्हा घरात एक शब्दही उच्चारला जात नाही, तेव्हा ही शांतता नुसती शांत नसते .... ती एक उदास गूढ कहाणी असते. कोणाचंच कोणाशी काही खटकलं नसतं, पण तरीही कोणीच कोणाला विचारत नाही ....

'' तू खरंच ठीक आहेस ना ....?'' कधी कधी तर भिंतींना इतकं ऐकावं लागतं की त्या मुक्या असूनही रडतात .... रात्रीच्या शांततेत, एकटेपणाच्या भिंतींना हळहळणारे हुंदके ऐकू येतात. गॅसवर ठेवलेला चहा उकळत राहते, पण संवाद मात्र ओतप्रतपणे होत नाहीत . शब्द ओठांवरच विरून जातात. पलंगावर दोन माणसं अबोलपणे एकत्र झोपलेली असतात, पण त्यांच्या काळजांमध्ये मैलांचा पल्ला असतो. अशा घरांत माणसं एकत्र राहतात, पण मनं भिन्न दिशांना वाहवत जात राहतं ... एकमेकांना हरवत, विसरत, सहन करत. घरातल्या खिडक्या कधी उघड्या असतात, पण मनांची खिडकी मात्र कायम बंद. बाहेरचं जग म्हणतं .... ''वा, किती सुंदर आहे हे घर...!

पण त्या सौंदर्याच्या आत लपलेली असते एक भयंकर शांतता आणि ही शांतता म्हणजे काही समाधान नाही, ही शांतता म्हणजे थांबवलेलं ओरडणं असतं. आणि म्हणून, त्या भिंतींच्या खाचांमध्ये अडकून राहतात .... एकटेपणाचे काटे, अपरिहार्य दुःख, बिनशब्दांचे राग, अनुत्तरित प्रश्न, आणि विसरलेली माणुसकी. पण तरीसुद्धा, त्या भिंती कोसळत नाहीत .... कारण त्या पाठीवर पेलत असतात मायेचं ओझं. पदर पसरून रडलेल्या आईचं सान्निध्य, मनाच्या खोल कप्प्यात गुप्त ठेवलेली बापाची जबाबदारी, शब्द न सापडलेल्या लेकरांचे विचार, काळजावर पाय ठेवून उभं राहिलेलं प्रेम.

घरातलं प्रत्येक वादळ, प्रत्येक तडजोड, प्रत्येक जखम त्या भिंती जपून ठेवतात. कोणी विचारत नाही त्यांना, पण त्या साक्षीदार असतात .... सगळ्याच्या सगळ्याचा. कधी कधी वाटतं... घराचं खरं सौंदर्य ते भिंतींमध्ये नसतं, तर भिंतींनी पेललेल्या मौनांमध्ये असतं. आणि म्हणूनच, जेव्हा तुम्ही कुठल्याही घरासमोरून जाता... आहे तसं बघा. हसतं दिसतं म्हणून ते खरंच आनंदी असेल असं गृहित धरू नका. कारण. बाहेरून सगळं शांतच दिसत असतं. आत काय वादळ उठलंय, ते फक्त घराच्या भिंतींना ठाऊक असतं. ना कुणी बोलतं, ना कुणी ऐकतं, पण घराच्या भिंती मात्र सगळं समजून घेतात. हसू लपवलेल्या नजरा आणि दबलेले हुंदके, त्यांच्या सावल्यांतच माणसांचे खरे चेहरे दिसतात.




### विचारमंथन

विजय लिमये
9326040204



मी पैज लावून सांगतो, आपल्या देशातील असे एकही घर नाही जिथे माळे विविध वस्तूंनी खचाखच भरलेले नाहीत. माळे खाली केले तर त्यातून नाना तऱ्हेच्या वस्तू मिळतात. एकंदरीत हे माळे अडगळीच्या वस्तू ठेवण्यासाठीच वापरले जातात.

थोडा विचार करूया, सर्वांच्या लक्षात येईल, जी वस्तू आपण मागील तीन वर्षात एकदाही वापरलेली नाही ती आपण आपल्या उर्वरित आयुष्यात एकदा सुद्धा वापरणार नाही. मग अश्या वस्तू माळ्यावर साठवून ठेवण्याचा काय उद्देश असणार आहे? घरातील एकूण सामानापैकी पन्नास टक्के सामान आपण विविध कारणांनी वापरणार असतो, ज्याचा मी वर सांगितल्याप्रमाणे तीन वर्षातून एकदा तरी उपयोग होतो, बाकीचे सामान आपण केवळ असुदे, लागेल कधीतरी या आशेने उगीच साठवून ठेवतो.

तमाम भारतीयांना विनाकारण अनेक वस्तू साठवण्याची सवय आहे. एका नातेवाईकाचा पुण्यातील वाडा पाडून अपार्टमेंट करण्याचे ठरले, तेव्हा वाड्यातून मोठा ट्रक भरून जुने सामान निघाले, जे आताच्या जमान्यात भंगार या सदरात मोडले. पितळ व तांब्याची भांडी, स्टीलचे अनेक तांबे, गंज, व विविध आकाराची भांडी, चमचे, वाट्या, पेले, भाजी, आमटी वाढण्यासाठीचे डाव आणि मोठे चमचे. या शिवाय पूर्वीचे पत्र्याचे चौकोनी डबे, तेलाचे मोकळे डबे, तांब्याचा बंब, विविध आकाराची घमेली, जुन्या सुटकेस, ट्रँक, अश्या नानाविध वस्तू निघाल्या. या वस्तू मागील दोन पिढ्यांनी विनाकारण साठवून ठेवलेल्या होत्या, ज्या येणाऱ्या काळानुसार कालबाह्य झालेल्या होत्या. आजोबांनी व वडिलांनी जे सामान पोटाला चिमटा देऊन जमवले, नातवाने ते सर्व किलोच्या भावात विकले, त्यांनी ते त्यांच्या जमान्यात विकले असते तर आताच्या कैकपट जास्त किंमत मिळाली असती.

मध्यम, उच्चमध्यम, व श्रीमंत वर्गातील महिलांची घरातील कपाटे साड्या व ड्रेसेसनी इतकी खचाखच भरलेली असतात, तरीही त्या कपड्यांच्या बाबतीत असमाधानीच असतात आणि कपड्यांची कपाटे नेहेमी अपुरीच पडतात. दुसरीकडे, अश्याही महिला आहेत ज्यांना अंग झाकण्यापुरताही कपडा मिळत नाही. आजही लग्न व इतर समारंभात मोठ्याप्रमाणात आहेराच्या वस्तू दिल्या व घेतल्या जातात, या सामानातील बऱ्याच वस्तूंची रवानगी थोड्याच दिवसात माळ्यावर होते. या सामानातील थोड्या फार वस्तू पुन्हा भेट म्हणून सरकवल्या जातात. वित्तीय लाभाचा विचार करता, हा खूप मोठा तोटाच आहे कारण आपला खूप पैसा अश्या तऱ्हेने अडकलेला राहतो. ज्यांच्याकडे खूप काही आहे त्यांना ते अडगळीत टाकावे लागते, आणि जे गरीब आहेत त्यांना चार भांडी जमवताना, रक्ताचे पाणी करावे लागते.

सेकंड होम घेणारे असेच असतात, त्यांच्या त्या सेकंड होम चा उपभोग रखवालदार घेतो. घरमालक वर्षातून जास्तीत जास्त दोन तीन वेळा त्या घरात येतो, मोजून तीन ते पाच दिवस राहून जातो. रखवालदार अथवा मुनीम, घर सांभाळणारा उरलेले तीनशे पन्नास दिवस त्या घराचा फुकट उपभोग घेतो.

जर तमाम भारतीयांनी हि माळ्यावरची कधीही न लागणारी अडगळ गरजवंतांना दिली तर मी सांगतो उत्पादन उद्योगात वीज वापर घटेल, वाहतुकीवरचा खर्च कमी होईल ज्यामुळे प्रदूषण किमान पाच टक्क्यांनी कमी होईल. जश्या चलनी नोटा तिजोरीत पडून राहिल्या कि चलन टंचाई होते, तीच गोष्ट अश्या वस्तू माळ्यावर पडून राहिल्याने होतो.

अनेक लोकांच्याकडे जुन्या गाड्या, सायकली विनाऊपयोग पडून असतात, केवळ वेळत न विकल्यामुळे, त्यांची किंमत वर्षसरताना कमी कमी होत जाऊन भंगार रूपात परिवर्तन होते. विविध सरकारी गाड्या, वस्तु, फर्निचर सुद्धा केवळ वेळेत लिलाव करून न विकल्यामुळे प्रचंड नुकसान होते, हे नुकसान आपल्यासारख्या करदात्यांच्या टॅक्स रूपात दिलेल्या पैशाचे असते, याची जाणीव सरकारदरबारी कुणालाही नसते. आज, समाज परिवर्तनाची नितांत गरज आहे, निदान माळ्यावरच्या वस्तू तरी उदारतेने द्यायला शिका, कदाचित त्या चार सहा वस्तूनी कित्तेक लोकांचे संसार उभे राहतील. त्याचा पर्यावरणावर होणार भार हलका होण्यास मदत होईल. मोह सोडा, इथून परलोकी काहीच घेऊन जायचे नाही, मग इतके ओझे जोपासायची काही गरज आहे का? म्हणतात ना,

**देणाऱ्याने देत जावे,...**
**घेणाऱ्याने घेत जावे....**
**देणाऱ्याने देत जावे, ...**
**घेणाऱ्याने घेत जावे....**
**घेणाऱ्याने... घेता घेता...**
**देणाऱ्याचे... हातचं घ्यावे।**

# सत्याचा साक्षात्कार सत्यपाल महाराज : एक भावनिक अभंगमय प्रवास

### जीवन गाथा

प्रवीण बा. हटकर
अकोला





प्रबोधनकार; गुरू सत्यपाल ।
बोले सत्यपाल; सत्य वाणी ।।

या अभंगाच्या पहिल्या ओळीतच सत्यपाल महाराज यांचा संपूर्ण व्यक्तिमत्त्व शब्दबद्ध झालं आहे. ते केवळ एक कीर्तनकार नाहीत, की वादक नाहीत ते समाजाचे प्रबोधनकार आहेत. त्यांच्या प्रत्येक वाक्यात, त्यांच्या बोलण्यात सत्याची धार आहे. जे म्हणाले तेच जगले, म्हणूनच त्यांची वाणी केवळ शब्द नाही, तर उद्धाराची वाट आहे.

बोले तैसा चाले; सत्य ज्याची वाणी।
सत्यपाल वाणी; उद्धारक ।।

''बोले तैसा चाले'' हे तत्त्वज्ञान जेंव्हा सत्यपाल महाराजांच्या जीवनात उतरलेलं पाहतो, तेंव्हा ते फक्त एक वाक्य उरत नाही, ते जीवनमूल्य बनतं. त्यांच्या वाणीमध्ये कटुता असते, पण ती कडवट औषधासारखी असते, जी अंतःकरणात खोल जाऊन विचारांची मशागत करते.

सत्यपाल सांगे; सत्मार्ग चालावे ।
आणिक दावावे; दुसऱ्याला ।।

सत्यपाल महाराज केवळ स्वतःच्या उध्दारापुरते बोलत नाहीत, ते समाजासाठी बोलतात, ते सर्वसामान्यांच्या व्यथा जाणून त्यावर उपाय सुचवतात. 'सत्मार्ग' चालण्याचं ते आवाहन करतात, पण फक्त चालण्यापुरतं नाही दुसऱ्यालाही तो मार्ग दाखवावं, ही त्यांची शिकवण आहे. हे म्हणजे 'स्वतःच्या पायात चप्पल असूनही, दुसऱ्याच्या पायातील काटा काढणं' असं आहे.

रोखठोक जगी; संत ज्ञान देती ।
सत्यपाल देती; ज्ञानामृत ।।

त्यांची भाषा रोखठोक आहे, कुठलाही आडपडदा नाही. पण त्याच भाषेत संतांचा अनुभव आहे, ज्ञानामृताची धार आहे. ते भोंदू बाबांच्या ढोंगी चमत्कारांवर उघडपणे प्रहार करतात. म्हणतात, ''अंधश्रद्धा नको, श्रद्धा हवी''. त्यांच्या वाणीतून विज्ञानवाद झरतो, पण परंपरेचं बोटही त्यांनी कधीच सोडलं नाही.

सत्यपाल वाणी; कडुलिंब कधी ।
नि मधाळ कधी; गुणकारी ।।

सत्यपाल महाराजांची वाणी कधी कडवट वाटते, पण तिच्यातूनच जीवनाचं खरं औषध मिळतं. त्यांच्या अभंगात आणि प्रवचनात, हसवत हसवत मनाचा आणि विचारांचा शुद्धीकरण करतात. त्यांची वाणी मधाळही आहे जेव्हा ते प्रेमाने, सहवेदनेने, एखाद्याला सावरण्याचा प्रयत्न करतात.

त्यांनी सांगितलं ''कर्मावर विश्वास ठेवा.'' हे कर्मयोगाचं तत्त्वज्ञान संत तुकाराम, ज्ञानेश्वर, तुकडोजी महाराज यांच्याकडून घेतलेलं आहे. त्यांच्या कीर्तनांमध्ये हे संत उपस्थित असतात त्यांच्या ओव्या, अभंग, दोहे यांचा आस्वाद आणि वापर, हे प्रबोधनाच्या सखोलतेचं दर्शन घडवतं. ते म्हणतात, ''अन्याय सहन करू नका, अन्याय करू नका.'' ही ओळ त्यांच्या प्रवचनाचा गाभा आहे. समाजात आज जिथे अनेकजण अत्याचार, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा यांच्या विळख्यात अडकले आहेत, तिथे सत्यपाल महाराज हे दिवा ठरतात. गेल्या साठ वर्षांपासून ते सातत्याने सप्तखंजिरीच्या माध्यमातून, कीर्तनाच्या रूपात, समाजात परिवर्तन घडवत आहेत. त्यांच्या प्रबोधनाने कित्येक तरुणांना दिशा मिळाली. कोणत्या तरी अंधाऱ्या रात्रीत ते सत्याचं दीप घेऊन समोर आले, आणि म्हणाले ''देव शोधताय? माणसात बघा.'' त्यांचं सांगणं आहे ''लालसा नको. मदत करा. माणुसकी जपा.'' या शब्दांत जेवढं मोठं तत्त्वज्ञान आहे, तेवढीच खोल भावना देखील आहे.

हल्ला झाला तरी; प्रबोधन केले ।
मनातून केले; माफ त्यांना ।।

या दोन ओळींत सत्यपाल महाराजांची खरी उंची दिसते. कोणावर अन्याय झाला, वेदना झाल्या, जीवाला धोका झाला, तरीही त्या व्यक्तींना माफ करणं ही साध्यासाठी अशक्य पण संतांसाठी सहज गोष्ट आहे. ते केवळ क्षमा करतात असं नाही, ते त्या प्रसंगातूनही प्रबोधन करतात. हल्ला झाल्यावर कोणीही सूड घेतो, राग प्रकट करतो, पण महाराज समजावतात, शिकवतात.

यातूनच त्यांची संतवृत्ती दिसते.
हे तुकोबारायांचेच शब्द आठवतात
''जोडावी जीभ मीत, मोकळी ठेवावी प्रीत'' सत्यपाल महाराजांनी, जी गोष्ट सामान्य माणसासाठी अशक्य वाटते, ती त्यांनी कृतीतून दाखवून दिली आहे.

मनातून माफ करणं हे केवळ शब्द नसतात, ते मनाचा विस्तार असतो. त्यांनी जेव्हा त्यांच्या वर हल्ला करणाऱ्यांना माफ केलं, तेव्हा त्यांनी हिंसेला प्रेमानं उत्तर दिलं, तेव्हा त्यांनी समाजाला सांगितलं की ''माणूस हळूहळू बदलतो, त्याला संधी द्या.'' अशा कृतीतूनच समाजाचं खरं प्रबोधन होतं. कारण ज्याच्यावर अन्याय झाला, तोच जर क्षमाशीलतेचा आदर्श ठेवतो, तर समाज त्या क्षमेला दिव्यत्वाची ओळख देतो. त्यांच्या या कृतीने ते संत तुकारामांची आठवण करून देतात ''आपुले मरण पाहता सांडिले अभिमान तयाचे नाहि जाण तुका म्हणे'' सत्यपाल महाराज हे केवळ कीर्तनकार नाहीत, ते चालतेबोलते अध्यात्म आहेत. त्यांची क्षमा म्हणजे प्रवचन नव्हे, ती जीवनशिक्षा आहे. त्यांनी माफ केलं म्हणून समाजाला माफ करणं शिकवलं. ते म्हणतात, ''हिंसेने बदल नाही होत तर, समजुतीने बदल होतो.'' हा प्रसंग आपल्याला शिकवतो ''संत होणं म्हणजे फक्त प्रवचन करणं नव्हे, तर संकटाच्या काळात माणूस राहणं आणि दुसऱ्यांना माणूस बनवणं.''

**अंतत :** सत्यपाल महाराज हे नावच त्यांची ओळख सांगून जातं. ते सत्याचे पालक आहेत. सत्याच्या मार्गावर चालणारे, अन् त्याच मार्गावर इतरांना घेऊन जाणारे एक आधुनिक संत. ते आपले आहेत, आपल्यातले आहेत, आणि त्यांचं बोलणं ही आपल्या अंतःकरणाची भाषा आहे. त्यांच्या अभंगातून, त्यांच्या कीर्तनातून, त्यांच्या रोखठोक शैलीतून, आजही सत्याचं बीज अनेक हृदयात पेरलं जातंय. तेवढंच खरं, तेवढंच शाश्वत.

## लोकार्थ

# बोराना वीव्हसचा आयपीओ २० मे २०२५ रोजी खुलणार




बोराना वीव्ह्स लिमिटेड (''बोराना'', द कंपनी), अनब्लीच्ड सिंथेटिक ग्रे फॅब्रिकच्या उत्पादनात एक अग्रणी कंपनी, ने त्यांचा आयपीओ (इनिशिअल पब्लिक ऑफरिंग) मंगळवार, २० मे २०२५ रोजी उघडण्याचे जाहीर केले आहे. अँकर गुंतवणुकीसाठीचा दिवस सोमवार, १९ मे २०२५ रोजी असून, हा इश्यू गुरुवार, २२ मे २०२५ रोजी बंद होईल. कंपनी ₹१४४.८९ कोटी उभारण्याचा उद्देश ठेवत असून, तिचे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड या प्रमुख शेअर बाजारांच्या मुख्य मंचांवर सूचीबद्ध करण्याची योजना आहे.या इश्यूचा आकार एकूण ६७,०८,००० इक्विटी शेअर्स असून, किंमत पट्टा ₹२०५ ते ₹२१६ प्रती शेअर आणि चेहरामूल्य ₹१० आहे.या मधून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाचा उपयोग सुरत, गुजरात, भारत येथे ग्रे फॅब्रिकचे उत्पादन वाढवण्यासाठी नवीन उत्पादन युनिट स्थापन करण्यासाठी (''प्रस्तावित युनिट ४''), वाढीव कार्यकारी भांडवलाच्या गरजांसाठी, तसेच सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी केला जाणार आहे.कंपनीने या इश्यूसाठी बुक रनिंग लीड मॅनेजर म्हणून बीलाईन कॅपिटल ॲडव्हायजर्स प्रायव्हेट लिमिटेडची नियुक्ती केली आहे आणि केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड यांची रजिस्ट्रार म्हणून नेमणूक केली आहे.

# बेलराईज इंडस्ट्रीजचा आयपीओ २१ मे २०२५ रोजी उघडणार




ऑटोमोटिव्ह घटक उत्पादक कंपनी बेलराईज इंडस्ट्रीज लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी ५ रुपये दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी ८५ रु. ते ९० रु. असा किंमत पट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (आयपीओ किंवा ऑफर) बुधवार, २१ मे २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि शुक्रवार, २३ मे २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १६६ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १६६ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ पूर्णपणे २,१५० कोटी रुपयांपर्यंतचा नवीन इश्यू आहे ज्यामध्ये विक्रीसाठी कोणताही प्रस्ताव नाही.कंपनीने घेतलेल्या काही कर्जांच्या पूर्ण किंवा अंशतः परतफेड/पूर्वभरणा करण्यासाठी आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी, त्याच्या नवीन जारी केलेल्या रकमेचा वापर केला जाईल.

बेलराईज इंडस्ट्रीज लिमिटेड दुचाकी, तीनचाकी, चारचाकी, व्यावसायिक वाहने आणि कृषी वाहनांसाठी विविध प्रकारच्या सुरक्षा गंभीर प्रणाली आणि इतर अभियांत्रिकी उपाय ऑफर करते. त्यांच्या उत्पादन पोर्टफोलिओमध्ये मेटल चेसिस सिस्टम, पॉलिमर घटक, सस्पेंशन सिस्टम, बॉडी-इन-व्हाइट घटक आणि एक्झॉस्ट सिस्टम यांचा समावेश आहे.

# जपानमधील डिजिटल पेमेंट्समध्ये फि कॉमर्सची डीजीएफटीसह भागीदारी

भारतातील आघाडीची ओम्निचॅनेल डिजिटल पेमेंट सोल्यूशन्स प्रदाता फि कॉमर्सने डिजिटल गॅरेज, इंक.ची पेमेंट्स उपकंपनी असलेल्या डीजी फायनान्शियल टेक्नॉलॉजी (डीजीएफटी) सोबत धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली. ही भागीदारी फि कॉमर्सच्या आंतरराष्ट्रीय विस्तार प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असलेल्या जपानमध्ये पुढील पिढीचे डिजिटल पेमेंट सोल्यूशन्स आणण्याचे उद्दिष्ट ठेवते.

ओम्निचॅनेल खरेदी आणि जारी करणाऱ्या सोल्यूशन्सच्या विस्तृत पोर्टफोलिओसह, फि कॉमर्स ही रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया-परवानाधारक पेमेंट एग्रीगेटर आहे ज्याने भारतातील डिजिटल पेमेंट लँडस्केपमध्ये बदल घडवून आणला आहे. त्याचे युनिफाइड प्लॅटफॉर्म ऑनलाइन, इन-स्टोअर (पीओएस) आणि ऑन-द-गो चॅनेलवर अखंड व्यवहार सक्षम करते, तर त्याचे इश्यूइंग सोल्यूशन्स क्रेडिट, डेबिट आणि प्रीपेड कार्ड्सच्या एंड-टू-एंड व्यवस्थापनास समर्थन देते. फी कॉमर्सच्या भागीदारांमध्ये मोठे उद्योग, बँका आणि पेमेंट कंपन्या समाविष्ट आहेत ज्या डिजिटल पेमेंटमध्ये स्केलेबिलिटी, वेग आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्यांच्या सोल्यूशन्सचा वापर करतात.

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 46

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ■ | | | ■ | | | | | | ■ |
| ■ | | ■ | | ■ | | ■ | | ■ | | | | ■ | |
| पु | | | ■ | अ | व | हे | ल | ना | ■ | | ■ | | |
| न | ■ | | ■ | | ■ | | ■ | | | | ■ | | |
| रा | | | | | ■ | | ■ | | ■ | | | ■ | |
| ग | ■ | | | ■ | | ■ | | ■ | गी | ■ | | | |
| म | | ■ | | | | ■ | | ■ | त | ■ | | ■ | ■ |
| व | ■ | | | ■ | | ■ | | | रा | | ■ | | |
| ■ | | | | | ■ | | | ■ | मा | ■ | | | ■ |
| ■ | ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ | य | | ■ | | |
| ■ | | ■ | रो | ज | गा | र | ■ | ग | णा | ■ | | | |
| प | | | | ■ | ■ | | | र | ■ | | | | ■ |
| र | ■ | ■ | | | | | ■ | स | | | | ■ | |
| म | | | | ■ | ■ | | | ळी | ■ | | | | |

## हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दव योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

उदाहरण
हरहुन्नरी
कालपरवा
देहराडून
रफूचक्कर
राजकारण

सहा अक्षरी
xhr jkek;.k
iqjkxeu

**संकेत शब्दः–**

**दोन अक्षरी**
उगा
कट्टी
खडू
गण
गरा
गोणी
डंख
थक्क
दास
भुंगा
यक्ष
रग
रफू
रस
रीत
रीघ
वाक
वाल
वेल
सीता

**तीन अक्षरी**
अरुण
ओणवा
कणव
चर्वण
डमरू
तपास
थकवा
नवरा
नापत
परम
परान्न
पारवा
पुरुष
सकाळी
सतरा
सत्कार
सरस
सवय
हेरंब

**चार अक्षरी**
गडकरी
गरसळी
नवनीत
निर्णायक
पखवाज
प्रकरण
मधमाशी
रसकस
रातराणी
रामराज्य
रोजगार
रोजनिशी
षटकार
सनातनी

**पाच अक्षरी**
अवहेलना
उतारवय

## मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | भा | प | ती | ■ | सा | र | वा | न | ■ | प | र | व | ड |
| व | ■ | ख | ■ | शे | ■ | म | ■ | क्त | ■ | रि | वा | ज | ■ |
| ड | ■ | वा | स | र | म | णी | ■ | ■ | सं | घ | ■ | न | स |
| ■ | मा | ज | र | पा | ट | ■ | पां | ड | व | ■ | पा | ■ | न |
| आ | न | ■ | स्व | ■ | क्र | म | चु | क्र | र | ■ | प | प | ई |
| पा | ■ | प्र | ति | क्षा | ■ | स्जि | ■ | र | ण | गं | भी | र | ■ |
| द | ■ | ति | ■ | त्र | यो | द | शी | ■ | ■ | गा | रु | डी | ■ |
| म | ण | क्र | ■ | ध | ग | ■ | त | ■ | व्या | ध | ■ | ■ | आ |
| स्त | ■ | र | ■ | र्म | ■ | आ | ल | य | ■ | र | य | ता | वा |
| क | ■ | क | व | ■ | वि | ■ | ता | म | सी | ■ | ज्ञ | ■ | ह |
| ■ | सु | ■ | धु | रं | ध | र | ■ | न | मा | ज | ■ | व | न |
| व | र | ण | ■ | ग | वा | क्ष | ■ | ■ | दे | व | दा | सी | ■ |
| खा | स | ■ | आ | शा | ■ | क | ■ | न | व | स | ■ | य | ती |
| र | ■ | ना | ई | ला | ज | ■ | सा | र | ■ | ■ | अं | त | र |

Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 425

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | | ■ | 5 | | 6 | | 7 | ■ | 8 | 9 | | 10 |
| 11 | | ■ | 12 | | ■ | 13 | | ■ | | ■ | | ■ | 14 | | ■ | |
| | ■ | 15 | | ■ | 16 | | ■ | 17 | | 18 | | ■ | | ■ | 19 | |
| ■ | 20 | | ■ | 21 | | | | | ■ | | ■ | 22 | | 23 | ■ | ■ |
| 24 | | | 25 | | | ■ | ■ | 26 | | ■ | 27 | | ■ | 28 | | 29 |
| 30 | | ■ | | ■ | 31 | 32 | | | ■ | 33 | ■ | 34 | | | ■ | |
| | ■ | 35 | | 36 | ■ | | ■ | 37 | | ■ | 38 | | ■ | 39 | | |
| 40 | | | ■ | 41 | 42 | | ■ | | ■ | 43 | | | | | ■ | ■ |
| | ■ | 44 | 45 | ■ | | ■ | 46 | | | ■ | ■ | ■ | 47 | ■ | 48 | ■ |
| ■ | 49 | | | | ■ | 50 | | | ■ | 51 | | 52 | | ■ | 53 | 54 |
| 55 | | | ■ | ■ | ■ | 56 | | ■ | ■ | | ■ | | ■ | 57 | | |
| 58 | | ■ | ■ | 59 | | | | ■ | 60 | | | ■ | 61 | | ■ | |
| 62 | | ■ | 63 | | ■ | | ■ | 64 | | | ■ | 65 | | | ■ | |
| ■ | ■ | 66 | | | | ■ | 67 | | | ■ | 68 | | | ■ | 69 | |
| 70 | ■ | 71 | | | ■ | 72 | | ■ | | ■ | ■ | | ■ | 73 | | ■ |
| 74 | | | | ■ | 75 | | | | ■ | 76 | | | | ■ | 77 | |

**–: आडवे संकेत :–**

1) पूर्वीच्या काळी विधवा स्त्रीबद्दल पत्रात लिहावयाचा आदरार्थी मायना
5) संकुचित स्थळी वाढलेला, विहिरीतील बेडूक
8) मिठाई करून विकणारा
11) वर्तुळाकार
12) अंबाडीसारखे एक झाड किंवा त्याचा वाख
13) आरोप, लांछन 14) रिकामा
15) माय, जननी, माता
16) आशा, अपेक्षा, इच्छा
17) तुरुंगवास
19) पाणी, जल
20) पोळी भाजण्याचे पसरट पात्र
21) अतिशय शुद्ध व उत्तम बावन्नवेळा शुद्ध केलेले सोने
22) स्वर्गलोकीचा एक देवर्षी
24) सूर्यास्त होण्याच्या सुमाराचा मुहूर्त
26) पति, स्वामी
27)उष्णतेमुळे अंगातून निघणारे पाणी
28) एक लहान चर्मवाद्य
30) समुदाय, जमाव
31) हे नऊ नाथ नवनारायणाचे अवतार समजले जातात
33) सौभाग्यवतीचे संक्षिप्त उच्चारण
34) जनावरांचा जमाव
35) कडे, वर्तुळ
37) दगा, समान संख्यांचा गुणाकार
38) ओझे, वजन
39) लाजाळू
40) साप मुंगुसाचे खेळ दाखविणारा
41) देहावसान
43) गिरणीवर पीठ करायला नेलेले गहू, डाळ इत्यादी
44) अंगावरील कोमल केस
46) मनाशी केलेला कठोर निश्चय
49) व्यवस्था करणारा, प्रत्यक्ष कृती करणारा
50) धन्यवाद, कृतज्ञता
51) बंदुकीच्या गोळ्या किंवा तलवारीच्या वारापासून संरक्षण व्हावे म्हणून घातलेला लोखंडी अंगरखा
53) गर्विष्ठ, बाणेदार,
55) नदीचा तीर, काठ
56) समाजात प्रतिष्ठा असलेली व्यक्ती
57) बंधन सुटलेला, स्वैर, मोकळा
58) पांडवांद्वारा अभयदानप्राप्त एक दानव
59) नाटकाच्या आरंभी सूत्रधार आणि एखादे पात्र यांचे संभाषण
60) प्रेम, जिव्हाळा 61) विस्तव
62) हिमालयात आढळणारा एक केसाळ प्राणी
63) पौराणिक काळातील मदनाची प्रेयसी
64) रंगमंचावर सादर होणारे कथानक
65) कृतज्ञ, ऋणी असणे
66) धैर्य, हिंमत
67) सजावट, शोभिवंत रचना
68) इच्छित कार्य सिद्धीस गेल्यास देवाला काहीतरी अर्पण करण्याचा निश्चय
69) शहराच्या आरंभी असलेली चौकी
71) एक ऋतू 72) प्रत्येक
73) सुक्या मेव्यातील एक फळ
74) कावळ्यांचा आवाज
75) भारताचे नागरिकत्व स्वीकारलेला
76) शुभ कार्याचा आरंभ
77) फूल उमलण्याअगोदरची स्थिती

**–: उभे संकेत :–**

1) गंगेचे उगमस्थान
2) कपोल
3) आचार्य विनोबा भावेंनी लिहिलेली श्रीमद् भगवत्गीतेवरील टीका
4) ताठा, गुर्मी
5) वंश, घराणे, पक्षकार
6) रामायणात कैकयीचे कान भरणारी दासी
7) देवळाचा शिरोभाग, अतिरेक, पराकाष्ठा
8) हिमालयाच्या कुशीत असलेले एक प्रसिद्ध पवित्र तीर्थक्षेत्र
9) वेल, वल्ली
10) येशु ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा दिवस, गुड फ्रायडेनंतरचा पहिला रविवार
13) बैठक, बसण्याची वस्तू
15) स्वर, नाद
16) पुनः पुनः म्हणणे, आवृत्ती करणे
17) मराठी रंगभूमी व चित्रपटात अभिनय करणारा एक जुना नावाजलेला अभिनेता
18) डावा
20) गोणपाट, पोत्याचा तुकडा
21) भुजा
22) लहान बालकाचे नाव ठेवणे
23) जुलूम, अन्यायाने एखादी चळवळ दाबून टाकणे
24)..... अन् पोटात पाय या म्हणीतील जीव कोणता ?
25) कर्जाची मूळ रक्कम
29) रडणे, शोक
32) शिजवून पातळ केलेली डाळ
35) घरातील मोठी व्यक्ती
36) मृत्यूदेवता
38) कपाळ, ललाट
42) राखण, राखड
45) जन्मापासून आजवर घालविलेली एकंदर वर्षे
46) शक्यता, संभव
47) पडणे, पान
48) मोठा जोराचा आवाज
49) श्रीगणेशाचे एक नाव
50) गायनातील एक राग
51) चिकित्सा करणारा, परीक्षा करणारा
52) शेतजमिनीत घातलेले पौष्टिक द्रव्य
54) व्यवस्थित राहणारा, यथायोग्य, शोभेसा
55) जादू
57) ज्वारीची कणसे बडविण्याचे लाकडी अवजार
59) एखाद्या व्यक्तिने दिलेला अनुकूल उद्गार
60) रस्त्याने जाणारा, पांथस्थ
61) सादृश्य, भ्रम, प्रतिबिंब
63) बारीक झणझण
64) मोर्च्यातील घोषणा
65) पसंत पडणे
66) अरबीमध्ये दहा हा आकडा
67) देवांस स्तुती स्तोत्र म्हणत दिव्यांनी ओवाळणे
69) कोमल, सुकुमार
70) वडिलांचा भाऊ
72) मूल्य, किंमत (उत्तर पुढील अंकी)

## मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| का | का | हा | थ | र | सी | ■ | का | ट | को | न | ■ | घा | स | ■ | स |
| न | ■ | त | न | ■ | मो | ■ | न | र | म | ■ | अ | व | त | र | ण |
| ठ | ळ | क | ■ | उ | ल्लं | घ | न | ■ | ल | ल | ना | ■ | त | क | ■ |
| ळ्या | ■ | डी | क | ■ | घ | ट | ■ | सा | ■ | पं | थ | ■ | धा | म | ण |
| ब | ली | ■ | डा | ■ | न | स | न् | ख | व | डा | ■ | ध | र | ■ | ■ |
| स | प्त | क | ■ | अ | ■ | र्प | ■ | र | ■ | व | हि | नी | ■ | वि | ■ |
| णे | ■ | फ | ल | श्रु | ति | ■ | आ | भा | र | ■ | त | ■ | अ | धा | शी |
| ■ | भि | ल्ल | ■ | ■ | र | ■ | प | त | ■ | ■ | चिं | त | नी | य | ■ |
| ए | क | क | ■ | बा | शिं | ग | ■ | ■ | पं | डि | त | ■ | ति | क | डे |
| ■ | बा | ■ | प | रा | ग | ■ | आ | स | क्ति | ■ | क | लि | ■ | ■ | रा |
| पा | ळी | व | ■ | म | रा | ठा | ■ | ■ | प्र | जा | ■ | ला | घ | वी | ■ |
| द | ■ | ■ | अ | ती | व | ■ | स | र | पं | च | ■ | व | र | ■ | ख |
| चा | क | व | त | ■ | ■ | ब | ■ | टा | च | ■ | न | ■ | कों | ब | डा |
| री | ता | ■ | ए | क | त | र्फी | ■ | ळ | ■ | पा | र | ■ | ब | ■ | जं |
| ■ | र | ■ | व | स | न | ■ | ■ | ■ | म | न | क | व | डा | ■ | गी |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** कोणत्याही महत्त्वाच्या कामात अनावश्यक विलंब झाल्याने तुम्हाला त्रास होईल. प्रवासादरम्यान काही मौल्यवान वस्तू चोरीला जाऊ शकतात.

**वृषभः** पैशांशी संबंधित समस्या गंभीर वळण घेऊ शकतात. कर्जदाराशी भांडण होऊ शकते. प्रकरण पोलिस स्टेशनपर्यंत पोहोचू शकते.

**मिथून :** आजचा दिवस सामान्य आणि नफ्याचा असेल. महत्त्वाच्या कामात अडचण येऊ शकते. सामाजिक मान आणि प्रतिष्ठेबद्दल जागरूक राहण्याची गरज असेल. राग टाळा.

**कर्क :** आज मालमत्तेबाबत काही वाद होऊ शकतात. वादविवादाचे रूपांतर भांडणात होणार नाही याची काळजी घ्यावी, अन्यथा त्यामुळे मोठे नुकसान होऊ शकते.

**सिंह :** आज तुम्ही कठोर परिश्रम केले तर तुम्हाला तुमच्या कामाच्या ठिकाणी यश मिळेल. व्यवसायात प्रगतीसह नफा होईल.

**कन्या :** आज कुटुंबात काही शुभ कार्यक्रम होतील. एखाद्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. ज्यामुळे आनंद खूप वाढेल.

**तुळ :** आज जमा केलेल्या भांडवलात वाढ होईल. नवीन मालमत्ता खरेदी-विक्रीसाठी हा काळ फारसा अनुकूल नाही. व्यवसायातील परिस्थिती सुधारेल.

**वृश्चिक :** आजचा दिवस मालमत्ता खरेदी-विक्रीसाठी शुभ राहील. या बाबतीत सतत प्रयत्न केल्यास यश मिळेल. त्यासाठी कर्ज घ्यावे लागण्याची शक्यता आहे.

**धनु :** आज तुमच्या नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी जवळीक वाढेल. तुम्हाला सत्तेतील वरिष्ठ व्यक्तीकडून काही महत्त्वाची जबाबदारी मिळू शकते.

**मकर :** तुम्हाला राजकारणात नवीन मित्र भेटतील. राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना लक्षणीय यश मिळेल. तुम्हाला मोठी चांगली बातमी मिळू शकते.

**कुंभ :** आजचा दिवस सकारात्मक राहील. नातेवाईक आणि जवळच्या मित्रांच्या मदतीने कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी कमी होतील. स्वतः वर विश्वास ठेवा.

**मीन :** आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी तुमच्या कामासोबत काही महत्त्वाची जबाबदारी मिळू शकते. ज्यामुळे कार्य-क्षेत्रात तुमचा प्रभाव वाढेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# थोडक्यात

## रेल्वे स्थानकावर मध्यरात्री चाकूहल्ला! दोन गटांमध्ये तुफान राडा; दोघे जखमी, पाच जणांना अटक

**अकोला:** शहराच्या मध्यवर्ती रेल्वे स्थानक परिसरात रविवारी मध्यरात्री दोन गटांमध्ये भीषण चाकूहल्ला झाला. रात्री १२.३० च्या सुमारास रामदास पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले. पैशांच्या किरकोळ व्यवहारातून सुरू झालेला वाद चाकूंच्या घावांवर येऊन थांबला.या हाणामारीत आदित्य भरत मानवतकर (२५) रा. भीम चौक, अकोट फाईल आणि नावेद अन्वर ए. करीम हे दोघे गंभीर जखमी झाले असून, त्यांना खाजगी व शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.पोलिसांनी या प्रकरणात तत्काळ कारवाई करत दोन वेगवेगळ्या गटांतील पाच जणांना ताब्यात घेतले आहे. अटक आरोपींमध्ये तारिक अजीज ए. करीम, शेख जावेद, कपिल चंद्रकांत पारवेकर, आदित्य चंद्रकांत पारवेकर आणि तुषार उके यांचा समावेश आहे. यातील तारिक आणि शेख जावेद यांना न्यायालयाने एक दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. एक आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फक्त १ हजार रुपयांच्या व्यवहारावरून दोन्ही गटांमध्ये वाद झाला होता. या घटनेमुळे रेल्वे स्थानक परिसरात प्रचंड गोंधळ उडाला. प्रवासी व स्थानिक नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली होती.दोन गटांमध्ये झालेला हा वाद बैद पुरा आणि अकोट फाईल परिसरातील तरुणांमध्ये झाला असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासून आणि जखमींच्या चौकशीवरून आरोपींचा पर्दाफाश केला आहे.रामदास पेठ पोलिसांकडून या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

## कृषी विद्यापीठात खरीप पूर्व कृषी मेळावा उत्साहात संपन्न




**अकोला:**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर आयोजित खरीप पूर्व कृषी मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी सुमारे १४०० शेतकऱ्यांनी उपस्थिती लावली असून, विद्यापीठ निर्मित बियाणे व निविष्ठांच्या खरेदीला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. एकूण १ कोटी ७० लाख रुपये किमतीची बी-बियाणे व अन्य निविष्ठांची विक्री झाली. यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन, तूर, मूग, उडीद, धान, राळा, कुटकी, हळद बेणे व फळपिकांच्या रोपांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. त्यांनी शाश्वत शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान, आंतरपीक पद्धती व शेतीपूरक व्यवसायांची गरज अधोरेखित केली. पावसाच्या लहरीपणावर मात करण्यासाठी वैज्ञानिक सल्ल्यानुसार पीक नियोजनाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.मुख्य अतिथी म्हणून उपस्थित आमदार रणधीर सावरकर यांनी राज्यातील कृषी विद्यापीठांत ''मिलेट बोर्ड'' स्थापन करण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांनी शेतमाल खरेदी-विक्रीत सचोटीने कार्य करण्याची गरजही मांडली. तसेच १७ प्रकारच्या भरडधान्यांना शाश्वत किमान आधारभूत दर मिळाल्यास शेतकऱ्यांना अधिक उत्पन्नाचे स्रोत प्राप्त होतील, असे सांगितले. महाबीजचे महाव्यवस्थापक विवेक ठाकरे यांनी पेरणीपूर्वी बियाण्यांची उगम क्षमता तपासण्याचे व बीज प्रक्रिया करूनच पेरणी करण्याचे आवाहन केले. पट्टा पद्धतीचा वापर अधिक फलदायी ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमात विविध विषयांवर तांत्रिक सत्रे झाली.

## विभागातील बिंदू नामावलीचा प्रश्न तात्काळ मार्गी लावा–बाळासाहेब आंबेडकर

**अकोला :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या राज्यभरातील इतर जिल्हे वगळता फक्त अकोला व अमरावती विभागातील बिंदू नामावलीचा प्रश्न अद्याप मार्गी लागला नसल्याने या दोन्ही विभागातील कर्मचाऱ्यांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. बिंदू नामावली अद्यावत नसल्याने कर्मचारी भरती होत नाही , पदोन्नती होत नाही , स्थायीकरण व व बदल्याही होत नाही त्यामुळे कर्मचाऱ्यांमधे प्रचंड असंतोष निर्माण झाला असल्याने काही कर्मचाऱ्यांनी व कर्मचारी संघटनांनी हि समस्या वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा माजी. खा. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांची अकोला येथील ''यशवंत भवन'' या निवासस्थानी भेट घेतली असता बाळासाहेब आंबेडकर यांनी सहायक आयुक्त मागासवर्गीय कक्ष अमरावती विभाग अमरावतीचे वैशाली पाथरे यांच्याशी भ्रमणध्वनीवर चर्चा करून अकोला व अमरावती विभागातील बिंदू नामावली तात्काळ अद्यावत करून कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्याच्या सुचना केल्या तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत गभणे यांच्याशी संपर्क करून अकोला व अमरावती विभागातील बिंदू नामावली अद्यावत करण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सुचना केल्या. यावेळी राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसह महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटनाचे विभागीय अध्यक्ष गणेश डांगे,विभागीय सचिव रूपम वाघमारे, विभागीय अध्यक्ष सिताराम भिसडे , विभागीय सचिव उदय गंगाखेडकर, महाराष्ट्र एस. टी. कामगार सेना, अकोला विभागाचे विभागीय अध्यक्ष संजय इंगळे, कास्ट्राईब रा. प. कर्मचारी संघटना विभागीय सचिव नंदरत्न खंदारे, इतर पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

# वाहनचालकावर पोलिसी बळ! कामरगाव पोलिसांची 'बिना एफआयआर' दहशत

## अन्न–पाण्याशिवाय तासन्तास बेकायदेशीर बंदी, पैशांची मागणी आणि मारहाण; पोलीस अधीक्षकांकडे थेट तक्रार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**वाशीम : दि. १९ :** विवाह सोहळ्यासाठी जात असलेल्या एका युवकाला आणि त्याच्या वाहनचालकास केवळ किरकोळ अपघातानंतर कामरगाव पोलीस चौकीत नेऊन एफआयआर नोंदविल्याशिवाय तासन्तास अन्न-पाण्याविना डांबून ठेवत, पैशांची मागणी करून मारहाण केल्याची गंभीर घटना १६ मे रोजी घडली आहे. या प्रकरणी आलेगाव (ता. पातूर) येथील रहिवासी अभिषेक भगवान धाईत (वय २४) यांनी पोलीस अधीक्षक, वाशीम यांच्याकडे थेट लेखी तक्रार दाखल केली असून, दोषी पोलिसांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

अभिषेक धाईत व त्यांचा चालक आशीष काळदाते हे एम.एच-२०-डी.जे.-५६०२ क्रमांकाच्या पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर गाडीतून आलेगावहून कामरगाव (ता. कारंजा लाड) येथे लग्नासाठी जात होते. वाटेत एका दुचाकीस्वाराने अचानक ब्रेक लावल्यानं सौम्य अपघात झाला. कोणतीही तक्रार नसताना व एफआयआरही नोंदलेला नसताना कामरगाव पोलीस चौकीतील अधिकाऱ्यांनी अभिषेक व चालकाला बेकायदेशीररीत्या चौकीत ताब्यात घेतले. दुपारी २.३० पासून रात्री ८.३० वाजेपर्यंत त्यांना कोणतीही कारण न देता चौकीतच बसवून ठेवण्यात आले. या काळात त्यांना पिण्यास पाणीही देण्यात आले नाही. याप्रसंगी पोलिस कर्मचारी शेखर तायडे आणि दिनकर खांडेकर यांनी पीडितांकडून पैशांची मागणी केली. पैसे न दिल्याने दोघांना बेदम मारहाण करण्यात आली. या प्रकारास पीएसआय अंकुश वडदकार यांचा पाठिंबा असल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. या मारहाणीत अभिषेक धाईत यांना हाताला गंभीर इजा झाली असून हात सुजलेला आहे. घटनास्थळी सचिन मुर्तडकर, गोपाल काळदाते, महेश काठोळे, मुकिंदा करपे व अविनाश महाजन हे साक्षीदार उपस्थित होते. संपूर्ण प्रकार कामरगाव चौकीतील सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झालेला असल्याचे पीडितांचे म्हणणे आहे.

संविधानाच्या अनुच्छेद २१ नुसार कोणत्याही व्यक्तीला त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित करता येत नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने डी.के. बासू विरुद्ध स्टेट ऑफ वेस्ट बंगाल या प्रकरणात अटक व चौकशी दरम्यान व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या स्पष्ट मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. परंतु या प्रकरणात त्या सर्व नियमांची पायमल्ली झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या गंभीर प्रकारानंतर अभिषेक धाईत यांनी पोलीस अधीक्षक वाशीम यांच्याकडे लेखी तक्रार सादर केली आहे. यामध्ये दोषी पोलीस कर्मचाऱ्यांवर एफआयआर नोंदवून, त्यांच्यावर विभागीय व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच सीसीटीव्ही फुटेज जप्त करून चौकशीत समाविष्ट करावे, चौकीची रोजनिशी व ड्युटी डायरी ताब्यात घेऊन सखोल तपास करावा, अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

## देवनागर येथील बालविवाह यशस्वीरित्या रोखला

### दिग्रस पोलिसांची धडक कारवाई; आयोजकांचे धाबे दणाणले

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**दिग्रस, दि.१९:** दिग्रस पोलिसांनी तालुक्यातील देवनगर येथे रविवारी (दि. १८) आयोजित एका अल्पवयीन मुलीचा बालविवाह उधळून लावत कौतुकास्पद कामगिरी केली आहे. सोळा वर्षे वय असलेल्या मुलीला अठरा वर्षे पूर्ण होईपर्यंत विवाह करता येणार नाही, अशी सक्त ताकीद पोलिसांनी तिच्या कुटुंबीयांना दिली.

दिग्रस देवनगर येथे १८ मे रोजी दुपारी बारा वाजता एका अल्पवयीन मुलीचा विवाह होणार असल्याची गोपनीय माहिती पोलिस निरीक्षक सेवाानंद वानखेडे यांना मिळाली होती. त्यावरून, त्यांनी सहायक पोलिस निरीक्षक गोविंद पांडव, उपनिरीक्षक विनेश जाधव, रामराव मुजुमले, मिथुन जाधव यांच्या पथकासह रविवारी सकाळी दहा वाजताच, विवाह सोहळ्याच्या दोन तास आधी, घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी बालिकेच्या वयाच्या पुराव्याची पडताळणी केली असता, तिचे वय १६ वर्षे १ महिना ३ दिवस असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे, हा बालविवाह रोखण्यासाठी पोलिसांनी तत्काळ सूचनापत्र देऊन, मुलगी १८ वर्षांची होईपर्यंत विवाह न करण्याबाबत समज दिली व प्रतिबंध घातला. कुटुंबीयांना जिल्हा बाल संरक्षण समिती, यवतमाळ येथे उपस्थित राहण्याचे निर्देशही देण्यात आले. यापूर्वी दिग्रस पोलिसांनी वाई (लिंगी) येथीलही एक बालविवाह रोखला होता.

## जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या लवकरच होणार बदल्या

### वर्ग ३ कर्मचाऱ्यांची समुपदेशनाव्दारे बदली प्रक्रिया

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. १९ :** जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील वर्ग ३ मधील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय आणि विनंतीवरील बदल्यांची प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली आहे. आता सुधारित वेळापत्रकानुसार २२ व २३ मे रोजी समुपदेशनाद्वारे कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या १५ मे २०१४ रोजीच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेअंतर्गत गट क (वर्ग ३) कर्मचायांच्या बदल्यांचे धोरण निश्चित करण्यात आले. त्यानुसार जिल्हा परिषद प्रशासनामार्फत कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय व विनंतीवरून बदली प्रक्रियेसाठी यापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार १९ व २० मे रोजी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया राबविण्यात येणार होती. मात्र, १९ व २१ मे रोजी मुंबई मंत्रालयात आयोजित बैठकांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनामार्फत कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. सदर बदली प्रक्रिया २२ व २३ मे रोजी जिल्हा परिषदेच्या संविधान सभागृहात राबविण्यात येणार आहे. यामध्ये २२ मे रोजी जिल्हा परिषद बांधकाम विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, कृषी विभाग व अर्थ विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय व विनंतीवरील बदलीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर २३ मे रोजी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग, महिला बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग, पंचायत विभाग व शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांची समुपदेशनाद्वारे प्रशासकीय व विनंतीवरील बदली प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

## हरू येथील वननिवासी नागरिकांना तातडीने पट्टे द्या

### पालकमंत्री संजय राठोड : जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**यवतमाळ , दि. १९ :**दारव्हा तालुक्यातील हरू येथील जे नागरिक अनेक वर्षांपासून वनविभागाच्या जागेवर वास्तव्यास आहेत. आणि कायदेशीररीत्या पट्टे मिळण्यास पात्र आहेत, त्यांना तातडीने पट्टे द्या, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री संजय राठोड यांनी प्रशासनाला दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात पट्टे वाटपाबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस आमदार किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, यवतमाळचे उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे, दारव्हाचे उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी, दारव्हा गटविकास अधिकारी तसेच वनविभागाचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री राठोड म्हणाले की, हरू येथील काही कुटुंबे अनेक वर्षांपासून वनविभागाच्या जागेवर राहत आहेत. यापैकी आदिवासी समाजाच्या नागरिकांना पट्टे देण्यात आले असून, उर्वरित नागरिकही पट्टे मिळण्यास पात्र आहेत. त्यांच्यासाठी आवश्यक कागदपत्रे व पुरावे गोळा करून नियमानुसार तातडीने कारवाई करावी व लवकरात लवकर पट्टे वाटप करावे. या नागरिकांना घरकुले मंजूर झाली असली, तरी जमीन त्यांच्या नावे नसल्याने त्यांची घरे रखडली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे, दारव्हा उपविभागीय अधिकाऱ्यांनी वास्तव्याचे आवश्यक पुरावे जमा करून युद्धस्तरावर कार्यवाही करावी, अशा सूचनाही पालकमंत्री राठोड यांनी दिल्या.

## अकोला येथून हजारो कार्यकर्ते जन आक्रोश मोर्चा मुंबईला रवाना

**देवरी :** आज अकोला जिल्ह्यातील हजारो मातंग समाजाचे कार्यकर्ते मुंबईला आपापल्या परीने रवाना झालेले आहेत. सकल मातंग समाजाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे त्यामुळे विविध राज्यांमधून मातंग समाजाची आणि नेते गण मंडळी व कार्यकर्ते पाच लाख लोकांचा आकडा आझाद मैदानावरपार करण्याची शक्यता आहे..

सूत्रांच्या माहितीनुसार अनेक राज्यातील मातंग समाज हा एक वटून मुंबई येथे आझाद मैदानावर मुक्कामी थांबलेला आहे. मातंग समाजाला याची जाण आहे समाजाच्या हक्कासाठी न्यायासाठी अस्तित्वासाठी हे आंदोलन आपल्या सन्मानाचे आहे आपल्या अस्तित्वाचे आहे त्यामुळे पाच लाख लोकांचा आकडा पार होणारच असे कळले आहे.. शासनाला सुद्धा मातंग समाजाचा विसर पडत चालला आहे. आता सत्ता भाजप सरकारची आहे तेव्हा सरकारला अण्णाभाऊ साठे च्या स्मारकापासून तर अनेक विषयांपर्यंत जाणीव झाली होती

## आमदार सई डहाके जनता दरबारात कारंजेकराचे प्रश्न मार्गी लावणार

**नागरिकांनी आपल्या समस्या व जनहिताचे कामे त्यांच्या पर्यंत पोहचविण्याचे आवाहन**

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**कारंजा : दि. १९ :** कारंजा मानोरा विधानसभा मतदार संघाच्या पहिल्या आणि विशेष म्हणजे स्थानिक आमदार श्रीमती सईताई डहाके ह्या पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आल्यामुळे राजकारणात नविन असल्या तरी,स्थानिक मतदार संघाच्या विकासाकरीता विकासयोध्दे माजी आमदार स्व.प्रकाशदादा डहाके यांनी मतदार संघाच्या व स्थानिक जनतेच्या विकासाकरीता केलेले राजकारण जवळून पाहिले आहे. शिवाय माई आमदार सईताई ह्या मनमिळाऊ,मायाळू,बोलक्या, हास्यमुख असल्यामुळे आणि सदैव सर्वसामान्य ग्रामस्थामध्ये राहणाऱ्या असल्यामुळे त्यांना सर्वसामान्य,गोरगरीब जनतेचे, वयोवृद्ध,दिव्यांग आणि लाडक्या बहिणीचे प्रश्न कोणते ? त्यांच्या अडचणी कोणत्या ? समस्या कोणत्या ? याची पुरेपूर माहिती आहे.गोरगरीब नागरिकांच्या मागण्या सर्वसाधारणतः किरकोळ असतात.किंवा सामाजिक व सार्वजनिक हिताच्या असतात.

त्यामुळे आपल्या मतदारांनी स्वतः जातीने त्या आपल्या पर्यंत पोहोचवाव्यात. विशेषतः मतदार संघातील जनतेशी प्रत्यक्ष संवाद साधता यावा.असे त्यांना वाटत असते.तसेच मतदार संघाच्या समस्यांची त्यांना चांगलीच जाण आहे.त्यामुळे ह्या समस्या, मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांच्या मार्फत आपल्या सरकार कडून व पक्षश्रेष्ठींकडून सोडविण्याकडे त्यांचा कल आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या या महत्वाकांक्षी छत्रपती शिवाजी महाराज समाधान बैठकीद्वारे जनता दरबाराचे आयोजन त्यांच्या प्रमुख उपस्थितीत, दि. २१ मे २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता स्थळ : शेतकरी निवास, मंगरूळपिर रोड, बायपास कारंजा येथे करण्यात आले आहे. विशेष करून जनतेच्या समस्या शक्य तेवढ्या लवकर सोडविण्याकरीता यावेळी स्थानिकचे सर्व शासकीय कार्यालयाचे अधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी, बँकेचे व्यवस्थापक, विद्युत विभागाचे अभियंता वगैरे यावेळी उपस्थित असण्याची शक्यता आहे. त्यामुळे तत्पूर्वी सोमवार, मंगळवार पर्यंत कारंजेकर माता भगीनी व नागरिकांनी आपल्या समस्या, तक्रारी कारंजा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती आठवडी बाजार कारंजा येथील जनसंपर्क कार्यालय किंवा तहसिल कार्यालयात लेखी स्वरूपात अर्जाद्वारे सादर कराव्यात असे आवाहन करण्यात आल्याची माहिती ज्येष्ठ पत्रकार संजय कडोळे यांनी मिळाली असल्याचे कळवीले आहे. आमदार सईताई डहाके यांच्या ह्या जनता दरबाराने जनतेच्या अनेक तक्रारी निकाली किंवा मार्गी लागण्यास मदत होणार आहे.

**विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची प्रांतीक कार्यकारिणीची सभा**

## अमरावती विभाग शिक्षक मतदार संघात लवकरच अधिकृत उमेदवाराची घोषणा–आ. सुधाकर अडबाले

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. १९ :** विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची विदर्भ कार्यकारी मंडळाची सभा नुकतीच अकोला येथील शासकीय विश्रामगृहामध्ये दि.११ मे २०२५ ला उत्साहात संपन्न झाली. सभेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिक्षक आमदार तथा विमाशी संघाचे सरकार्यवाह सुधाकर अडबाले, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सरचिटणीस, माजी आमदार व्ही.यू.डायगव्हाणे तर अध्यक्षस्थानी प्रांताध्यक्ष अरविंद देशमुख प्रमुख उपस्थितीमध्ये प्रांतिक कार्यकारिणी पदाधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सभेमध्ये विषय पत्रिकेनुसार महाराष्ट्र राज्य विधान परिषद अधिवेशन दिनांक ३० जून २०२५ पासून सुरू होत आहे त्या अनुषंगाने तारांकित लक्षवेधी प्रश्नाबाबत चर्चा करण्यात आली. संघटनेकडे प्राप्त अनेक समस्यांना सभागृहामध्ये वाचा फोडण्यासाठी पाठपुरावा करण्याचे ठरले. सभासद नोंदणी विशेष अभियान राबवणे व झालेल्या नोंदणीचा आढावा घेण्यात आला. १५ मार्च ची संचमान्यता व शिक्षण क्षेत्रातील इतर ज्वलंत समस्यांबाबत चर्चा करण्यात आली.तसेच यासाठी भविष्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा संकल्प करण्यात आला.अमरावती विभागातील सर्व जिल्हा, तालुका अधिवेशन व कार्यकारणीचे निवड करण्याबाबत चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ येथे प्रतिनिधी पाठवण्याबाबत ठराव संमत करण्यात आला. सभेला माजी आमदार व्ही.यू. डायगव्हाणे यांनी मार्गदर्शन करून मौलिक सूचना केल्या. यावेळी बोलताना आमदार तथा सरकार्यवाह सुधाकर अडबाले यांनी अमरावती विभाग शिक्षक मतदार संघात लवकरच विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या घटनेनुसार, लोकशाही पद्धतीने अमरावती विभागात सक्षम उमेदवार देण्याचे सुतोवाच केले.

सभेला प्रांतीय उपाध्यक्ष सर्वश्री रमेश काकडे, जयदीप उर्फ जयकुमार सोनखासकर, विजय ठोकळ, विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, कोषाध्यक्ष भूषण तल्हार, अकोला जिल्हाध्यक्ष जी.आय. शहा, कार्यवाह नितीन गायकवाड, महानगराध्यक्ष अजय काळे, अमरावती जिल्हाध्यक्ष दशरथ रसे, कार्यवाह आशिष इंगळे, अमरावती महानगराध्यक्ष अतुल देशमुख, कार्यवाह अरविंद चौधरी, यवतमाळ जिल्हाध्यक्ष पवन बन, बुलढाणा जिल्हाध्यक्ष विष्णू अवचार,कार्यवाह सतीश शेळके, नागपूर जिल्हाध्यक्ष अनिल गोतमारे, कार्यवाह संजय वारकर, नागपूर शहर अध्यक्ष विठ्ठल जुनघरे, कार्यवाह अविनाश बढे, चंद्रपूर ग्रामीण कार्यवाह सुनील शेरकी,दिगम्बर कुरेकर, महानगर सुरेंद्र अडबाले, वर्धा जिल्हाध्यक्ष विष्णू ईटनकर, कार्यवाह महेंद्र सालनकर, भंडारा जिल्हाध्यक्ष सुधाकर देशमुख, कार्यवाह राजेश धुर्वे, गडचिरोली रवींद्र नैताम, कार्यवाह अजय लोंढे,गोंदिया जिल्हा, दीपक थोपटे, ए.एस.गुप्ता, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## स्वस्त धान्य दुकानातील तांदूळ खुल्या बाजारात घेऊन जाणारे वाहन बाळापूर पोलिसांनी पकडले



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**बाळापुर, दि. १९ :** गोरगरिबांना धान्य मिळावे यासाठी शासन स्तरावरून लाभार्थींना गहू आणि तांदूळ वितरित केल्या जातो मात्र सदर गहू आणि तांदूळ खुलेआम खरेदी करून त्याचा काळाबाजार केल्या जात असल्याची घटना नुकतीच बाळापुर येथील आहे दिनांक १६ /५/ २०२५ ला उघडकीस आली यामध्ये बाळापुर पोलिसांनी स्वस्त धान्य दुकानातील तांदूळ खुल्या बाजारात वाहतूक करत असताना महिंद्रा मॅक्स गाडी क्रमांक ३७२७८६ वाहन ताब्यात घेतले सदर वाहनांमध्ये शासकीय तांदळाचे कट्टे आहेत तर शासकीय कट्ट्यामधून सदरचा तांदूळ दुसऱ्या कट्ट्यामध्ये टाकून खुल्या बाजारात विक्री करण्यासाठी शक्कल लढवली असल्याची चर्चा होत आहे तर ज्या शासकीय कट्ट्यामध्ये शासकीय तांदूळ भरला जातो ते रिकामी कट्ट्यांचा बारदाना सुद्धा महसूल विभागाला आढळल्याचे बोलले जात आहे तर तीन दिवसापासून तांदळाने भरलेला महिंद्रा मॅक्स गाडी बाळापुर पोलीस स्टेशन मध्ये ताब्यात घेतलेला आहे तर सदर पिकअप चालक आणि पिकअप मालक कोण आहे? यांची नावे उघड का केली जात नाहीत? असा सवाल उपस्थित होत आहे. ही कारवाई बाळापुर पोलीस अधिकारी यांनी केली आहे तर याबाबत पोलीस प्रशासन महसूल विभागाचा अहवाल येण्याची प्रतीक्षा करीत आहे.या प्रकरणी पोलीस प्रशासन कधी गुन्हा दाखल करणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | 12 | 9 | 3 | 0 | 0 | 18 | +0.795 |
| बेंगलुरु | 12 | 8 | 3 | 0 | 1 | 17 | +0.482 |
| पंजाब | 12 | 8 | 3 | 0 | 1 | 17 | +0.389 |
| मुंबई | 12 | 7 | 5 | 0 | 0 | 14 | +1.156 |
| दिल्ली | 12 | 6 | 5 | 0 | 1 | 13 | +0.260 |
| कोलकाता | 13 | 5 | 6 | 0 | 2 | 12 | +0.193 |
| लखनौ | 11 | 5 | 6 | 0 | 0 | 10 | -0.469 |
| हैदराबाद | 11 | 3 | 7 | 0 | 1 | 7 | -1.192 |
| राजस्थान | 13 | 3 | 10 | 0 | 0 | 6 | -0.701 |
| चेन्नई | 12 | 3 | 9 | 0 | 0 | 6 | -0.992 |

# साई सुदर्शनच्या शतकाच्या जोरावर गुजरातचा विजय



**नवी दिल्ली : दि. १९ प्रतिनिधी**

साई सुदर्शन आणि शुबमन गिल यांच्यातील विक्रमी भागीदारीच्या जोरावर, गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सचा १० विकेट्सने ऐतिहासिक विजय मिळवत प्लेऑफमध्ये एन्ट्री मारली आहे. गुजरातच्या विजयसाह आरसीबी आणि पंजाब किंग्जही प्लेऑफमध्ये पोहोचले आहेत. आता चौथ्या स्थानासाठी तीन संघांत स्पर्धा आहे.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने केएल राहुलच्या शतकाच्या जोरावर २०० धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात गुजरातने साई सुदर्शनच्या शतकाच्या जोरावर एकही विकेट्स न गमावता ऐतिहासिक विजय नोंदवला.२०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, गुजरातने चांगली सुरुवात केली, साई सुदर्शन आणि शुबमन गिल यांनी शेवटपर्यंत लय कायम ठेवली. दोघांमध्ये २०५ धावांची नाबाद भागीदारी झाली. कोणत्याही सलामी जोडीने केलेली ही तिसरी सर्वोच्च भागीदारी आहे. याआधी, गिल आणि सुदर्शन यांनी आयपीएल २०२४ मध्ये २१० धावांची भागीदारी केली होती. लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातचा हा दुसरा सर्वात मोठा विजय आहे. साई सुदर्शनने ६१ चेंडूत १०८ (१२ चौकार, ४ षटकार) धावांची नाबाद खेळी केली, तर शुबमन गिलने ५३ चेंडूत ९३ (७ षटकार, ३ चौकार) धावा केल्या. दिल्लीला हरवून गुजरातने प्लेऑफमधील आपले स्थान निश्चित केले आहे. सुदर्शनने षटकार मारून गुजरातला प्लेऑफचे तिकीट मिळवून दिले.तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने २० षटकांत ३ गडी गमावून १९९ धावा केल्या होत्या. केएल राहुलने संघासाठी शानदार फलंदाजी केली आणि नाबाद शतक झळकावले.

राहुलने ६५ चेंडूत ११२ धावांची नाबाद खेळी केली. राहुलने त्याच्या खेळीदरम्यान १४ चौकार आणि ४ षटकार मारले. त्याच वेळी, अभिषेक पोरेलने १९ चेंडूत ३० धावा केल्या. कर्णधार अक्षर पटेलने १६ चेंडूत २५ धावा फटकावल्या, तर शेवटच्या षटकात ट्रिस्टन स्टब्सने १० चेंडूत दोन षटकारांच्या मदतीने नाबाद २१ धावा फटकावल्या.



# केएल राहुलने विराटचा विक्रम मोडत रचला इतिहास!

**नवी दिल्ली : दि. १९ प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ मध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून खेळणाऱ्या केएल राहुलने एक नवा विक्रम रचला. तो टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद ८००० धावा पूर्ण करणारा भारतीय खेळाडू बनला आहे. याआधी हा विक्रम विराट कोहलीच्या नावावर होता. विराटने २४३ डावांमध्ये ही कामगिरी केली.

पण आता केएल राहुलने २२४ डावांमध्ये ८००० धावा पूर्ण करून विराटचा हा विक्रम मोडला आहे. गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात त्याने ही कामगिरी केली. या सामन्यात ३३ धावा करत केएल राहुलने टी-२० स्वरूपात ८००० धावांचा टप्पा गाठला.एकूण आकडेवारीबद्दल बोलायचे तर, टी-२० फॉरमॅटमध्ये सर्वात जलद ८००० धावा करण्याचा विक्रम युनिव्हर्स बॉस ख्रिस गेलच्या नावावर आहे.

त्याने केवळ २१३ डावांमध्ये ही कामगिरी केली. या यादीत पाकिस्तानचा बाबर आझम दुसऱ्या स्थानावर आहे. बाबरने २१८ डावांमध्ये ही कामगिरी केली. आता केएल राहुलचे नाव तिसऱ्या स्थानावर आले आहे, ज्याने २२४ डावांमध्ये हा विक्रम केला. विराट कोहली (२४३ डाव) चौथ्या स्थानावर आहे आणि मोहम्मद रिझवान (२४४ डाव) पाचव्या स्थानावर आहे.



# एमएस धोनी सोशल मिडीयावर ट्रोल

**नवी दिल्ली : दि. १९ प्रतिनिधी**

आयपीएल पुन्हा सुरू झाली आहे पण या सीजनमध्ये चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने काही विशेष कामगिरी केली नाही. चेन्नई सुपर किंग्जचे सुरुवातीला कर्णधार पद हे ऋतुराज गायकवाडकडे देण्यात आले होते. त्यानंतर तो दुखापतग्रस्त झाला त्यामुळे त्याला आयपीएलमधून बाहेर पडावे लागले. सध्या चेन्नई सुपर किंग्स कर्णधारपद हे एमएस धोनीकडे सोपवण्यात आले आहे. सध्या एक ट्रेंड एक्सवर म्हणजेच आधीचे ट्विटरवर व्हायरल होत आहे. हे एमएस धोनीच्या निगडित आहे त्यामुळे नक्की का त्या संदर्भात आम्ही तुम्हाला सविस्तर सांगणार आहोत.एमएस धोनी आयपीएल २०२५ मध्ये सीएसकेसाठी अद्भुत कामगिरी करत आहे. तो या संघाचे नेतृत्वही करत आहे. तथापि, प्लेऑफच्या शर्यतीतून सीएसकेचा प्रवास संपला आहे. आयपीएल २०२५ मध्ये १८ मे रोजी आरसीबी विरुद्ध केकेआर यांच्यातील सामना खेळवण्यात येणार होता. पण पावसामुळे सामना रद्द करण्यात आला. यादरम्यान, स्टार स्पोर्ट्सच्या लाईव्ह शोमध्ये हरभजन सिंगने एमएस धोनीच्या चाहत्यांचे खूप कौतुक केले. भज्जी म्हणाला की, जर कोणत्याही खेळाडूचे खरे चाहते असतील तर ते फक्त धोनीच आहेत. बाकी सर्व फेक आहेत. आता हरभजनचे हे विधान सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. यानंतर, विराट कोहलीच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर एमएस धोनीला ट्रोल करायला सुरुवात केली. सोशल मीडियावर विराट कोहली फॅन्स नावाच्या अनेक वापरकर्त्यांनी एमएस धोनीबद्दल वादग्रस्त गोष्टी लिहिल्या.



# ट्रॅव्हिस हेड कोविड पॉझिटिव्ह!

**नवी दिल्ली : दि. १९ प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ पुन्हा एकदा शुभारंभ झाला आहे, सांगायचे झाले तर भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये वाढलेल्या तणावामुळे आयपीएल काही काळासाठी स्थगित करण्यात आली होती. आता पुन्हा एकदा आयपीएल सुरू झाली आहे. सनराइजर्स हैदराबादच्या संघाने या सीजनमध्ये अत्यंत निराशा जनक कामगिरी केली मागील सीझनमध्ये ते २०२४ मध्ये उपविजेता ठरले होते पण या सीजनमध्ये त्यांनी त्यांचे चाहत्यांना निराश केले आहे. संघाचा सलामीवीर फलंदाज ट्रॅव्हिस हेड काही विशेष कामगिरी करू शकला नाही.सोमवारी सनरायझर्स हैदराबाद आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यातील आयपीएल २०२५ चा ६१ वा सामना खेळला जाईल. रविवारी सामन्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत, सनरायझर्स हैदराबादचे मुख्य प्रशिक्षक डॅनियल व्हेटोरी यांनी ट्रॅव्हिस हेडबाबत एक मोठी अपडेट दिली. लखनौ सुपर जायंट्स विरुद्धच्या सामन्यात हेड निवडीसाठी उपलब्ध राहणार नसल्याचे प्रशिक्षकांनी सांगितले आहे. तो म्हणाला की त्याला कोविड झाला आहे, त्यामुळे त्याला भारतात येण्यास उशीर होत आहे.ऑस्ट्रेलियन फलंदाजाला संसर्ग कधी आणि कुठे झाला याबद्दल हैदराबादच्या मुख्य प्रशिक्षकांनी कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. ०

हेटोरी म्हणाले की, हेड सोमवारी भारतात पोहोचेल आणि त्यानंतर वैद्यकीय पथक त्याची तपासणी करेल. ''ट्रॅव्हिस उद्या सकाळी येत आहे, त्याला उशीर झाला आहे,'' विट्टोरी यांनी न्यूज१८ ला सांगितले. त्याला कोविड झाला होता. तर, तो उद्या सकाळी येईल आणि त्यानंतर आम्ही त्याची प्रकृती कशी आहे ते पाहू. ''

# १० वर्षांची प्रतीक्षा फळाला: पंजाब किंग्ज प्लेऑफसाठी ठरला पात्र

**नवी दिल्ली : दि. १९ प्रतिनिधी**

रविवार १८ मे रोजी आयपीएल २०२५ च्या ५९ व्या सामन्यात मध्ये डबल हेडर सामना खेळवण्यात आला होता. ज्यामध्ये संध्याकाळी गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सला पराभूत केले आणि आरसीबी आणि पंजाब किंग्जसह प्लेऑफमध्ये प्रवेश मिळवला. पहिल्या सामन्यात, श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालीळ पंजाब संघाने राजस्थान रॉयल्सचा पराभव करून प्लेऑफसाठी स्वतःचे स्थान मजबूत केले. नंतर, गुजरातने उर्वरित काम पूर्ण करून टाकले आणि पंजाबचा १० वर्षांचा दुष्काळ संपुष्टात आला.आयपीएल२०२५ च्या ५९ व्या सामन्यात राजस्थान रॉयल्स विरुद्ध पंजाब किंग्ज सामना रंगला होता. यामध्ये पंजाबने प्रथम फलंदाजी करत २१९ धावा केल्या होत्या. प्रतिउत्तरात राजस्थान रॉयल्सचा संघ २०९ धावांचा करू शकला आणि परिणामी त्या संघाला पंजाबकडून १० धावांनी पराभव पत्करावा लगाला. या विजयाने पंजाब किंग्ज प्लेऑफच्या खूप जवळ पोहोचले. यानंतर, गुजरात टायटन्सने दिल्लीला हरवताच, पंजाबला प्लेऑफमध्ये प्रवेश मिळाला. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली चमकदार कामगिरी करत पंजाब संघाने १० वर्षांनंतर आयपीएल प्लेऑफमध्ये स्थान पटकावले आहे. पंजाबच्या संघाने २००८ मध्ये पहिल्यांदाच प्लेऑफमध्ये प्रवेश मिळवला होता.



पंजाब किंग्ज प्लेऑफमध्ये पोहोचताच कर्णधार श्रेयस अय्यरने कर्णधारपदात एक अनोखा विक्रम केला आहे. प्लेऑफमध्ये तीन वेगवेगळ्या संघांचे नेतृत्व करणारा अय्यर पहिला कर्णधार ठरला आहे. याआधी कोणत्याही कर्णधाराला आयपीएलमध्ये अशी मोठी कामगिरी करता आलेली नाही. पंजाबपूर्वी, अय्यरने दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्सनाही प्लेऑफमध्ये पोहोचवले होते.अय्यरने कर्णधार असताना दिल्ली कॅपिटल्सला आयपीएल २०२० च्या अंतिम फेरीत नेले होते, तेव्हा संघ विजेतेपद जिंकण्यात अपयशी ठरला होता. गेल्या हंगामात, त्याच्या नेतृत्वाखाली, कोलकाता संघाने केवळ प्लेऑफमध्ये प्रवेश केला नाही तर आयपीएलचे जेतेपद देखील आपल्या नावे केले होते.

आता अय्यरकडे पंजाबला चॅम्पियन बनवण्याची उत्तम संधी चालून आली आहे.आयपीएल २०२५ च्या १८ व्या हंगामात पंजाब किंग्जचे आता लीग टप्प्यात २ सामने शिल्लक आहेत. संघ २४ मे रोजी दिल्ली कॅपिटल्स आणि त्यानंतर २६ मे रोजी मुंबई इंडियन्सशी सामना करणारा आहे. या दोन्ही सामन्यांमध्ये, पंजाब जिंकून पॉइंट टेबलमध्ये टॉप-२ मध्ये स्थान मिळवण्याचा प्रयत्न करताना दिसून येणार आहे.

## सेन्सेक्स २७१ अंकांनी घसरून बंद



कमकुवत जागतिक संकेत, आयटी शेअर्समधील विक्रीमुळे भारतीय शेअर बाजारात सोमवारी (दि. १९ मे) दबाव राहिला. सेन्सेक्स- निफ्टी घसरणीसह बंद झाले. सेन्सेक्स २७१ अंकांनी घसरून ८२,०५९ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक ७४ अंकांच्या घसरणीसह २४,९४५ वर स्थिरावला.

निफ्टी रियल्टी, पीएसयू बँक, फार्मा आणि ऑटो शेअर्समध्ये खरेदी राहिली. तर आयटी शेअर्समध्ये विक्रीचा दबाव दिसून आला. निफ्टी आयटी १.३ टक्के घसरून बंद झाला. आंतरराष्ट्रीय क्रेडिट रेटिंग संस्था मूडीजने अमेरिकन सरकारचे क्रेडिट रेटिंग डाऊनग्रेड केले आहे. या पार्श्वभूमीवर आयटी कंपन्यांचे शेअर्स घसरल्याचे बाजारातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

आज रियल्टी शेअर्समध्ये जोरदार तेजी राहिली. निफ्टी रियल्टी २.२ टक्के वाढला. तर निफ्टी ऑटो निर्देशांक सलग चौथ्या दिवशी वाढून बंद झाला. फार्मा निर्देशांकही वधारला.बीएसई सेन्सेक्सवर इर्टनलचा शेअर्स ३ टक्के घसरला. इन्फोसिस, टीसीएस, टेक महिंद्रा, रिलायन्स, एशियन पेंट्स हे शेअर्स १ ते २ टक्क्यांपर्यंत घसरले. एचसीएल टेक, अदानी पोर्ट्स, टायटन, ॲक्सिस बँक हे शेअर्समध्ये काही प्रमाणात विक्रीचा दबाव राहिला. तर दुसरीकडे पॉवर ग्रिड, बजाज फायनान्स, एनटीपीसी, एसबीआय, एचडीएफसी बँक हे शेअर्स तेजीत राहिले. गेल्या आठवड्यात दमदार तेजीत राहिलेले संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांचे शेअर्स आज घसरले. या शेअर्समध्ये आज प्रॉफिट बुकिंग दिसून आले. विशेषतः कोचीन शिपयार्ड, माझगाव डॉक शिपबिल्डर्स आणि हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड () चे शेअर्स सर्वाधिक घसरले. बाजारातील अस्थिरता आणि गुंतवणूकदारांमधील भिती दर्शवणारा इंडिया दिवसभरात ११ टक्क्यांनी वाढला.

# अमेरिका रेमिटन्सवर ५ टक्के कर लादणार

**नवी दिल्ली : दि. १९ प्रतिनिधी**

अमेरिकेने परदेशी नागरिकांकडून पाठवलेल्या पैशांवर ५ टक्के कर लादण्याच्या प्रस्तावावर भारतात चिंता वाढत आहे. आर्थिक संशोधन संस्था ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह () ने रविवारी म्हटले आहे की यामुळे भारतीय कुटुंबे आणि रुपयाचे नुकसान होऊ शकते.एका अंदाजानुसार, या करामुळे अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांवर दरवर्षी १.६ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त बोजा पडू शकतो. ही तरतूद १२ मे रोजी अमेरिकन प्रतिनिधी सभागृहात सादर करण्यात आलेल्या 'द वन बिग ब्युटीफुल बिल' नावाच्या व्यापक कायदेविषयक पॅकेजचा एक भाग आहे.याचा परिणाम ग्रीन कार्ड आणि एच१बी व्हिसा धारकांसह ४ कोटींहून अधिक लोकांवर होईल. प्रस्तावित शुल्क अमेरिकन नागरिकांना लागू होणार नाही. जीटीआरआयने म्हटले आहे की, ''अमेरिकेतील नागरिक नसलेल्या लोकांकडून परदेशात पाठवलेल्या पैशांवर कर लावण्याचा प्रस्ताव भारतात चिंता निर्माण करत आहे कारण जर ही योजना कायदा बनली तर भारताला वार्षिक अब्जावधी डॉलर्सचे परकीय चलनाचे नुकसान होईल.''




''पाच टक्के कर रेमिटन्सच्या खर्चात लक्षणीय वाढ करू शकतो,'' असे जीटीआरआयचे संस्थापक अजय श्रीवास्तव म्हणाले. जर रेमिटन्स दरवर्षी १०-१५ टक्क्यांनी कमी झाले तर भारताला १२-१८ अब्ज डॉलर्सचे नुकसान होईल.त्यांनी सांगितले की या नुकसानीमुळे भारताच्या परकीय चलन बाजारात अमेरिकन डॉलरचा पुरवठा कमी होईल, ज्यामुळे रुपयावर दबाव येईल. ''चलन स्थिर करण्यासाठी रिझर्व्ह बँकेला अधिक वेळा हस्तक्षेप करावा लागू शकतो,'' श्रीवास्तव म्हणाले. यामुळे, रुपया प्रति अमेरिकन डॉलर १-१.५ रुपयांनी कमकुवत होऊ शकतो.रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया () च्या मार्च बुलेटिनमध्ये प्रकाशित झालेल्या एका लेखानुसार, २०२३-२४ मध्ये भारताला अमेरिकेतून एकूण ३२.९ अब्ज डॉलर्सचे रेमिटन्स मिळाले. यातील पाच टक्के रक्कम १.६४ अब्ज डॉलर होईल. आरबीआयच्या लेखात म्हटले आहे की, पैसे पाठवणे हे प्रामुख्याने कुटुंबाच्या पालनपोषणासाठी वापरले जात असल्याने, त्यांच्या खर्चात वाढ झाल्याने त्याचे सामाजिक-आर्थिक परिणाम होतात. हा खर्च कमी करणे हा जागतिक स्तरावर एक महत्त्वाचा धोरणात्मक अजेंडा राहिला आहे.

# सोन्या-चांदीच्या दरात घसरण



**नवी दिल्ली : दि. १९ प्रतिनिधी**

१९ मे रोजी आज भारतात २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ९,५१२ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ८,७१९ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ७,१३४ रुपये आहे.

१८ मे रोजी भारतात २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ९,५१३ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ८,७२० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ७,१३५ रुपये होता.भारतात आज २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ८७,१९० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ९५,१२० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ७१,३४० रुपये आहे. भारतात काल २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ८७,२०० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ९५,१३० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ७१,३५० रुपये होता. भारतात आज चांदीचा भाव प्रति ग्रॅम ९६.९० रुपये आणि प्रति किलोग्रॅम ९६,९०० रुपये आहे. भारतात काल चांदीचा भाव प्रति ग्रॅम ९७ रुपये आणि प्रति किलोग्रॅम ९७,००० रुपये होता.

# अमेरिकेने भारतीय आंब्यांच्या १५ शिपमेंट केल्या परत

**नवी दिल्ली : दि. १९ प्रतिनिधी**

अमेरिकेने लॉस एंजेलिस, सॅन फ्रान्सिस्को आणि अटलांटा विमानतळांवर भारतीय आंब्यांच्या १५ शिपमेंट नाकारल्या. यामुळे निर्यातदारांना ४ कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले आहे. आंब्यांच्या कागदपत्रांमध्ये अनियमितता आढळून आल्याने, अमेरिकन अधिकाऱ्यांनी त्यांना नष्ट करण्याचे किंवा परत पाठवण्याचे आदेश दिले आहेत. निर्यातदारांनी सांगितले की आंबा हा नाशवंत पीक आहे आणि परतावा खर्च जास्त आहे, म्हणून तो अमेरिकेतच नष्ट करण्यात आला.अमेरिकेत फळे आयात करण्यासाठी विकिरण प्रक्रिया अनिवार्य आहे. या प्रक्रियेत फळांचे जंतू मारले जातात. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निर्यातदाराला २०३ फॉर्म (कीटक नियंत्रण प्रमाणपत्र) जारी केला जातो. भारतात, ही प्रक्रिया नवी मुंबई येथील एका प्लांटमध्ये (यूएस डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चर) च्या देखरेखीखाली होते.८-९ मे रोजी येथून आंब्यावर प्रक्रिया केल्यानंतर २०३ फॉर्म जारी करण्यात आला. जेव्हा ही शिपमेंट अमेरिकेत पोहोचली तेव्हा अधिकाऱ्यांना कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्या. अमेरिकेच्या कृषी विभागाच्या मते, २०३ फॉर्म चुकीच्या पद्धतीने भरण्यात आला होता, ज्यामुळे शिपमेंट नाकारण्यात आले. परंतु ही चूक कीटकांच्या उपस्थितीशी संबंधित नव्हती, तर फॉर्म भरताना झालेल्या चुकांमुळे झाली. निर्यातदार म्हणतात की त्यांना इरॅडिएशन प्लांटच्या चुकांची किंमत मोजावी लागत आहे. एका व्यापाऱ्याने सांगितले की, २०३ फॉर्म फक्त अधिकाऱ्यांकडून जारी केला जातो. जर उपचार झाले नसते तर हा फॉर्म उपलब्ध झाला नसता. चूक झाल्यास मुंबई विमानतळावरून शिपमेंट क्लिअर केले जात नाही.



दुसऱ्या व्यापाऱ्याने सांगितले की, ९ ते ११ मे दरम्यान लॉस एंजेलिस विमानतळावर त्याचा माल थांबवण्यात आला होता आणि नंतर तो नष्ट करण्याचे आदेश देण्यात आले. व्यापारी म्हणतो की आम्ही सर्व नियमांचे पालन केले, तरीही आम्हाला नुकसान सहन करावे लागले.या घटनेमुळे व्यापाऱ्यांचे सुमारे ५ लाख डॉलर्स (सुमारे ४.२ कोटी रुपये) नुकसान झाले आहे. अमेरिका ही भारतीय आंब्यांची मोठी बाजारपेठ आहे. या प्रकरणात, कृषी आणि प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण () ने सांगितले की हे प्रकरण महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ () शी संबंधित आहे, त्यांच्याशी संपर्क साधा.

अजिंक्य भारत
# आपलं नागपूर
मंगळवार, दि. २० मे २०२५



# शासकीय रुग्णालयात विविध प्रकल्पांचे लोकार्पण

## दर्जेदार उपचार सुविधांसाठी प्रयत्न, आधुनिक संसाधनांची उभारणी करण्यावर भर, यंत्रसामुग्रीसाठी प्रशासनास पाठपुरावा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १९:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिकलसेल व थॅलेसेमिया संपुष्टात आणण्यासाठी पावले उचलली आहेत. या दुर्धर आजाराच्या विळख्यातून रुग्णांना मुक्त करण्यासाठी शासकीय महाविद्यालयात दर्जेदार उपचार सुविधांच्या निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, अशी हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.




शासकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे जवळपास ७० कोटी खर्चून निर्माण करण्यात आलेल्या विविध सुविधा व विकास कामांचे लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार शामकुमार बर्वे, आमदार कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, संदीप जोशी, कृपाल तुमाने, अभिजीत वंजारी, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये, संचालक डॉ.अजय चंदनवाले, सहसंचालक विवेक पाकमोडे, मुख्य अभियंता दिनेश नंदनवार आदी उपस्थित होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या दोन्ही वैद्यकीय संस्था मध्य भारतातील मोठ्या स्वरूपाच्या आहेत. सर्व स्तरातील रुग्ण येथे उपचारासाठी येतात. मात्र, आधुनिक काळाशी अनुरूप अद्ययावत सुविधा उपलब्ध करण्याची गरज भासू लागल्याने येथे आधुनिक संसाधनांची उभारणी करण्यावर भर देण्यात येत आहे. विविध पायाभूत सुविधांमुळे गुणात्मकतेत वाढ होणार आहे. या दोन्ही संस्थांमध्ये सुविधा निर्मिती आणि अद्ययावत उपचारासाठी जवळपास हजार कोटी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच, या संस्था आधुनिक भारतातील 'स्टेट ऑफ आर्ट'वैद्यकीय संस्था म्हणून नावारूपाला याव्यात, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

### लोकार्पण आणि उद्‌घाटन

- २५० निवासी डॉक्टरांसाठी वसतिगृह
- ट्रॉमा इमारत ते बाह्य रुग्ण विभागाला जोडणारा स्काय वॉक
- ऑडिटोरियम
- गंभीर आजारांचे निदान करणारी यंत्रणा न्यूक्लिअर स्कॅन
- कार्डियाक कॅथ लॅब
- रोबोटिक सर्जरी सिस्टीम
- न्यूक्लियर मेडिसिन सिस्टीम
- स्मार्ट क्लास रूम
- संबंधित इतर सुविधा

रुग्णालयांना समाजातील आशेचे केंद्र म्हणून बघितल्या जाते. वैद्यकीय उपचार व शिक्षण क्षेत्रात या दोन्ही संस्था अग्रेसर राहाव्यात तसेच खाजगी संस्थांच्या तुलनेत येथील शिक्षण, सुविधा व उपचार अधिक दजेर्दार असावे असे सांगून श्री फडणवीस यांनी बाह्यरुग्ण तपासणी कक्ष, शस्त्रक्रिया विभाग, वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीसुविधांच्या निर्मितीवर प्राधान्याने भर द्यावा,अशी सूचना केली. यातूनच नजीकच्या काळात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा कायापालट झालेला दृष्टीस पडेल, असे ते म्हणालेमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (आयजीएमसी) येथे मेगा डायलिसिस सेंटर व रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी तीन व्हर्चुअल स्मार्ट वर्गखोल्या तयार झाल्या असून, उर्वरित चार वर्ग खोल्यांना मान्यता देण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शविली. रुग्णालय व महाविद्यालयाला आवश्यक त्या विविध यंत्रसामग्रीच्या उभारणीबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा करण्याच्या सूचना केल्या. रुग्णालयातील काही कामांना मान्यता मिळाली; परंतु निधी प्राप्त करण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया तातडीने करण्याचे आदेश त्यांनी संबंधितांना दिले. अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण यांनी रुग्णालयात कार्यान्वित विविध कक्षांची माहिती देणारे सादरीकरण केले.

---

## थोडक्यात

### कर ऑनलाईन भरल्यास सवलत

**नागपूर :** चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता करवसुलीचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने उचललेल्या पावलांना करदात्यांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. येत्या ३० जूनपर्यंत कराचा ऑनलाईन भरणा केल्यास १५ टक्के तर कार्यालयात कर भरणाऱ्यांना १० टक्के कर सवलत मिळणार आहे. मागील मार्च महिन्यात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या प्रस्तावित अर्थसंकल्पात मालमत्ता कराची वसुली ४०० कोटी रुपये करण्याचे उद्दीष्ट आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी ठेवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध पावले उचलले असून, वसुलीसाठी तिमाहीचे उद्दीष्ट निश्चित केले आहे. करदात्यांना कर सवलत देण्यासाठी डॉ. अभिजीत चौधरी यांनी विशेष योजना जाहीर केली आहे. यात चालू वर्षाचा मालमत्ता कर ३० जून २०२५ पर्यंत ऑनलाईन भरल्यास त्यावर करदात्यांना थेट १५ टक्के कर सवलत तत्काळ प्राप्त होणार आहे. तसेच, मनपा कार्यालयांमध्ये काऊंटवर भरणा केल्यास करदात्यांना १० टक्के सवलतीचा फायदा मिळणार आहे.

### बिरसा क्रांती दलाची बैठक

**नागपूर :** नागपुरातील रविभवन येथे बिरसा क्रांती दलाचे संस्थापक व अध्यक्ष दशरथ मडावी यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. क्रांती बिरसा दलाच्या वतीने आदिवासी सन्मान परिषद यवतमाळात ९ जून २०२५ रोजी बिरसा मुंडा जयंती निमित्ताने आयोजित केली आहे यानिमित्ताने रविभवनात ही बैठक पार पडली. यावेळी महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा करण्यात आली. डी बी अंबुरे, संतोष चांदेकर, धनराज मसराम, डॉ.अर्जुन कोडापे, सागर कोकर्डे, नलिनी गेडाम यांच्यासह नवीन पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

### विशेष सत्र येत्या गुरूवारी

**नागपूर:** व्हीआयए-एचआरडी फोरम आणि एनआयपीएम नागपूर चॅप्टर यांनी संयुक्तरित्या 'अकार्यक्षमता-एचआर स्केल' या विषयावर विशेष सत्र येत्या २२ मे रोजी सायंकाळी ६.१५ वाजता उद्योग भवन येथे आयोजित केले आहे. जयस्वाल नेको इंडस्ट्रिज लिमिटेड, नागपूरचे अध्यक्ष (एचआरएम) डॉ. दिलीप मोहंती या विषयावर विचार व्यक्त करतील. कामातील निरसता कशी कमी करावी, नेतृत्वपद्धती वाढवणारी धोरणे कशी अंमलात आणावीत, नियमित अभिप्राय आणि मान्यता, काम-जीवन संतुलनाला प्रोत्साहन आणि व्यावसायिक विकासाच्या संधी कशा द्याव्यात याबद्दल ते मार्गदर्शन करतील. सदरचे उपाय कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेला प्रोत्साहन देत असून, कामाचा ताण कमी करण्यात मोठी भूमिका बजावतात. सत्रात सहभागी होण्यासाठी संघटनांचे सदस्य, उद्योगपती, उद्योजक, एचआर व्यावसायिक / व्यवस्थापक, व्यवस्थापन विद्यार्थी यांना सहभागी होता येणार आहे.

## निधन

### रामासरे विश्वकर्मा यांचे निधन



**नागपूर :** कळमना येथील रहिवासी रामासरे विश्वकर्मा यांचे निधन झाले. ते मृत्यूसमयी ६१ वर्षांचे होते. त्यांच्यावर शांतीनगर घाटावर अंतिम संस्कार पार पडले. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, सुना, नातवंडे आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

---

# सर्वसामन्यांच्या कामांना तत्काळ प्राधान्य द्या : पालकमंत्री

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १९:** विविध विभागातील प्रशासनाने सर्व सामन्यांच्या कामांना तत्काळ प्राधान्य द्यावे, असे आवाहन पालकमंत्री महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.



शासन स्तरावरील नागरिकांच्या समस्या आणि त्यांचे प्रश्न मार्गी लावावेत या उद्देशाने नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जनसंवाद' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. ज्या संवेदनेने शासन तळागाळातील सर्वसामान्यांपासून समाजातील सर्व घटकासाठी योजना आखते, शासन निर्णय काढते, लोककल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून मदतीसाठी तत्पर राहते,ती तत्परता प्रशासनाच्या माध्यमातून प्रत्ययास आली पाहिजे. लोकांचे प्रश्न त्या-त्या स्थानिक पातळीवर, संबंधित कार्यालयाद्वारे तत्काळ मार्गी लागली तर जनसंवादाला लोकांना यायची वेळ पडणार नाही,या शब्दांत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. लोकांची कामे तत्काळ व्हावी ही अपेक्षा चुकीची नाही. प्रत्येक नागरिकांचे शासनाशी सदैव काम पडते असेही नाही. अनेक शेतकरी नैसर्गिक आव्हानाशी तोंड देत झालेले नुकसान त्याला सोसता यावे. यात काही मदत मिळावी म्हणून शासनाकडे येतात. तहसील कार्यालयाशी संपर्क साधतात. नियमात असणारी कामे तात्काळ मार्गी लागलीच पाहिजेत. यात दिरंगाई होता काम नये असे त्यांनी सांगितले. जनसंवादात आलेली निवेदने ज्या अधिकारी व कार्यालयांना निर्देशित केली आहेत त्याबाबत संबंधितांनी पुन्हा विचारणा केल्यास कठोर कार्यवाही करू, असे ते म्हणाले.

जनसंवाद कार्यक्रमात नागरिकांनी पांदन रस्ते, शेतजमिनीवरील अतिक्रमण, घरकुल योजना, पाणी समस्या, आरोग्य ,समस्या, क्रीडा, सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक व महसूल संबंधित अशा अनेक विषयांवर निवेदने देवून पालकमंत्री बावनकुळे यांच्याशी संवाद साधला.

# सायबर गुन्हे व अतिक्रमण समस्यांवर विशेष चर्चा

## पोलिस अधिकाऱ्यांनी दिला दक्षतेचा सल्ला, 'एमआयए' चे आयोजन



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १९:** औद्योगिक सुरक्षा मजबूत करण्यासाठी तसेच कायदा आणि सुव्यवस्थेत समन्वय वाढवण्याच्या उद्देशाने एमआयडीसी इंडस्ट्रिज असोसिएशनच्या वतीने हिंगणा एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील प्रमुख समस्या सोडवण्यासंदर्भात वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पोलिस उपायुक्त (झोन १) लोहित मतानी यांनी भूषविले. एसीपी सतीश गुरव (एमआयडीसी झोन), एसीपी अशोक शिर्के (सोनेगांव झोन), एमआयडीसी, हिंगणा, वाडी, सोनेगाव, प्रतापनगर आणि बजाजनगर पोलिस ठाण्यांमधील वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुख्यत्वे उपस्थित होते. एमआयएचे अध्यक्ष पी. मोहन यांच्याशिवाय औद्योगिक प्रतिनिधी म्हणून कॅप्टन रणधीर, गणेश जयस्वाल, अरविंद कालिया, प्रवीण पालकर, चरण सिंग आणि राकेश गुप्ता यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमात औद्योगिक क्षेत्रातीलरस्ते आणि मोकळ्या जागांवरील अतिक्रमणाबाबत विशेष मंथन पार पडले याअंतर्गत माल वाहतूक, रसद आणि आपत्कालीन/ अग्निशमन सेवांमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या वाढत्या अतिक्रमणांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. यावर उपाययोजना म्हणून महानगरपालिका अधिका०यांशी समन्वय साधून संबंधित भागातील अतिक्रमणधारकांवर त्वरित कारवाई करण्याची ग्वाही पोलिस अधिका०यांनी दिली. चर्चेदरम्यान, सायबरसुरक्षा आणि डिजिटल धोका या मुद्यावरही गांभीर्याने विचार करण्यात आला संपूर्ण उद्योगक्षेत्र दिवसांगणिक अधिकाधिक डिजिटल होत असतानाच सायबर धोका मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे सांगण्यात आले डेटा चोरी, फिशिंग आणि रॅन्समवेअर यासारख्या प्रमुख धोक्यांवर चर्चा करण्यात आली.

### अशा सूचना

- सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असावेत
- सीसीटीव्ही सिस्टममध्ये पुरेशी बॅकअप मेमरी असावी
- विदेशी सायबर हॅकर्सपासून सतर्क राहावे

---

# मनपाच्या दोन नव्या 'रोड स्विपिंग मशीन'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १९:** रस्त्यांची साफसफाई तसेच प्रदूषण कमी करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने आणखी दोन नव्या 'रोड मेकानाईज्ड स्विपिंग मशीन' खरेदी केल्या आहेत. या दोन्ही मशीनचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले.




आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, उपायुक्त राजेश भगत, कार्यकारी अभियंता राजेश दुफारे, स्वच्छता व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. गजेंद्र महल्ले, सहायक आयुक्त सोनम देशमुख उपस्थित होते. नागपूर शहरामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरु आहेत. त्याचप्रमाणे चार पदरी रस्त्यांचे व उड्डाणपुलांचे जाळे देखील वाढत आहेत. परिणामी शहरातील वायू प्रदुषणामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने रस्ते स्वच्छ करण्याकरीता यांत्रिकी पद्धतीचा वापर करून मुख्य रस्ते व उड्डाणपुलांची साफ-सफाई आवश्यक आहे. नवीन तंत्रज्ञानांचा वापर करणे काळाची गरज असल्यामुळे नागपूर महानगरपालिका निधीतून नव्या स्विपिंग मशीन खरेदी केल्या आहेत. २०२२ मध्ये राष्ट्रीय शद्ध हवा कार्यक्रमाअंतर्गत (एनसीएपी) प्राप्त निधीतून दोन मशीन खरेदी करण्यात आलेल्या होत्या. २०२४ मध्ये १५ व्या वित्त आयोगातील अनुदानातून मशीन खरेदी केल्या आहे. ज्या सध्या शहरातील चार पदरी रस्ते व उड्डाणपुलांची सफाई करण्याकरीता वापरण्यात येत आहे. आता नागपूर महापालिकेच्या सेवेत नऊ रोड स्विपिंग मशीन आहेत. तसेच, नागपूर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्यामार्फत सहा रोड स्विपिंग मशीनची मागणी केलेली आहे.

महापालिकेच्या सेवेत दाखल झालेल्या या दोन नवीन मशीन वैशिष्ट्यपूर्ण असून सदर मशीनमध्ये पाण्याचा फवारा असल्याने रस्ता स्वच्छता दरम्यान धुळीचे कण हवेत उडणार नसल्याने हवेतील प्रदुषण कमी होईल. शहरातील कमी रुंदीच्या उड्डाणपुलांची सफाई मनुष्यबळांमार्फत करतांना होणारे अपघाताचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल. या मशीनमध्ये देण्यात आलेल्या सक्शन होज पाईपच्या मदतीने रस्ते सफाई करताना रस्त्यालगत जमा करण्यात आलेल्या कचऱ्यांचे ढिगारे तसेच नागरीकांमार्फत टाकण्यात येणारा कचरा मनुष्यबळाचा वापर न करता मशीनद्वारे सहजरीत्या उचलणे शक्य होणार आहे.

# 'रेरा'मुळे महाराष्ट्रातील रियल ईस्टेट क्षेत्राला विश्वासार्हता : मुख्यमंत्री

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १९:** सुमारे ५० हजार प्रकल्प 'रेरा'अंतर्गत नोंदणी झाले हे आपल्या राज्याचे सर्वात मोठे यश आहे. संपूर्ण देशात नोंदणी झालेल्या प्रकल्पाएवढी ही संख्या आहे. यातून निर्माण झालेली विश्वासार्हता रियल ईस्टेट क्षेत्राला अत्यंत सहायभूत ठरली असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



हॉटेल सेंटर पॉईंट येथे 'नरडेको'च्या नूतन कार्यकारणीच्या पदग्रहण समारंभात ते बोलत होते. अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल, विधानपरिषद सदस्य संदिप जोशी, अभिजित वंजारी, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, माजी खासदार कृपाल तुमाणे, 'नरडेको विदर्भ'चे नूतन अध्यक्ष डॉ. कुणाल पटोले, चेयरमन घनश्याम ढोमणे व इतर मान्यवर उपस्थित होते. सर्वसामान्यांच्या मनात एखादी प्रॉपर्टी, घर, फ्लॅट घेतांना अनेक प्रकाराच्या शंका असतात. या शंकांचे तेवढ्याच पारदर्शिपणे समाधान होणे आवश्यक असते. रियल ईस्टेट क्षेत्राला शासन पातळीवर पारदर्शिपणे सहकार्य व्हावे यादृष्टीने आपण अनेक बदल केले, असे मुख्यमंत्री म्हणाले. 'रेरा'सारखा कायदा देशात सर्वांत अगोदर सुरू केला. 'नरडेको विदर्भ' ही संस्था विकासकांच्या हितासमवेत ग्राहकांच्या हिताला अधिक जपणारी आहे. यात सर्वसामान्यांचे हित अधिक जपल्या जाते. शासनाच्या विविध धोरणांची 'नरडेको' प्रामाणिकपणे अंमलबजावणी करते ही समाधानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. देशाच्या विकासाला रियल ईस्टेटने लावलेला हातभार अधिक महत्वाचा आहे. ६५ टक्के जीडीपी शहरातून आहे हे लक्षात घेवून आम्हीही या क्षेत्रात अधिक पारदर्शकता यावी यादृष्टीने उपाययोजना केल्या आहेत.

---

# कृषिमंत्र्यांची घोषणा; एक राष्ट्र-एक कृषी-एक टीम

## नागपुरात शेतकरी संमेलनाचे आयोजन, समृद्ध किसान पाठोपाठ विकसित व गरिबीमुक्त गाव हे शासनाचे लक्ष

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १९:** आमचे शेतकरी हे मेहनती आहेत. निसर्गाच्या प्रत्येक आव्हानाला ते धैयाने तोंड देतात. आपल्या शेतातील उत्पादनासाठी घाम गाळतात. त्यांच्या घामाला, कष्टाला न्याय देण्यासाठी भारतातील कृषी क्षेत्रासाठी काम करणारे सर्व संशोधक, केंद्र सरकार, राज्य सरकार व सर्व संस्था एकत्र येऊन मिशन मोडवर काम करण्याची गरज आहे. व्यवस्थेतील ही त्रृटी दूर करण्यासाठी एक राष्ट्र-एक कृषी-एक टीम म्हणून कृषी विभाग आता काम करेल, अशी घोषणा केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केली.



ते शेतकरी संमेलनात बोलत होते. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार श्याम बर्वे, आमदार आशिष देशमुख, आमदार चरणसिंग ठाकूर, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कुलगुरु नितीन पाटील, कृषी आयुक्त सुरज मांडरे, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे डॉ. एम. एल. जाट, डॉ.एस. के.सिंग, डॉ.अमरेश कुमार नायर, डॉ.डी.के. यादव, डॉ. राजवीर सिंह व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शेती व शेतक०यांसाठी भारतीय कृषी अनुसंशाधन परिषदेअंतर्गत देशात १६ हजार वैज्ञानिक आहेत. त्यांचे विविध पिकांवर सतत संशोधन सुरू असते. याचबरोबर परिषदेअंतर्गत ११३ संशोधन केंद्र आहेत. यातील ११ केंद्र महाराष्ट्रात आहेत. याचा जोडीला जिल्हा कृषी केंद्र, प्रगतशील शेतकरी, राज्य सरकारचे कृषी कार्यालये आहेत. या सर्व यंत्रणेमध्ये एकसूत्रतेचा अभाव लक्षात घेऊन 'एक राष्ट्र-एक कृषी-एक टीम' या संकल्पनेची नितांत गरज होती, शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले.

कृषी हा भारतीय व्यवस्थेचा कणा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपण गौरवशाली भारत, समृद्ध भारत पाठोपाठ शक्तीशाली भारत निर्माण केला आहे. भारत आता वैभवशाली राष्ट्र म्हणून पुढे आले आहे. याला अधिक भक्कम जर करायचे असेल तर विकसित शेती व विकसित शेतकरी हे तत्व आपण जपले पाहिजे. विकसित खेती व समृद्ध किसान पाठोपाठ विकसित व गरिबीमुक्त गाव हे शासनाचे लक्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

### मुख्यमंत्री फडणवीसांचा गौरव

- मुख्यमंत्री फडणवीस यांनी कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्रात जलसंधारणाची जी कामे केली त्याला तोड नाही. जलयुक्त शिवार महाराष्ट्राला वरदान ठरले. संयम, धैर्य व निश्चयी वृत्तीने त्यांची कार्यशैली कोणत्याही आवाहानात डगमगली नाही, अशा शब्दांत शिवराज सिंह चौहान यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कार्याचा गौरव केला.

### केंद्रीय मंत्री स्वदेशी परतले

**नागपूर, दि. १९:** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी शनिवारी रात्री उशिरा भारतात परतले. ते सरकारच्या काही विशेष कामानिमित्त ब्राझील देशात गेले होते मात्र, त्यांच्या या दौ०याचा फारसा गाजावाजा करण्यात आला नाही, हे विशेष. ब्राझील देशाकडे ब्रिक्स संमेलनाचे अध्यक्षपद असून, येत्या ६ आणि ७ जुलै रोजी ब्रिक्स संमेलनाचा मुख्य कार्यक्रम आहे. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत: सहभागी होणार आहे. मुख्य कार्यक्रमाच्या दोन महिन्यांआधी पंतप्रधान मोदी यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांना ब्राझीलमध्ये पाठविले होते. गडकरी यांनी ब्राझीलमध्ये ब्रिक्स देशातील महत्वपूर्ण नेत्यांसोबत संवाद साधला. यात ग्रीन हायड्रोजन, बायो फ्युल यासह आधुनिक इलेक्ट्रिक वाहनांबाबत चर्चा पार पडली.




अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, मंगळवार, दि. २० मे २०२५




# आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हा प्रशासन 'ॲक्शन मोड'वर

## जिल्ह्यातील ८२ गावांमध्ये संभाव्य पुरस्थितीचा धोका

।श्रीकांत पाचकवडे ।

**अकोला, दि. १६ : जिल्ह्यातील ८२ गावांमधील संभाव्य पुरस्थिती नियंत्रणासाठी जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे. या गावात संभाव्य पुरस्थितीवर तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित सर्व यंत्रणांना दिले असल्याची माहिती सुत्रांनी दिली.**

जिल्ह्यात पावसाळ्याच्या दिवसात नदी, नाल्यांना पुर आल्याने अनेक गावांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. गत वर्षी अतिवृष्टी आणि पुरामुळे जिल्ह्यातील ५१२ घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान आणि १५ मानवी मृत्यू झाले होते. जिल्ह्यातील सर्वात मोठी पुर्णा नदी असुन या नदीला इतर नद्या मिळतात. अमरावती जिल्ह्यातील चंद्रभागा, चारगड, शहानुर, पुर्णा या प्रकल्पाचे विसर्गाचे पाणी पूर्णा नदीत येते. तसेच जिल्ह्यातील काटेपुर्णा, मोर्णा, पोपटखेड प्रकल्पाचे विसर्गाचे पाणी पुर्णा नदीत मिळते, त्यामुळे पुरस्थिती निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्तीय हानी होत असते.

यावर्षी आपत्ती निवारणासाठी जिल्हा प्रशासनाकडून नियोजनबद्ध तयारी करण्यात आली आहे. यामध्ये तहसील स्तरावर प्रती तहसिल २० लाईफ जॅकेट, २० लाईफ रिंग, १०० मिटर रोप, अकोट, मुर्तिजापूर तहसिलमध्ये इन्फेटेबल बोट वोबीएमसह, विभागीय अधिकारी १, प्रती तहसिल ३ सर्च लाईट, इमर्जन्सी लाईट, केळीवेळी, दोनवाडा येथे एचडीपीई ६ सीटर बोट विथ वोबीएम उपलब्ध करून देण्यात आले असुन जिल्हाधिकारी कार्यालयस्तरावर दोन रबर बोट, १० लाईफ जॅकेट, १० लाईफ बोया, १ रोप-रेस्क्यु किट, २ सर्चलाईट, १ एअर पम्प उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पोलिस विभाग, होमगार्ड, नगरपरिषद, अग्निशमन विभाग, महानगरपालिका प्रशासनाकडे सुद्धा हे सर्व साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासोबतच पुरबाधित गावामध्ये तात्पुरते शाळांमध्ये निवारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.



### १०८ टोल फ्री वर ॲम्ब्युलन्स

वैद्यकीय मदतीसंदर्भात १०८ टोल फ्री क्रमांकावर ॲम्ब्युलन्स सेवा उपजिल्हा रुग्णालयात १, तालुका ग्रामीण रुग्णालयात ५, प्राथमिक आरोग्य केंद्रात ३१ ॲम्ब्युलन्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासोबतच जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, मेडीकल कॉलेज, उपजिल्हा, तालुका ग्रामीण आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर ठेवण्यात आली आहे.

### पूर बाधित गावे

**अकोला तालुका :** म्हैसांग, एकलारा, कपीलेश्वर, वडद बु., दोनवाडा, धामना, चांगेफळ, म्हैसपुर, चांदुर, सांगवी बु. कुरणखेड, सांगवी बु, गोत्रा, आगर,
**बार्शिटाकळी तालुका :** चिंचखेड, निंभोरा, तामशी, खांबोरा, वरखेड, वाघजळी, दोनद खु, टाकळी, राजंदा, सुकळी, वरखेड, सिंदखेड
**अकोट तालुका :** केळीवेळी, किनखेड, पळसोद, पनोरी, पिलकवाडी, कुटासा, मुंडगाव, अकोट, करोडी, वरूर
**तेल्हारा तालुका :** मन्नात्री बु. डवला, तळेगाव वडनेर, तळेगाव पातुर्डा, नेर, सांगवी, उमरी, पिवंदळ, दानापूर, सौंदळा, वारखेड
**बाळापूर तालुका :** वाडेगाव, बाभुळखेड, कासारखेड, हाता, अंदुरा, लोहारा, कवठा, हातरूण, रिधोरा, सोनाळा
**पातुर तालुका :** पास्टुल, भंडारज खु, आगिखेड, कोठारी बु, चोंढी, विवरा, आलेगांव, वहाळा बु, सस्ती, तुलंगा
**मुर्तिजापूर तालुका :** हेंडज, पिंगळा, कोळसरा, भटोरी, दातवी, सांगवी, दुर्गवाडा, दापूरा, हिवरा कोरडे, लाखपुरी, माना, खांदला, पोही, उनखेड

# न्यायालयाच्या आदेशानंतरही मनपाची कारवाई नाही

## ८३ हजार चौरस फूट जागेवरील भाडे वसुलीचे प्रकरण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १९ :** चार जिन कंपाऊंड परिसरात महापालिकेच्या ८३ हजार चौरस फूट जागेवर बेकायदा कब्जा केल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महापालिकेच्या बाजूने निकाल देत ही जागा तातडीने ताब्यात घेण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे तब्बल ६२ वर्षांनंतर महापालिकेला या मालमत्तेवर ताबा मिळाला आहे मात्र, या आदेशानंतरही मनपा प्रशासनाला या जागेवर बांधलेली ३० ते ४० निवासस्थाने आणि १२ व्यावसायिक गोदामे रिकामी करता आलेली नाहीत. याशिवाय, रेडीरेकनर दरानुसार निर्धारित भाडे वसूल करण्याची प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे. दोन महिने उलटून गेले तरी महापालिकेकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.ही जागा तत्कालीन नगर पालिकेने गणेशदास गुलाबचंद यांना १९३१ साली ३० वर्षांसाठी भाडेतत्त्वावर दिली होती. भाडेतत्त्वाची मुदत १९६० मध्ये संपली, परंतु पालिकेला ती जागा ताब्यात घेता आली नाही. गुलाबचंद कुटुंबाने ही मालमत्ता तोष्णीवाल कुटुंबाकडे हस्तांतरित केली. १९८० मध्ये पुन्हा पालिकेने ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रकरण पुढे जाऊ शकले नाही. २००९ मध्ये तत्कालीन आयुक्त गिरीधर कुर्वे यांनी यासंदर्भात नोटीस बजावली होती. या प्रकरणी तोष्णीवाल कुटुंबीयांनी अकोला जिल्हा न्यायालयात दावा दाखल केला, मात्र २०११ मध्ये न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निकाल दिला. यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानेही महापालिकेच्या बाजूने निकाल दिला. २३ ऑगस्ट २०२२ रोजी न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी ही जागा महापालिकेला देण्याचे निर्देश दिले. या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांचे स्थलांतर करून १२ गोदामे रिकामी करून घेण्याची जबाबदारी महापालिकेची होती. परंतु अद्यापही कुठलीही कारवाई झाली नाही.चार जिन कंपाऊंड परिसरात २३ हजार चौरस फूट जागेवर ८ निवासी घरे आणि १२ व्यावसायिक गोदामे आहेत. नियमानुसार महापालिकेने या धारकांकडून २ टक्के आणि व्यावसायिक वापरकर्त्यांकडून १० टक्के भाडे वसूल करायचे होते. परंतु, महिना उलटून गेला तरी प्रशासनाने ना रेडीरेकनर दरानुसार भाडे वसूल केले, ना गोदामे व घरे रिकामी केली, यावरून प्रशासनाची निष्क्रीयता व उदासिनता दिसून येते.

# बेपत्ता मुलाचा मृतदेह नदीपात्रात सापडला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १९ :** तालुक्यातील आगर येथील धनगरपुरा प्लॉटमधून बेपत्ता झालेला तुषार भूषण गव्हाळे (४) याचा मृतदेह सोमवारी सायंकाळी नदीच्या पात्रात तरंगताना आढळून आला. तुषार दिनांक १९ मे २०२५ रोजी सकाळी अचानक घराजवळून बेपत्ता झाला होता.

त्यावेळी तो लाल रंगाची टी-शर्ट, काळ्या रंगाची हाफ पँट परिधान केलेला होता आणि वर्णाने सावळा होता. बालक बेपत्ता झाल्यानंतर गावात आणि परिसरात शोधमोहीम राबवण्यात आली होती. मात्र दुर्दैवाने त्याचा मृतदेह दोन दिवसांनी नदीपात्रात सापडल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. बालक बेपत्ता झाल्या प्रकरणी अकोट फाईल पोलीस ठाण्यात नोंद घेण्यात आली होती.

या प्रकरणी अधिक तपास सुरू असून, मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी शवविच्छेदन करण्यात येणार आहे.

































## थोडक्यात

### ए.एन.एस.इन्फोव्हॅली आय.टी.आय. विद्यार्थ्याची 'विद्युत सहायक पदी' निवड

**खामगाव :** संपूर्ण विदर्भातील सर्वोकृष्ट औद्योगिक शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या ए.एन.एस. इन्फोव्हॅली आय टी आय खामगाव येथील दुर्गेश राजेश पांधी ,वैभव मिलींद भुजबळ व विशाल नारायण दिवटे, संजय मनोहर फलके यांनी महापारेषण महाराष्ट्र राज्य यांचे वतीने घेण्यात आलेल्या निवड लेखी परीक्षेत उत्तुंग यश मिळवत त्यांांनी आपली '' विद्युत सहाय्यक'' या पदी निवडीस पात्रता पूर्ण केली आहे. आजपर्यंत ए.एन.एस. इन्फोव्हॅली आय. टी. आय. चे शेकडो विद्यार्थी महाराष्ट्रराज्य विद्युत निर्मिती व पारेषण कंपनीत निवडल्या गेलेले आहेत. दुर्गेश राजेश पांधी, वैभव मिलींद भुजबळ व विशाल नारायण दिवटे यांनी यशाची परंपरा कायम ठेवत '' महापारेषण'' मध्ये विद्युत सहाय्यक पदी नोकरी प्राप्त केली आहे.त्यांच्या मिळविलेल्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत असून त्यांच्या भावी आयुष्यासाठी संस्था अध्यक्ष प्रा. डॉ अनिल अमलकार, तसेच प्राचार्य तथा सर्व शिक्षकवृंद यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### खाजगी आस्थापनांनी शी-बॉक्स प्रणालीवर नोंदणी करावी

**बुलडाणा :** केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने शी-बॉक्स ऑनलाईन तक्रार व्यवस्थापन प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीवर सर्व खाजगी आस्थांपनानी नोंदणी करावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा अधिकारी यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिक छळ (प्रतिबंध, संरक्षण व निवारण) अधिनियम २०१३ नुसार प्रत्येक खाजगी आस्थापनांमध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी असतील अशा सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. यासाठी खाजगी आस्थापनांनी कार्यालयात गठीत केलेली तक्रार निवारण समितीची नोंदणी शी-बॉक्स प्रणालीवर करण्याचे केंद्र शासनाने निर्देश आहे. अशी करा नोंदणी : शी-बॉक्स अंतर्गत तक्रार समितीची माहिती नोंदविण्यासाठी संकेतस्थळावर जाऊन होम पेजवर अंतर्गत तक्रार समिती या टॅबवर क्लिक करुन माहिती या टॅबवर दिलेल्या सूचना वाचून संपूर्ण माहिती भरुन सबमीट करावी.

### मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु

**बुलडाणा :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग अंतर्गत लोणार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृहात सन २०२५-२६ करीता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आले आहे. त्यानुसार शालेय, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन, व्यावसाईक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवर्गनिहाय अनुसूचित जाती ८५ टक्के, आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्ग ५ टक्के, अनुसूचित जमाती ३ टक्के, वि.जा.भ.ज. ५ टक्के विशेष मागास प्रवर्ग २ टक्के आरक्षित जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, लोणार गृहपाल यांनी केले आहे.

# पेनटाकळीकरांच्या घरांचे स्वप्न होणार साकार

## केंद्रीयमंत्री जाधव यांच्या प्रयत्नांन यश, प्रकल्पग्रस्तांनी मांडले मंत्री महोदयांचे आभार

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा , दि.१९**

गेल्या ३५ वर्षांपासून रखडलेल्या पेनटाकळी पुनर्वसन प्रकल्पाचा अखेर निर्णायक निकाल लागला असून, मौजे पेनटाकळी गावातील ४०१ नागरिकांना हक्काचे घर बांधण्यासाठी प्लॉट चे वितरण केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. या दोन्ही नेतृत्वाने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. १९९८ पासून प्रलंबित असलेल्या पुनर्वसन प्रश्नासाठी गावकऱ्यांनी बारा दिवस प्रकल्पाच्या काठावर गावठाण हद्दवाढीसाठी



उपोषण केले होते.केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांनी मागील अनेक वर्षे पासून लक्ष घालून प्रशासकीय पातळीवर व मंत्रालय येथे पाठपुरावा केला होता शासनाच्या मान्यतेनंतर ७ हेक्टर ८२ आर जागेवर एकूण ४०१ भूखंड तयार करण्यात आले. नियोजित आराखड्यानुसार समाजनिहाय या प्लॉट्सचे वाटप गावकऱ्यांना करण्यात आले असून केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी स्वतः गावात जाऊन लाभार्थ्यांशी व गावकऱ्यांशी संवाद साधला व समस्या दूर केल्या आहेत.

यावेळी तहसीलदार निलेश मडके,सहाय्यक गटविकास अधिकारी डी.एम.जाधव, कृषी अधिकारी संदीप मेटांगळे, विस्तार अधिकारी शिवाजी पंडागळे, मंडळ अधिकारी गजानन ढोके,तलाठी सागर जायगुडे,ग्रा.पं.अधिकारीडी. बी.काळे,मोहन मगर, गजानन लहाने,जी.पी.मवाळ,सरपंच संघटनेचे अध्यक्ष अरुण दळवी,शिवसेनेचे पंजाबराव इंगळे,पुंजाजी इंगळे,भुंजगराव इंगळे, संतोष डुकरे,अमोल म्हस्के,सरपंच, ग्रामस्थ, प्रशासनाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेगावात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**शेगाव दि.१९**

येथील भारतीय जनता पक्ष , सकल नागरिक व विविध हिंदूवादी संघटनांच्या वतीने भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीच्या माध्यमातून देशभक्तीचा जागर करताना नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपाचे शहराध्यक्ष ज्ञानेश्वर आप्पा साखरे यांनी केले आहे. रॅली मंगळवारी सकाळी ९ वाजता लहुजी वस्ताद साळवे चौक येथून सुरु होणार असून, शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करणार आहे. या रॅलीत तरुणाई, महिला, नागरिक, समाजसेवक आणि विद्यार्थी यांनी देशप्रेमाचा संदेश देण्यासाठी




मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रॅलीमध्ये तिरंगा झेंडे, घोषणाबाजी, देशभक्तीपर गीतं व घोषवाक्ये यांचा समावेश असणार आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक संघटनांनी जोरदार तयारी केली आहे. रॅली लहुजी वस्ताद चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, गांधी चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक, रेल्वे स्टेशन, एम एस ई बी चौक, जगदंबा चौक,वाटीका चौकातून जिजामाता चौक परिसरात समारोप होणार आहे.

## सामूहिक विवाह सोहळा थाटात संपन्न

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**साखरखेर्डा दि.१९**

रुढी परंपरा यांना फाटा देऊन विवाह सोहळ्यात होणारा अनाठायी खर्च टाळण्यासाठी सामुहिक विवाह सोहळा गरजेचे आहे . सहकार महर्षी स्व भास्करराव शिंगणे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दरवर्षी या सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते . या संस्थेने जामाजिक दायीत्वाची भुमिका पार पाडून ग्रामीण भागातील वडगावमाळी येथे हा विवाह सोहळा आयोजित केला हे महत्वाचे आहे . असे प्रतिपादन सेवानिवृत्त गटविकास अधिकारी गजानन पाटोळे यांनी केले.

वडगावमाळी येथील सहकार महर्षी स्व भास्करराव शिंगणे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते . या विवाह सोहळ्यात मागासवर्गीय आणि ओ बी सी समाजातील ३० जोडप्यांचा सामुहिक विवाह सोहळा थाटामाटात साजरा झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच दत्तात्रय गवई हे होते. तर हिवरा आश्रम येथील प्राचार्य तथा साहित्यिक पंढरीनाथ शेळके , हिवरा साबळे येथील सरपंच अरुण पोपळघर, गजानन पायघन, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सागर पाटोळे, मोहन गवई , श्रीकृष्ण सास्ते, दत्तात्रय पोफळे , रामदास पंखुले , राजू गवई , लिंगा येथील सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष संजय चेके उपस्थित होते. या विवाह सोहळ्याचे आयोजन भास्करराव शिंगणे बहुउद्देशीय

## खविसं निवडणुकीसाठी ३३ उमेदवार रिंगणात

### आज चिन्ह वाटप

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**संग्रामपूर दि.१९**

संग्रामपूर तालुका शेतकी सह.संस्थेच्या १५ संचालक मंडळाच्या जागेसाठी ३१ मे रोजी निवडणूक होत असून आज १९ मे रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ३३ उमेदवार रिंगणात उरले आहेत. यामध्ये दोन पॅनलच्या उमेदवारांसह ३ अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. उद्या २० मे रोजी या उमेदवारांना चिन्ह वाटप होणार आहे.

संग्रामपूर खविसंच्या १५ जागेसाठी ११३ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. आज १९ मे रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी तब्बल ७२ उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळे १५ जागेसाठी ३३ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. निवडणुकीसाठी २ पॅनल तयार झाले असून ३ अपक्ष उमेदवार रिंगणात राहिले आहेत.

सदर निवडणूक मे रोजी होणार असून यामध्ये ८ हजारावर सभासद मतदार आहेत. १ जुन २०२५ रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महेश कृपलानी काम पाहत आहेत.

## मोताळ्यात चार दुकानांना आग लागून लाखोंचे नुकसान

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मोताळा दि.१९**

मोताळा येथील आठवडी बाजार परिसरातील खरबडी रोडवरील जय भवानी किराणा दुकानासह लगतच्या चार दूकानांना अचानक भीषण आग लागली. ही घटना शनिवारी १७ मे रोजी रात्री १२:३० वाजेच्या सुमारास घडली. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

माहिती मिळताच आग विझवण्यासाठी बुलडाणा आणि मलकापूरचे अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले.

मोताळा येथील मुख्य बाजार पेठेतील खरबडी रोडवरील जय भवानी किराणा दुकान, हेअर सलून,जय दुर्गा इलेक्ट्रॉनिक्स व ओम टेलरिंग या ४ दुकानांना अचानक आग लागली. ही बाब लक्षात येताच नागरिकांनी आग विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत केले.दोन टँकरच्या माध्यमातून आगीवर पाण्याचा मारा करण्यात आला. मात्र आगीने रौद्ररूप धारण केले होते.

दरम्यान, बुलडाणा व मलकापूर येथील अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. जवळपास दोन तासांच्या अथक प्रयतानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. या आगीत संबंधीत दुकान मालकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तलाठी जाधव यांनी आज रविवारी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला आहे.

## लक्ष्मीनारायण कॉलेजमध्ये ऑनलाइन प्रवेशाची प्रक्रिया सुरु

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.१९**

खामगाव येथील नामांकित लक्ष्मीनारायण इंटरनॅशनल ज्युनियर कॉलेजमध्ये महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार या वर्षीच्या शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी वर्ग ११ वी ऑनलाइन प्रवेश अर्ज रजिस्ट्रेशन करणे, ऑप्शन फॉर्म भरणे इत्यादी साठी २१ मे २०२५ पासून सुरुवात होत असून लक्ष्मीनारायण इंटरनॅशनल ज्युनियर कॉलेजच्या कार्यालयामध्ये दिनांक २१.५.२०२५ सकाळी १०:०० ते ०५.०० या वेळेत मोफत ऑनलाइन प्रवेश अर्ज रजिस्ट्रेशन करणे, प्रवेश अर्ज, ऑप्शन फॉर्म भरणे सुरू राहणार आहे.

शिक्षण संचालनालय द्वारा प्रकाशित प्रवेश फेरी क्र. १ वेळापत्रकानुसार दिनांक २१ मे सकाळी ११ वाजेपासून इ. ११वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेस सुरुवात होत असून अर्ज भरण्याची अंतिम तारीख २८ मे सायंकाळी ६ वाजे पर्यंत राहील. ३० मे ला सकाळी ११ वाजता तात्पुरती



सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर होईल. ३० मे ते १ जून सायंकाळी ४ पर्यंत गुणवत्ता यादीतील हरकती आणि सुधारणा करण्याकरिता वेळ दिला जाईल. ३ जून सायंकाळी ४ वाजता गुणवत्ता यादी अंतिम मंजुरी प्रकाशित होईल. ५ जून रोजी गुणवत्ता यादी आधारे निवड व वाटप प्रक्रिया , शून्य फेरी मध्ये व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत कोटा, अल्पसंख्यांक कोटा मधील विद्यार्थी वाटप, विभागीय समितीद्वारे तपासणी केली जाईल. ६ जून सकाळी १० वाजता प्रवेश फेरीसाठी उच्च माध्यमिक विद्यालय निहाय वाटप यादी जाहीर केली जाईल. ६ जून ते १२ जून पर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता विद्यार्थ्यांना मान्य असलेल्या विद्यालयास वर क्लिक करणे आवश्यक आहे. १४ जून रात्री १० पर्यंत फेरी क्र. २ साठी रिक्त जागांची यादी जाहीर होईल. अशा प्रकार शिक्षण संचालनालय द्वारा प्रकाशित प्रवेश फेरी क्र. १. वेळापत्राक जाहीर झाले असून विद्यार्थ्यांच्या सोई करिता लक्ष्मीनारायण इंटरनॅशनल ज्युनियर कॉलेज , डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोर, रेल्वे स्टेशनच्या बाजुला खामगाव या कार्यालयामध्ये मोफत ऑनलाइन प्रवेश अर्ज भरणे सुरू राहणार आहे.

## अवैध बायो डिझेल पंप त्वरित बंद करा अन्यथा आमरण उपोषण

### भीम आर्मीचा उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देत इशारा

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.१९**

बुलढाणा जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात बायो डिजल ची उघडपणे विक्री सुरू आहेत इतकंच नाही तर खामगाव मलकापूर च्या मुख्य मार्गावर छोट्या टपऱ्या पासून तर चक्क बायो डिजल च्या पंपा पर्यंत अवैध रित्याा बायोडीजल ची विक्री खुलेआम सुरू आहे.




या गंभीर बाबी कडे आपल्या स्तरावर पूर्णतः दुर्लक्ष होत आहे इतकंच नाही तर टेंभुर्णा फाट्या जवळ ही बायोडीजल पंप अवैधरित्याा सर्रास पणे सुरू आहे कुठल्याही प्रकारची परवानगी नसतांना आणि धोकादायक असतांना ही इतक्या मोठया प्रमाणात बायोडीजल च्या नावावर बोगस डिजल ची विक्री सुरू आहे. मात्र आपल्या स्तरावर कुठलीही कारवाई आजवर झाली नाही या बाबत आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे टेंभुर्णा फाट्या जवळीक आणि खामगाव मलकापूर रस्त्याावर अवैध पणे सुरू असलेल्या बायोडीजल पंप चालकांशी आपले आर्थिक सबंध आहेत का असा आमचा थेट प्रश्न आहे.

बुलडाणा जिल्ह्यातील टेंभुर्णा फाट्या आणि खामगाव मलकापूर रोड वरील अवैधरित्या सुरू असलेले बायोडीजल पंपावर ८ दिवसाच्या आत तात्काळ कारवाई करत कायमस्वरूपी ते पंप सील करावे आणि अवैधरित्या बायोडीजल विक्री करणाऱ्या मालकावर गुन्हे दाखल करून अटकेची कारवाई करावी अन्यथा येत्या २६ मे तारखे पासून आपला उपविभागीय कार्यालयासमोर आपल्या अकार्यक्षम कारभारा विरोधात आमरण उपोषण करत डफडे बजाओ, सह तृतीयपंथी नाचविल्या जातील असा इशारा निवेदनातून उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहे.

## भारतीय सैनिकांच्या कौतुका प्रित्यर्थ काँग्रेसची तिरंगा यात्रा

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.१९**

भारत पाकिस्तान युध्दा दरम्यान भारतीय सैन्यांनी बजावलेल्या कामगिरीचे कौतुक म्हणून, बुधवार दि.२१ मे रोजी भारतरत स्व. राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनी बुलढाणा जिल्हा काँग्रेसच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यानिमित्ताने जिल्ह्याचे प्रभारी अध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच एका बैठकीचे आयोजन आ. लिंगाडे यांच्या संपर्क कार्यालयात करण्यात आले होते.

प्रमुख उपस्थितां मध्ये आमदार धिरज लिंगाडे, श्याम भाऊ उमाळकर, ॲड. साहेबराव मोरे, लक्ष्मणराव घुमरे, अँड बाबासाहेब भोंडे, हाजी दादु सेठ, सोपान शेलकर, हाजि रशिद खा जमादार, आदि मान्यवर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपस्थित होते. सर्वच मान्यवरांनी भारतीय सैनिकांच्या कामगिरीवर स्तुती सुमने उधळून भारतीय लष्कराच्या कौतुकास्पद कामगिर बाबत मार्गदर्शन केले व जिल्ह्यात तिरंगा यात्रा यशस्वी होण्याकरिता आवश्यक त्या सूचना कार्यकर्त्यांना दिल्यात



या बैठकीमध्ये सर्वप्रथम युद्धात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

लेफ्टनंट कर्नल सोफिया कुरेशी यांच्या बद्दल टीकात्मक शब्दांचा वापर करून आपल्या जातीयवादी भूमिकेचे उघड प्रदर्शन करणा-या भाजपाच्या मंत्र्याचा जाहीर निषेध करुन अश्या जातियवादी मंत्र्याची हकालपट्टी करण्या बाबतचा ठराव ॲड. विजय सावळे यांनी मांडला व त्या ठरावास डॉ. मोहम्मद ईसरार यांनी अनुमोदन दिले. ठराव एकमताने संमत करण्यात आला. याप्रसंगी सर्वश्री सतीश मेहेंद्रे, सुनील सपकाळ, अविनाश उमरकर, नंदकिशोर बोरे, वसंतराव देशमुख, शेरूभाई, गजानन मामलकर, आदींनी तिरंगा यात्रा यशस्वी करण्यास करिता आपले मनोगत व्यक्त केले.

बैठकीला सर्वश्री गणेश पाटील, वसंतराव देशमुख, हरीश रावळ, सुनील तायडे, दत्ता काकस, मनोज वानखेडे, ॲड अमर पाचपोर, चित्रांगण खंडारे, देवानंद पवार, राजु पाटील, तुळशीराम नाईक, विजय काटोले, अँड अमर पाचपोर, मनोज वानखेडे, शैलेश खेडकर व इतर मान्यवर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने बाजरी पिकाचे नुकसान



**मानोरा :** दोन दिवसापूर्वी परिसरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडला त्या मुळे धामणी शिवारातील बाबुराव ठाकरे ,गोपाल ठाकरे यांच्या शेतातील बाजरी पिकाचे नुकसान झाले.हवेने पीक खाली पडले असून कनिसाचे नुकसान झाले आहे.कृषी विभागाने पंचनामा करून आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे.

### बौध्द संस्कृती व प्रचार विहार मधूनच होऊ शकतो - डॉ. इंगोले



**मंगरुळपीर :** मंगरूळपीर तालुक्यातील त्रिरत्न बुद्ध विहार मोझरी येथील विहारात दि.१२ मे रोजी बुद्ध जयंती मोठ्या उत्साहात गावातील नागरिकांनी साजरी केली. कार्यक्रमाची सुरुवात भदंत विजय बोधी यांनी त्रिशरण व पंचशील देऊन केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रमेश इंगोले हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विहार समितीचे अध्यक्ष साहेबराव खिराडे, अमृता इंगोले, महादेव भगत हे होते.या प्रसंगी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या मध्ये ओंकार मनवर, डॉ. सुधाकर सोनोने, अनंतराव खडसे, गोवर्धन मनवर, डॉ. वसंत डोंगरे होते.तसेच या प्रसंगी स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ वसंत डोंगरे यांनी केले. या मधून त्यांनी कार्यक्रमाचे आयोजन व उद्देश स्पष्ट केला.डॉ. रमेश इंगोले यांनी बुद्ध विहार च्या माध्यमातून बुद्ध संस्कृती आणि प्रसार करता येतो. तथागत भगवान बुद्ध यांच्या जीवनातील उदाहरणे दिलीत. त्या नंतर सामूहिक भोजन व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाचे संचालन प्रा.संजय भगत यांनी केले तर आभार प्रदर्शन जयपाल सोनोने यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिव सूरज भगत, भीम शक्ति मित्र मंडळ,सुजाता महिला मंडळ व गावातील समस्त नागरिकांनी सहकार्य केले. भन्ते विजय बोधी यांचे प्रवचन होऊन समारोप झाला.

### किनखेड परिसरात माकडांचा उच्छाद



**रिसोड :** तालुक्यातील किनखेडा गावात मागील दोन महिन्यांपासून ४० ते ५० माकडांच्या टोळक्यांनी उच्छाद मांडल्याने गावकऱ्यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.या माकडांच्या टोळक्यांनी शेतमालाची नासधूस करीत तर घरावरील टिन पत्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान सुरु केले. घरांच्या छपरांवर उड्या मारत लहान मुलांना आणि महिलांना घाबरवत आहेत.अशा घटनांनी ग्रामस्थ चिंतेत असून वनविभागाने तात्काळ या माकडांना बंदोबस्त करुण त्यांना जंगलात सोडून देण्याची मागणी किनखेडा येथील ग्रामस्थांनी केली आहे.

### मुंबईत आज मातंग समाजाचा जन आक्रोश मोर्चा

**रिसोड :** अनुसूचित जातींसाठी असलेल्या १३ टक्के



आरक्षणात अ, ब, क, ड उपवर्गीकरण करावे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी तत्काळ करावी, या व इतर प्रमुख मागण्यांसाठी २० मे रोजी मुंबईतील आझाद मैदानावर जन आक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चात समाजबांधवांनी मोठया संख्येनी उपस्थित राहण्याचे आवाहन सकल मातंग समाजाचे महाराष्ट्र राज्याचे समन्वयक विनोद जोगदंड यांनी केले आहे. या मोर्चात वाशिम जिल्हयासह राज्यभरातून मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. याअनुषंगाने मोर्चामध्ये सहभागी होण्यासंदर्भात मोठया प्रमाणात आढावा बैठका सुद्धा घेतल्या जात आहेत.अशी माहिती जोगदंड यांनी दिली आहे. गत अनेक वर्षांपासून अनुसूचित जातीमधील उपवर्गीकरणाची मागणी केली जात आहे.या मागणीसाठी जिल्ह्यातील मातंग समाज बांधवांच्या वतीने वेळोवेळी आंदोलन, मोर्चे केली असून मुंबईत होणाऱ्या जनआक्रोश मोर्चात देखील अनेक समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, त्याअनुषंगाने नियोजन करण्यात आले आहे. असेही त्यांनी सांगितले.

# तिरंगा रॅलीत वाशिमकरांची उत्स्फूर्त गर्दी

## लोकप्रतिनिधी, माजी सैनिकांसह सामाजिक संस्था-संघटनांचा सहभाग

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी







**वाशिम, दि. १९ :** भारतीय सैन्याच्या ऑपरेशन सिंदूर अंतर्गत दाखवलेल्या पराक्रम, त्याग आणि शौर्याचा गौरव करण्यासाठी वाशिम येथे भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून निघालेली ही रॅली देशभक्त नागरिक, समाजसेवक, माजी सैनिक, विद्यार्थी, महिला आणि युवक-युवतींनी तिरंगा हातात घेऊन साजरी केली.
रॅलीच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार श्याम खोडे, आमदार बाबूसिंग महाराज, आमदार सईताई डहाके, भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, माजी आमदार विजयराव जाधव, ह.भ.प. नामदेवराव काकडे महाराज, ह.भ.प. जय महाराज, ह.भ.प. सागर महाराज पारिसकर, माजी सैनिक साईदास वानखेडे, माजी नगराध्यक्ष अशोक हैडा, व्यापारी मंडळाचे अध्यक्ष आनंद चरखा, सरपंच काळबांडे काका,निलेश सोमाणी,ट्रान्सपोर्ट युनियनचे अब्दुल हाफिज अब्दुल अतिक आदी मान्यवर उपस्थित होते.
या कार्यक्रमात उपस्थित सर्व माजी सैनिकांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पाटणी चौक, आंबेडकर चौक, पोलिस स्टेशन चौक मार्गे अकोला नाका येथे नवीन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे पोहोचली. या ठिकाणी पुन्हा एकदा शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले.
कार्यक्रमात आमदार श्याम खोडे, पुरुषोत्तम चितलांगे, विजयराव जाधव, माजी सैनिक वानखेडे यांनी ऑपरेशन सिंदूर मध्ये असलेल्या सैनिकांना शब्दसुमनाने आदरांजली वाहून देशभक्तीचे महत्त्व विशद केले. समारोप कार्यक्रमास ह.भ.प. शांतीपुरी महाराज यांची उपस्थिती लाभली. देशासाठी बलिदान दिलेल्या सैनिकांना मानवंदना देत पुष्पांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन सुभाषराव नानवटे यांनी केले तर आभार वैभव वायचाळ यांनी मानले. माजी नगरसेवक अनिल ताजने यांच्या वतीने उपस्थितांना खिचडीचे वाटप करण्यात आले. संपूर्ण रॅलीत भारत माता की जय, वंदे मातरम, जय जवान जय किसान यांसारख्या घोषणांनी देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

## धम्मभूमी मानोरा येथे धम्मदात्यांचा सन्मान

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. १९ :** येथिल धम्मभूमी येथे दिनांक १८ मे रोजी बुद्ध जयंती निमित्य धम्मभूमी विकासासाठी धम्मदान देणाऱ्या दत्त्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.
या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी धम्मभूमी विकास कार्य समितीचे अध्यक्ष वामनराव भगत होते. प्रमुख अतिथी म्हणून सिंदखेड राजा येथील उप विभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे,ज्येष्ठ आंबेडकरी कार्यकर्ते बाळासाहेब सोनोने, प्रा.डॉ.जयवंत कांबळे, आंबेडकरी विचारवंत बाळासाहेब डेरे,माजी जिल्हा परिषद सदस्य विजयाताई खडसे यांची उपस्थिती होती.
या प्रसंगी प्रा.संजय खडसे म्हणाले की, बुद्ध धम्मामधे दान पारमिता ला खूप महत्त्व आहे. तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी याची संकल्पना मांडली होती.
त्या मुळे आपल्या कमाई मधील २० टक्के दान केले पाहिजे. आणि धम्मभूमीच्या विकासासाठी सर्वांनी योगदान देऊन हे तालुका स्तरीय स्थळ विकसित करावे.त्या साठी मी सुद्धा आपल्या सोबत आहे.असे आवाहन प्रा.संजय खडसे यांनी केले. प्रा.डॉ .जयवंत कांबळे,बाळासाहेब सोनोने,बाळासाहेब डेरे यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. या वेळी धम्मदान देर्णाया दात्यांचा शाल व सन्मान चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी प्रा.विजय भगत मा.सु.पा.कॉलेज मानोरा यांनी चेक रुपात पन्नास हजार रुपये धम्मदान दिले.
तसेच बाळासाहेब सोनोने यांनी पन्नास हजार रुपये दान रुपाने देण्याची घोषना केली.पाच हजार रुपया प्रमाणे धम्मदान देनारे अनेक दाते यावेळी उपस्थीत होते.तसेच धम्मभूमीसाठी श्रमदान करर्णाया श्रमदात्यांचाही यावेळी शाल,व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक सुनिल पडघान यांनी केले. सुत्रसंचलन पत्रकार माणिक डेरे यांनी केले. मिलिंद प्रधान यांनी आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धम्म भूमी विकास कार्य समितीचे डॉ.भीमपाल भगत,मंडळ अधिकारी वामन नवघरे,श्रीकृष्ण मनवर,शरद इंगोले, सुनिल मनवर आदींनी योगदान दिले.

## वीट भट्टीमुळे नागरिकांना जडत आहेत विविध आजार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. १९ :** तालुक्यातील कुपटा गावाला लागून असलेल्या विटभट्टी मुळे नागरिकांना विविध आजार जडत आहे. त्यामुळे खणीकर्म व महसूल विभागाने याबाबतची दखल घेऊन विट भट्टी हटविण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.
प्रदूषण नियंत्रक विभागाकडून ना - हरकत प्रमाणपत्र घेऊन काहींनी कुपटा गावाला लागूनच विटभट्टी व्यवसाय थाटला आहे. विट भट्टीच्या काही अंतरावर उतार भागात आरोग्य केंद्र, सेतू सेवा केंद्र, बस थांबा, हॉटेल, व काही घरे आहेत. विट भट्टी मधून येणारे धूर, प्रदूषणामुळे किडनी स्टोन, कॅन्सर आदीसह विविध आजार जडत असुन पर्यावरणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.
इंधन म्हणून वापरात येणाऱ्या दगडी कोळशाच्या ज्वलनानंतर सल्फर डायऑक्साईड, कार्बन डायऑक्साईड, कार्बन मोनोऑक्साईड, आणि नायट्रोजणमधील आक्साईड या विषारी वायुचे उत्सर्जन होते. या विषारी वायुतील सल्फरडायआक्साईडमुळे डोळ्याचे विकार आणि फुफुसाचे व त्वचेचे आजार होतात.तसेच कार्बनमोनाक्साईड व कार्बन डायआक्साईड या विषारी वायूमुळे तापमाणात वाढ होऊन नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. या सर्व कारणामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाने विट्टभटी सुरु करण्यासंदर्भातील नियम सक्तीचे केले आहे. मात्र काही वीटभटी मालक प्रदूषण नियंत्रण मंडळाची कुठलीच परवानगी न घेता राजरोषपणे वीटभटीचा कारखाना चालवीत आहे. सबंधित विभागाने या गंभीर बाबीची दखल घेत गावाला लागून असलेल्या विटभट्टीला हटविण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

> कुपटा गावाला लागूनच विटभट्टी कारखाना आहे. विट भट्टीमधून निघणारे धूर आरोग्य केंद्रातील रूग्ण व कुटुंब कल्याण साठी भरती असलेल्या महिला व लहान बाळासाठी खूपच घातक आहे. त्यामुळे खणीकर्म व महसूल विभागाने गांभीर्याने दखल घेत गावाच्या वरील भागात लागून असलेल्या विट भट्टीला हटवून न्याय देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

## भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ मंगरूळपीरात तिरंगा रॅली

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मंगरुळपीर, दि. १९ :** भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ मंगरुळपीर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून शहरातील नागरिकाच्या वतीने दि.१७ रोजी सकाळी १०.३० वाजता आमदार श्याम खोडे यांचे नेतृत्वात तिरंगा रॅली काढण्यात आली.
या तिरंगा रॅलीच्या सुरुवातीला १९७१ साली युद्धा भारत पाकीस्तान युद्धात कर्तव्य बजावर्णाया मंगरुळपीर तालुक्यातील माजी सैनिकांचा शाल श्रीफळ देवून आ.श्याम खोडे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.
भारतीय सैन्याच्या 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत, पाकिस्तानातील दहशतवादी अड्डयांचा नाश करण्यात आला ह्या सैन्याच्या या शौर्यपूर्ण आणि गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाचा गौरव करण्यासाठी एक भव्य 'तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली.या तिरंगा यात्रेत भव्य प्रमाणात महीला पुरुष सहभागी झाले होते.ही तिरंगा रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौकातुन जुनी शशिमोहन टाकिज रस्ता,महाराष्ट्र चौक,संत श्री बिरबलनाथ महाराज मंदीर, महाराणा प्रताप चौक,वीर भगतसिंग चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समारोप करण्यात आला.या तिरंगा रॅलीमध्ये भा.ज.पा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे,व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष सुनिल मालपानी,प्रा. विरेंद्रसिंह ठाकुर, सुरेश लुंगे, सतीश हिवरकर,रविंद्र ठाकरे,तालुकाध्यक्ष अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष मो. शारीक सौदागर, भाजपा शहर अध्यक्ष अभिषेक दंडे, अनिल गावंडे,डॉ.दिलीप रत्नपारखी, प्रमोद घोडचर,किशोर घोडचर, प्रवीण देशमुख,महादेव निंबेकर,सतीश राठी,सतीश हिवरकर,सह मोठ्या प्रमाणात महिला पुरुष सहभागी झाले होते.

## 'त्या' खड्डेमय रस्त्याची दुरुस्ती कोण करणार?



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. १९ :** तालुक्यातील कारखेडा ते वरोली हा ग्रामीण रस्ता लोकप्रतिनिधी व प्रशासकीय व्यवस्था यांच्यासाठी कायम दुर्लक्षिततेचा विषय असून कारखेडा ह्या गावापासून तर वरोली या गावापर्यंत रस्त्याला अक्षरशः चाळण लागून मोठमोठाले खड्डे निर्माण झालेले आहेत त्यामुळे कारखेडा व वरोली तथा दिग्रस व मानोरा ये जा करणाऱ्या नागरिकांना मोठ्या शारीरिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.
कारखेडा वरोली ही गावे जिल्हा परिषद तळप सर्कल मध्ये येतात ज्याचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या याच सर्कलमधील सहकार क्षेत्रात नाव असलेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील महिलेला मोठ्या अपेक्षेने कारखेडा व वरोली या गावातील मतदारांनी जिल्हा परिषदेमध्ये पाठविले होते.
जिल्हा परिषदेचे सभापती पद सुद्धा या सर्कलमधील महिला जिल्हा परिषद सदस्यांकडे होते. सभापती पद भूषविणाऱ्या त्या वेळच्या महिला लोकप्रतिनिधींनी कारखेडा -वरोली रस्ता निर्मितीसाठी जिल्हा परिषद तथा संबंधित विभागाकडे किती पाठपुरावा केला वा जनतेची ही समस्या निकाली निघावी यासाठी काय प्रयत्न केले हे कारखेडा आणि वरोली ह्या गावातील नागरिकांसाठी कोडेच असल्याचे बोलले जात आहे.
जिल्हा परिषद सदस्यां सोबतच तळप आणि देऊरवाडी असे दोन पं.स.चे गण सुद्धा या गावांशी संबंधित आहेत मात्र पं.स.च्या सदस्यांनी सुद्धा त्यांच्या कार्यकाळात पं.स. असो जिल्हा परिषद असो अथवा शासनाकडे लेखी पाठपुरावा करून चाळण झालेल्या या रस्त्याची डागडुजी व्हावी यासाठी प्रयत्न केल्याचे कोणीही छातीठोक सांगत नसल्याच्या चर्चा सुद्धा कारखेडा आणि वरोली मध्ये रंगत आहेत.
स्थानिक नागरिकांच्या दररोजच्या ये-जा करण्याच्या या रस्त्याची डागडुजी व्हावी यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी व स्थानिक प्रशासनाने पुढाकार घ्यावा व प्रशासक असलेले जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करून रस्त्यावरील खड्ड्याची ही डोकेदुखी मिटवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप सोळंके यांनी केली आहे.

## घरकुलासाठी लाभार्थ्याला मिळणार ५ ब्रास रेती

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. १९ :** शासनाच्या विविध योजनांमधील घरकूल लाभार्थ्यांसाठी आता ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. नदी पात्रातील वाळू, रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन विक्री डेपो पद्धतीऐवजी यापुढे लिलाव पद्धतीद्वारे करण्यात येणार आहे.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत वाळू धोरण २०२५ वर शिक्कामोर्तब करण्यात आले. सोबतच, राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना नागपूर येथे करण्याबरोबर झोपडपट्टी पुनर्वसनाला गती देणे, यासह अन्य महत्त्वाचे निर्णयही या बैठकीत घेण्यात आले. नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुटवडा विचारात घेता कृत्रिम वाळूस प्रोत्साहन देण्यात येईल. यासाठी सुरुवातीस विविध शासकीय, निमशासकीय बांधकामांमध्ये २० टक्के कृत्रिम वाळू वापरणे बंधनकारक करण्यात येईल. या बांधकामांमध्ये पुढील ३ वर्षांत कृत्रिम वाळू बंधनकारक करण्यात येणार आहे.
हजारो घरकुलांची कामे सुरू असल्याने तसेच दोन महिन्यापासून वाळू उपलब्ध नसल्यानेच घरकुल लाभार्थी अडचणीत सापडले होते. वाळू १५ हजार रुपये ब्रासने घेणे शक्य नसल्याने घरकुलाचे काम थांबले होते. शासनाने घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा केली होती. पण ते मिळण्यास धोरण बदलामुळे अडचण निर्माण झाली होती. आता शासनाने निर्देश दिल्याने पावसाळ्यात लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी पाच ब्रास वाळू मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.
पर्यावरण विभागाच्या परवानगीनंतर नदीपात्रातील वाळू गटांसाठी जिल्ह्यातील प्रत्येक उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाळू गटांचा एकत्रितरीत्या एकच ई-लिलाव प्रसिद्ध करण्यात येईल. या लिलावाचा कालावधी दोन वर्षांसाठी राहणार आहे. लिलावाद्वारे उत्खनन करण्यात येणाऱ्या प्रत्येक वाळू गटामधील दहा टक्के वाळू विविध घरकूल लाभार्थ्यांसाठी पाच ब्रासपर्यंत मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने निश्चित केलेले वाळू गट, तसेच ज्या वाळू गटांना पर्यावरण विभागाची परवानगी मिळालेली नाही व जे वाळू गट लिलावामध्ये गेलेले नाहीत अशा नदी, नाले, ओढे इत्यादी वाळू गटामधील वाळू शासनाच्या गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थ्यांना (घरकूल लाभार्थी) व गावकऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक व सामूहिक कामासाठी, तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या विहिरीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
घरकुल लाभार्थ्यांना निश्चित केलेल्या वाळू गटातून रितसर परवानगी घेऊन आपल्या वाहनात भरून वाहतूक करावे लागणार आहे. याबाबत काही अडचण आल्यास सबंधित ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्क साधता येणार आहे.

अजिंक्य भारत

# आपला जिल्हा

अकोला । मंगळवार, दि. २० मे २०२५



## थोडक्यात

### महिलेच्या पर्समधून सोन्याचे दागिने लंपास

**अकोट :** बसमध्ये चढत असताना एका महिलेला चोरट्याने लक्ष्य करत तिच्या पर्समधून सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. गेल्या काही दिवसांपासून अकोट बसस्थानक परिसरात चोरीच्या अशा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे .पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार ब्राह्मणवाडा येथील प्रिया शरद काळे वय (३५) वर्ष ह्या बहिणीच्या मुलाच्या लग्नासाठी अकोट येथे आलेल्या होत्या.त्या त्यांच्या गावी परत जात असताना त्या परतवाडा बसमध्ये चढत होत्या.त्यावेळी त्यांच्या खांद्यावर असलेल्या पर्समधून अज्ञात चोरट्याने चेन उघडून सुमारे २१,६०० रुपयांच्या सोन्याचे मंगळसूत्र लंपास केले.या घटनेनंतर प्रिया काळे यांनी तात्काळ धाव घेऊन अकोट शहर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली.त्या तक्रारची दखल घेत शहर पोलिसानी तपास सुरू केला आहे.

### रौंदळा परिसरात गुरे चोरणारी टोळी सक्रिय



**रौंदळा:** अकोट तालुक्यातील तेल्हारा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या रौंदळा परिसरात गेल्या काही दिवसापासून गुरे चोरणारी टोळी सक्रिय झाली असून आतापर्यंत पाच ते सहा गाई चोरांनी लंपास केल्या आहेत. रौंदळा येथील रहिवासी गोपाल प्रल्हाद आमले यांच्या दोन गाई चोरट्यांनी घरातून सोडून नेल्या आहेत. तर विठ्ठल ज्ञानदेव महाले यांच्या सुद्धा दोन गायी चोरट्यांनी घरातून चोरून नेल्या आहेत.याविषयी तेल्हारा पोलिसात गोपाल प्रल्हाद आमले व विठ्ठल ज्ञानदेव महाले यांनी तेल्हारा पोलिसात तक्रार नोंदवली असून तेल्हारा पोलिसांनी अज्ञात चोरां विरुध्द गुन्हा दाखल केला आहे तेल्हारा पोलिसांनी योग्य कार्यवाही करावी अशी मागणी जोर धरत आहे.

### अकोट पोलिसांनी नागरिक प्रथम पोलीसींग अभियान राबविले ; नागरिकांचे हरविलेले मोबाईल केले परत



**अकोट:** येथील पोलिसांनी नागरीक प्रथम पोलीसींग अभियान राबवुन यापुर्वी हरविलेले पोलीस स्टेशन अकोट शहर येथील ३ मोबाईल, अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनं येथील ४ मोबाईल, तेल्हारा पोलीस स्टेशन येथील २ मोबाईल, हिवरखेड येथील १ मोबाईल, दहीहांडा येथील २ मोबाईल असे एकुन १२ हरविलेल्या मोबाईलचा शोध घेवुन १,लाख ९५,हजार ९९९/-रूपयाचा मुद्देमाल हस्तगत केला. मोबाईलधारकांना उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय अकोट येथे बोलावुन हरवीलेले मोबाईल मोबाईलधारकांना परत करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी सहा. पोलीस अधिक्षक अकोट तथा उपविभागीय पोलीस अधिकारी अनमोल मित्तल यांचेहस्ते मोबाईल परत करण्यात आले.मोबाईलधारकांनी हरविलेला मोबाईल परत मिळाल्याचा आनंद व्यक्त करून पोलीस विभागाचे आभार मानले. आजपर्यंत हरविलेले एकुन १०५ मोबाईल किंमत १५,लाख ४५,हजार ६०८ /- रूपयाचा मुद्दे माल शोधुन मोबाईलधारकांना परत करण्यात आला आहे. हरविलेले मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलीस अंमलदार प्रदिप राउत, गोपाल जाधव, योगेश उमक, प्रमोद चव्हाण, रामेश्वर भगत यांनी अथक परीश्रम घेतले.

### सेंट पॉल अकॅडमी हिवरखेडची शंभर टक्के निकालाची परंपरा सहाव्या वर्षीही कायम

हिवरखेड: हिवरखेड येथील स्थानिक सेंट पॉल अकॅडमी हिवरखेड या शाळेने सलग सातव्या वर्षीही आपली शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवून हिवरखेड शहरामध्ये विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापनावर किती बारकाईने कष्ट घेतल्या जातात या कष्टाची ही पोचपावती सलग सातव्या वर्षी शाळेला मिळाली आहे. यावर्षी इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये एकूण ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून यापैकी स्नेहा प्रफुल राऊत या विद्यार्थ्याने ९४.४०% गुण मिळवत शाळेतून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे तर द्वितीय क्रमांक पूर्वा नितीन बनकर या विद्यार्थ्याने प्राप्त केला असून त्याला ९३.६०% गुण मिळाले आहेत तर तृतीय क्रमांक नंदिनी सुनील राऊत या विद्यार्थिनीने प्राप्त केला असून तिला ९२.८०% गुण प्राप्त झाले आहेत. एकूण ३२ विद्यार्थ्यांनपैकी १० विद्यार्थी ९०% च्या वर गुण आहेत व वेदिका प्रदीप काकडे ९२.४०%, अनुश्री रंजीत भोपळे ९२.२०%, वैष्णवी माणिक मेतकर ९२.२०%, श्रेया अनिल राऊत ९२.%, प्रांजली परमेश्वर माळी ९१.४०%, प्रसाद रामेश्वर गावंडे ९०.६०%, कांचन उमेश वानखडे ९०.६०%, इतर सर्व विद्यार्थ्यांनी नेत्र दीपक अशी कामगिरी केली आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय त्यांचे शिक्षक येलूकार , खारोडे , दहि , ढोले , अमांनकर , ऋषी यांना दिले आहे.

## पाणीपुरवठा योजना शाश्वत ठेवण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी प्रयत्नशील राहावे

### जलजीवन मिशनच्या प्रकल्प संचालक अनिता तेलंग यांचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**तेल्हारा, दि. १९ :** अकोला : गावस्तरावरील पदाधिकायांनी पाणीपुरवठा योजना शाश्वत ठेवण्यासाठी स्वत:चा व लोकांचा सहभाग घेण्यासाठी सतत प्रयत्नशिल राहावे, असे आवाहन जल जीवन मिशनच्या प्रकल्प संचालक अनिता तेलंग यांनी केले.

तेल्हारा येथील श्रीकृष्ण हॉल येथे सोमवार (ता.१९) जलजीवन मिशन, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद अकोला यांच्या सहकार्याने व मुख्य संसाधन संस्था जीवन विकास सामाजिक बहुउद्देशीय पाणलोट संस्था यवतमाळ यांच्या वतीने आयोजित अकोट व तेल्हारा तालुक्यातील ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या पाच सदस्याचे दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी त्यांनी जल जीवन मिशन व ग्रामस्तरावरील पदाधिका-याची भुमिका या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात पाणी पुरवठा योजनेशी संबंधित स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण, जलजीवन मिशन, समुदाय आधारित स्त्रोत व्यवस्थापन, भारतीय जल धोरण, भुजल संशोधन पध्दती आणि स्त्रोत, भुजल व्यवस्थापन नियोजन व ओळख, भुजल पुनर्भरणाचे तंत्र, भूपृष्ठावरील पाण्याचा पुनर्भरण, नदी-नाले याबद्दल तंत्र, भूपृष्ठावरील पाण्याचा पुनर्भरण, नदी-नाले याबद्दल राज्यस्तरावरून प्रशिक्षित प्रशिक्षक अनिल राऊत यांच्या कडून विषयानुरुप मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रवीण पाचपोर मनुष्यबळ विकास सल्लागार, अनिल काकडे विस्तार अधिकारी आरोग्य प्रशांत दोडेवार समूह समन्वयक उपस्थित होते. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे ५ सदस्यांमध्ये दोन महिला यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

## अकोट ग्रामीण प्रथम तर एसडीपीओ कार्यालय द्वितीय



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १९ :** मुख्यमंत्री यांच्या शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा उपक्रमामध्ये अमरावती परिक्षेत्रातून अकोला जिल्ह्यातील पोलिस स्टेशन अकोट ग्रामीण प्रथम तर उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, अकोला शहर विभागाने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्धादरम्यान राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये वेबसाइट सुधारणा, सुकर जीवनमान, स्वच्छता, तक्रार निवारण, कार्यालयीन सोयी सुविधा, क्षेत्रीय कार्यालयाला भेटी, ई ऑफिस प्रणाली, आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन, अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवाविषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा वापर,नावीन्यपूर्ण उपक्रम इत्यादी मुद्यांवर कार्यालयीन कामकाजामध्ये सुधारणा करण्याबाबत प्रोत्साहित करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत केलेल्या कामगिरीबाबत उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय व पोलिस स्टेशन यांच्या मार्फत विशेष पोलिस महानिरीक्षक अमरावती, परिक्षेत्र अमरावती यांना सादरीकरण करण्यात आले. त्यावरून अमरावती परिक्षेत्रातील पाच जिल्ह्यांतील उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय व पोलिस स्टेशनमधून पोलिस स्टेशन अकोट ग्रामीण ग्रामीण परिवं परिक्षेत्रातील सर्व पोलिस स्टेशनमधून प्रथम क्रमांक पटकावला आहे तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी, शहर विभाग, अकोला सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयामधून व्दितीय क्रमांक पटकावला आहे.

## श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेच्या गैरव्यवहाराची चौकशी करा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

### शिवसेना शिंदे गटाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

**अकोट, दि. १९ :** शिवसेना उपजिल्हा प्रमुख अभिजीत उर्फ मनीष कराळे यांनी अकोट तहसील कार्यालयात निवेदन देऊन श्रावण बाळ व संजय गांधी निराधार योजनेंतर्गत शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक फसवणूक थांबवा,यासाठी तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे.

जानेवारी २०२४ पासून अनेक शेतकऱ्यांनी तसेच जेष्ठ नागरिकांचे श्रावण बाळ व संजय गांधी निराधार योजनेंतर्गत फॉर्म भरले आहेत. त्यांना अजूनही योजनेचा लाभ मिळालेला नाही.याउलट लाभ मिळालेल्या काही शेतकऱ्यांना व ज्येष्ठ नागरिकांना पुन्हा फॉर्म भरायला सांगण्यात येत आहे.तसेच उत्पन्नाचे दाखले सुद्धा नव्याने जोडायला सांगितलेले आहे.या प्रक्रियेमुळे नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.व त्यांचे आर्थिक नुकसानही होत आहे.तसेच काही महिने आधी एका मीटिंगमध्ये ३८ अर्ज निकाली काढण्यात आले.त्या लाभार्थ्यांकडून अधिकाऱ्याच्या जवळच्या शेतु वाल्यांनी व संबंधित अधिकाऱ्याने हात मिळवणी करून मलिदा घेऊन हे ३८ अर्ज पास केलेले आहे.त्या केसेस बोटावर मोजण्यासारख्या दोन-चार शेतूमधल्या असल्याची खमंग चर्चा सर्वत्र नागरिकांमध्ये आहे.या नेमक्या कोणत्या सेतुमधल्या आहेत व ते लाभार्थी योग्य पात्रतेचे आहेत का? याची चौकशी करण्यात यावी.डी बी टी साठी लाभार्थी बाहेर ठिकाणी जाऊन डिबी टी करत आहे या साठी २०० ते ३०० रुपये शुल्क आकारण्यात येत आहे डिबीटी हे तहसीलदार यांचा ओटीपी शिवाय होत नाही या आर्थिक पिळवणूक करणाऱ्यामागे नायब तहसीलदार तर नाहीत ना? याची चौकशी करून यामध्ये असणाऱ्या दोषींवर कारवाई करण्यात यावी.अश्या आशयाचे निवेदन यावेळी अकोट शिवसेना शिंदे गटाच्या वतीने देण्यात आले आहे.

## श्री क्षेत्र पंढरपूरकरिता श्री संत वासुदेव महाराज पालखीचे प्रस्थान

### ७ जूनला होणार प्रस्थान सोहळा; विविध कार्यक्रमांनी साजरा होणार पुण्यतिथी महोत्सव

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १९ :** आषाढी कार्तिकी विसरू नका मज । सांगतसे गुज पांडुरंग ।। तुम्हीं जातां गांवा हुरहुर माझे जीवा । भेटाल केधवा मजलागीं ।।

या अभंगोक्तीनुसार सर्व संत विठुरायाच्या भेटीकरिता प्रतिवर्षी पंढरीला जात आहेत. वारकरी संतांच्या या पुण्यपावन परंपरेचे पाईकत्व अंगीकारून श्री क्षेत्र पंढरपूर वारीकरिता वारकरी रत्न श्री संत वासुदेव महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट द्वारा करण्यात आले असून श्री क्षेत्र पंढरपूर येथील आषाढी यात्रेत सहभागी होण्यासाठी श्रींच्या पालखी-रथासह पायदळ दिंडीचे श्री क्षेत्र श्रद्धा सागर, आकोट येथून ७ जूनला दुपारी १ वा. प्रस्थान होत आहे.गुरुवर्य श्री संत वासुदेव महाराज यांची पंढरीची वारी युगानुयुगे सुरू राहावी, या भावार्थाने श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट द्वारा गत १५ वर्षांपासून श्री क्षेत्र पंढरपूर पायदळ पालखी सोहळा आयोजित करण्यात येत आहे. श्री क्षेत्र श्रद्धासागर ते श्री



क्षेत्र पंढरपूर असा ६५० किलोमीटर पायदळ वारीचा प्रवास पूर्ण करून श्री संत वासुदेव महाराज धर्मशाळा - श्री क्षेत्र पंढरपूर येथे पोहोचणार आहे. पालखी सोहळ्यातील प्रवेश निःशुल्क असून वारकऱ्यांसाठी भोजन, निवास व आरोग्य विषयक सुविधा करण्यात आली आहे. पालखी सोहळा प्रमुख तथा संस्थाध्यक्ष सर्वश्री.ह.भ.प. वासुदेवराव महाराज महल्ले यांच्यासह महादेवराव ठाकरे, गजाननराव दुधाट, अंबादास महाराज मानकर यांचे मार्गदर्शनात श्रीराम कोरडे, ज्ञानेश्वर नराजे, बाळकृष्ण वाकोडे, नागोराव बायस्कार, चोपदार नाजूकराव डोबाळे, विजय सुरंसे, सुरेश कुलट त्याचप्रमाणे रथ चालक दिपक मोहोकार, मदन मोहोकार, सारंगधर गावंडे, ज्ञानेश्वर बाहेकर, सुरेश मानकर, प्रभाकर डोबाळे, ट्रॅक्टर सेवा चक्रधर टवले, विद्युत सेवा अनंता गणगणे, इत्यादी सेवाधारी, असंख्य पताकधारी, अबदागिरीधारी पुरुष व महिला वारकरी मंडळी पालखी सोहळ्यात राहतील. वारकऱ्यांचे सेवेकरिता संस्थेद्वारा पाणी टँकर सोबत राहील.

दि.७ जून रोजी स. ९:३० वा. श्री ह भ प वासुदेवराव महाराज महल्ले यांचे प्रस्थानाचे कीर्तन त्यानंतर महाप्रसाद व दुपारी १ वा. श्रींच्या दिंडीचे व रथयात्रेचे भव्य स्वरूपात प्रस्थान होत असून भाविकांनी या प्रस्थान सोहळ्याला वारकरी गणवेशात बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.बेलुरा ग्राम पंचायतचे सरपंच राम त्र्यंबकराव मंगळे यांच्याकडून श्रींचरणी रुग्णवाहिका अर्पण करण्यात येत आहे.

### वारकऱ्यांना मिळणार मोफत विमा कवच व वारकरी गणवेश

या पायदळ दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना सुरक्षेच्या दृष्टीने श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था,आकोट द्वारा विमा उतरवून त्यांना सुरक्षा कवच प्रदान करण्यात येणार आहे.संस्थेच्या पायदळ पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रथम १०० वारकऱ्यांना दरवर्षीप्रमाणेच संस्थेमार्फत वारकरी गणवेश देण्यात येणार आहेत.पुरुषांना शर्ट,पायजामा/धोतर,दुपट्टा,टोपी व महिला वारकऱ्यांना साडी, चोळी देण्यात येईल.तरी वारकऱ्यांनी आपली नावे संस्थेच्या कार्यालयात नोंदवावी. पालखीचा मुक्काम श्री संत वासुदेव महाराज धर्मशाळा,श्री क्षेत्र पंढरपूर येथे राहणार असून ३ जुलै ते १० जुलै २०२५ दरम्यान श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिमान सप्ताह संपन्न होईल. या सप्ताह अंतर्गत नामवंत महाराज मंडळींचे प्रवचन, कीर्तनादी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

## अवकाळी पावसाने केले संत्रा बागांचे नुकसान



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोलखेड , दि. १९ :** आकोलखेड परीसरात अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात पडल्याने भुईमूग,कांदा, ज्वारीसह संत्रा फळबागाचेही मोठ्या प्रमाणात नूकसान झाले आहे.संत्राबागेमध्ये मृगबहार घेण्याकरिता पाणी देने बंद करुन झांडाना तानावर सोडणे महत्वाचे असते.त्यानुसार संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी संत्राबाग ताणावर सोडल्या होत्या जेणेकरुन मृगबहार मोठ्या प्रमाणात घेऊन,ईतर पिकात झालेला तोटा भरुन काढु,पण निसर्गाला शेतकऱ्यांचे भले पाहवले नाही. अकोलखेड परीसरात अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात पडल्याने संत्राझाडांना आवश्यक त्या प्रमाणात ताण बसला नसल्याने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यंदा उन्हाळ्यामध्ये अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे आणि पावसाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे बागांना पाहीजेत तसा ताण बसणार नाही,त्यामुळे संत्राबाग मृगबहारचे भविष्य धोक्यात आले असुन यात संत्राउत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे हे अटळ आहे.

### उन्हाळ्यात पाणी बंद करुन ताण देणे महत्वाचे

संत्र्याचे मृगबहार चांगल्या प्रकारे घेण्यासाठी संत्राबागांना उन्हाळ्यात पाणी बंद करुन ताण देणे महत्वाचे असते.पण उन्हाळ्यात आकोलखेड मंडळात परीसरात अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात पडल्याने यंदाचा मृगबहार पाहीजे तसा येणार नाही..

**सुहास आप्पा तेल्हारकार,**
संत्रा उत्पादक शेतकरी

## देवरी येथे एक दिवशीय लायसन्स व मार्गदर्शन शिबिर

**देवरी :**येथील श्रीकृष्ण मंदिर देवरी येथे आज . १९ मे रोजी एक दिवशीय लायसन्स व मार्गदर्शन शिबिरसंपन्न झाले आहे. आज प्रत्येक घरोघरी टू व्हीलरपासून तर चारचाकी वाहनापर्यंत वाहने झालेली आहेत व अनेकांकडे लायसन्स नाहीत. जेव्हा एखादा एक्सीडेंट होतो तेव्हा मोटार वाहन धारकावर कारवाई होते त्यामुळे प्रत्येकाच्या जवळ लायसन्स असणे ही काळाची गरज झाली आहे. ग्रामीण भाग असो किंवा शहरी भाग कोणतेही आई-वडील आपल्या अज्ञान मुलाजवळ मोटरसायकलसह मोठे वाहन देतात व अनावधाने त्यांच्या हातून अपघात होतो त्यांच्याकडे लायसन राहत नाही. त्यामुळे त्यांच्यावर विना लायसन्स अपघात घडल्यामुळे आरटीओ विभागाकडून कोर्टाच्या माध्यमातून कारवाई होते.

## पूजा मेश्राम यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर फडकावला अकोल्याचा झेंडा !

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. १९ :** महाराष्ट्रातील एका छोट्याशा शहरातून जागतिक व्यासपीठावर झेप घेत पूजा मेश्राम ह्या अकोल्यात जन्मलेल्या आणि वाढलेल्या प्रतिभावान महिलेने पुन्हा एकदा आपल्या शहराचा अभिमान वाढवला आहे. क्वालालंपूर, मलेशिया येथे झालेल्या माइलस्टोन मिसेस आशिया इंटरनॅशनल २०२५ या मान्यवर सौंदर्य स्पर्धेत त्यांनी प्रथम उपविजेतेपद (१ -) पटकावले. ही स्पर्धा अत्यंत कडवट स्पर्धात्मक होती. ज्यामध्ये रशिया, तुर्की, दुबई, युके, श्रीलंका, मलेशिया, व्हिएतनाम, इंडोनेशिया आणि जपान यांसारख्या देशांतील प्रतिभावान महिलांनी सहभाग घेतला होता. अशा जागतिक स्तरावरील स्पर्धेत पूजा आपल्या गौरव, आत्मविश्वास आणि प्रेरणादायी प्रवासामुळे विशेष ठरल्या. या उपविजेतेपदाबरोबरच, त्यांना खालील दोन विशेष सन्मानही प्राप्त झाले. 'सोशल मीडिया क्वीन'' सर्व स्पर्धकांमध्ये सर्वाधिक लोकमत मिळाल्याबद्दल ''मिसेस करेजियस'' त्यांच्या धैर्यशीलता, जिद्द आणि प्रेरणादायी संघर्षाबद्दल पूजाचा प्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे. अवघ्या १८व्या वर्षी त्यांनी मिसेस अकोला हा मुकुट पटकावला. आणि त्यानंतर मिस महाराष्ट्र, मिसेस इंडिया इंटरनॅशनल, आणि टॉप मॉडेल २०१८ सारख्या अनेक किताबांवर आपलं नाव कोरलं. त्यांच्या यशस्वी वाटचालीत सातत्य, आत्मविश्वास आणि स्वप्नांना सत्यात उतरवण्याची चिकाटी दिसून येते.

या आंतरराष्ट्रीय मंचावर त्यांनी सिंगापूरचे प्रतिनिधित्व करताना आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि अकोल्याच्या अभिमानाचा ठसा उमटवला. या अनुभवाबद्दल बोलताना पूजा म्हणाल्या, ''ही केवळ माझा वैयक्तिक विजय नाही तर ती प्रत्येक मुलींचा विजय आहे. जी मोठी स्वप्न पाहते, मग ती कुठल्याही कोपऱ्यातून का येऊ नये. अकोल्याच्या मातीत वाढलेली मी, आज जागतिक व्यासपीठावर उभी आहे हे माझ्यासाठी खूप मोठं भाग्य आहे. ''पेजेंट व्यतिरिक्त, पूजा या एक प्रोफेशनल वॉटरकलर आणि कॉफी पेंटिंग कलाकार आहेत.

त्यांच्या चित्रांमध्ये नजाकत आणि भावनांची खोली यांचा सुंदर मिलाफ दिसून येतो. पूजाची कहाणी म्हणजे धैर्य, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास यांचं मूर्त स्वरूप आहे ही केवळ तिचीच नाही, तर प्रत्येक अकोल्याच्या माणसाची विजयगाथा आहे, ज्यांनी कधी ना कधी स्वप्नं पाहिलेली असतात.अकोल्यातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी आपल्या मातोश्रीला दिले आहे.

अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा
१
बुलडाणा, मंगळवार २० मे २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### गाडीतुन १० लाखांची रोकड लंपास

**बुलडाणा :** जानेफळ रोडवरील हॉटेल तोरणा समोर दुचाकीच्या डिक्कीत ठेवलेली १ लाख १० हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना शनिवारी (१८ मे) दुपारी घडली. या प्रकरणी रविवारी मेहकर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. साब्रा येथील उत्तम पुंजाजी दुगाणे (४३) हे शेती व्यवसाय करणारे असून, ते शनिवारी दुपारी दुचाकी ने एसबीआय कृषी शाखा, मेहकर येथे आले होते. त्यांनी खात्यातून १.१० लाख रुपये काढून ती रोकड गाडीच्या डिक्कीत ठेवली. चहा घेऊन परत आल्यानंतर डिक्कीत ठेवलेली रक्कम गायब झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत त्यांनी लगेच पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### उसनवारीच्या पैशातून युवकाला मारहाण

**खामगाव :** उसने पैसे घेतल्याच्या कारणावरून एका ३५ वर्षीय तरुणाला मारहाण केल्याची घटना शहरात घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत शे. जाकीर शे. जाबीर रा. ताजनगर, पारपेठ, मलकापूर याने दिलेल्या तक्रारीनुसार, त्याला हाशमी नगरमधील भंगाराच्या गोदामात बोलावून सै. अफरोज सै. हसन कुरेशी रा. कुरेशी नगर, मलकापूर व जावेद शाह शफी शाह रा. पांढरी प्लांट, पारपेठ यांनी खुर्चीला बांधले, तसेच पैसे कधी देतो, असे विचारत व्हिडिओ चित्रीकरण केले. त्यानंतर खुर्चीसह खाली पाडून शिवीगाळ करत मारहाण केली. यावेळी सोडून देण्याची विनवणी केली असता १५ दिवसांची मुदत देत पैसे न दिल्यास ठार मारू, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद केले. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हे दाखल केले. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### महिलेच्या गळ्यातील दीड लाखाची पोथ लंपास

**खामगाव :** जेवणानंतर छतपावली करीत असताना आलेल्या मैत्रिणीशी भेटण्यासाठी बोलत असताना अज्ञात दुचाकीस्वारांनी येवून गळ्यातील दिड लाख रुपये किंमतीची सोन्याची पोथ हिसकावून पोबारा केला. ही घटना २७ मे च्या रात्री घडली. लोणार सराफा लाईन भागातील सौ. प्रिती या आपल्या मैत्रिणीशी बोलत असताना दुचाकीस्वार तिघांनी सौ. प्रितीच्या गळ्यातील १ लाख ४० हजार रुपये किंमतीची सोन्याची पोथ तोडून लंपास केली व पाठीत बुक्काही मारला. अशा तक्रारीवरुन अज्ञात दुचाकीस्वारांविरुध्द गुन्हा दाखल केला.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १६०० –२४१० |
| गहू | २४०० – २६०० |
| तुर | ५७०० – ७००० |
| हरभरा | ४२२५ – ५७०० |
| सोयाबीन | ३७०० – ४३७५ |
| भुईमुग | ३८०० – ५६२५ |
| उडीद | ५२०० – ७२०० |
| मक्का | १८५० – १९७५ |
| मूंग | ६८०० – ७४०० |

# ना.फुंडकरांच्या नेतृत्वात भव्य तिरंगा रॅली

## ऑपरेशन सिंदूर यशस्वीपणे राबविल्याबद्दल सैन्याचे व पंतप्रधानांचे मानले आभार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव , दि.१९

**देशाच्या वीर जवानांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी आज खामगाव शहरात कामगार मंत्री ना. आकाशदादा फुंडकर यांच्या नेतृत्वात भव्य दिव्य अशी तिरंगा मोटरसायकल रॅली काढण्यात आली. जय हिंद, वंदे मातरम, भारत माता की जय, अशा गगनभेदी घोषणांनी या रॅलीत देशभक्तीचा उत्साह ओसंडून वाहत होता.**

आजचा नवीन भारत झुकणार नाही आणि थांबणार नाही, हे पुन्हा एकदा भारतीय लष्कराने व सरकारने जगाला सिद्ध करून दाखवले आहे. पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यानंतर आपल्या सेनेने ऑपरेशन सिन्दुरद्वारे दिलेले चोख प्रत्युत्तर हे अतिशय अभिमानास्पद आहे. वीर जवानांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी, भारतमातेस व शहीद झालेल्या जवान आणि मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप भारतीयांना अभिवादन करण्यासाठी ही भव्य तिरंगा मोटरसायकल रॅली काढण्यात आली. शहरातील शिवाजीनगर भागातील छत्रापती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सकाळी ११.३० वाजे दरम्यान या भव्य मोटर सायकल तिरंगा रॅलीला प्रारंभ झाला. महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री ना. आकाश फुंडकर यांच्या नेतृत्वात ही रॅली काढण्यात आली.





शिवाजी महाराज स्टेडियम शिवाजीनगर येथून भव्य तिरंगा रॅली भुसावल चौक, सरकी लाईन, अर्जुन जल मंदिर, महावीर चौक, त्रिशूल चौक , फरशी, घाटपुरी नाका, सिविल लाईन, जलंब नाका, खामगाव जिल्हा न्यायालय, मार्गाने सदर रॅली ही टॉवर चौकात पोहचली. या ठिकाणी जयस्तंभाजवळ राष्ट्रगीताने रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीमध्ये सागरदादा फुंडकर तसेच खामगाव शहर व खामगाव तालुक्यातील देशप्रेमी नागरिक व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# केदारनाथ येथे अडकून पडलेल्या भाविकांना सोडले सुरक्षित ठिकाणी

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांची भाविकांना मदत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१९

अतिवृष्टीमुळे केदारनाथ येथे अडकुन पडलेल्या पाच महाराष्ट्रीयन नागरिकांना हेलिकॉप्टरच्या मदतीने मुक्त काशी येथे सुरक्षित पोहोचवण्याचे काम केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या टीमने केले आहे.

सुरक्षित ठिकाणी पोहोचलेल्या बद्दल भाविकांनी केंद्रीय मंत्री व त्यांच्या टिमचे आभार मानले आहे. राज्यातील नाशिक येथील धीरेंद्र वाघ , डॉ पूनम रेंडीवार पुणे येथील ज्योती घोगे ,नागपूर येथील राधिका अवस्थी व त्याांचे अन्य सहकारी केदारनाथ येथे दर्शनासाठी गेले होते.१८ मे रोजी केदारनाथ येथे अतिवृष्टी झाली. त्यामुळे रस्ते बंद झाले. अशातच दोन महिलांची प्रकृती खराब झाली. दरम्यान त्यांच्या सहकार्यांनी युवा सेना जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, प्रा डॉ सचिन जाधव यांच्याशी संपर्क साधून अपबीती कथन केली. त्याानंतर केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या दिल्ली येथील जनसंपर्क कार्यालयाच्यावतीने उत्तरांचल सी एम ओ कार्यालयाशी संपर्क साधण्यात आला. त्यांना तात्काळ मदत करण्याच्या दृष्टिकोनातून निर्देशित करण्यात आले. अतिवृष्टी थांबल्यानंतर केदारनाथ येथे अडकून पडलेल्या या महाराष्ट्रातील भाविकांना हेलिकॉप्टरची मदत खाली मुक्त काशी येथे सुरक्षित रित्याा सोडण्यात आले. या भाविकांच्या संपर्कात केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचे दिल्ली येथील स्वीय सहाय्यक अचल भाटिया होते. संकटकाळात मिळालेल्या मदतीबद्दल या भाविकांनी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव व त्यांच्या टीम आभार मानले आहे .

# ऑक्सिजन घेऊन जाणारा टँकर उलटला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१९

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रवेशव्दाराजवळ ऑक्सिजनचे टँकर घेवून जाणारा ट्रक पलटी झाल्याची घटना १८ मे रोजी दुपारी १२ वाजता घडली. बुलढाणा शहरालगत असलेल्या क्षय आरोग्य धाम परिसरातील बुलढाणा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व स्त्री रूग्णालयाच्या मुख्य प्रवेशव्दारा जवळ ऑक्सिजनचे टँकर घेवून जाणारा ट्रक पलटी झाला आहे.

टँकरच्या ड्रायव्हरला टर्न घेतांना त्याठिकाणच्या नालीचा अंदाज न अल्यामुळे ते टँकर पलटी झाले. परंतू सुर्देवाने कुठले जीवत हानी व गंभीर घटना घडली नाही. मात्र हे टँकर पलटी झाल्यामुळे काहीकाळ त्याा मार्गावरील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली होती. स्त्री रूग्णालयात जाण्याच प्रवेशद्वार असल्याने त्याािठकाणी रूग्णवाहिका अडकण्याची सुध्दा शक्यता होती. याच ठिकाणी सदर टँकर पलटी झाला.




# राज्य महामार्गावर वाहतूक कोंडी; वाहतूक पोलीसाची गरज

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
डोणगाव दि.१९

डोणगाव येथून नागपूर ते मुंबई राज्य महामार्ग गेलेला आहे या राज्य महामार्गोवर सदैव वाहनांची वर्दळ असते पण डोणगाव येथील बसस्थानकावर झालेले अतिक्रमण तसेच सतत बसस्थानकावर उभ्या असणाऱ्या अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या बसेस यांना चक्क राज्य महामार्गोवर बसेस उभ्या कराव्या लागत असल्याने डोणगाव बसस्थानकावर राज्य महामार्गोवर तास न तास वाहतूकीची कोंडी होत आहे.



परंतु या ठिकाणी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी साधा वाहतूक पोलीस ही तैनात राहत नसल्याने ही वाहतूक कोंडी वाहनधारकांना मनस्ताप देणारी ठरत आहे. या अगोदर ही ह्या वाहतूक कोंडी चा सामना माजी मंत्री मनोहरराव नाईक तसेच न्यायाधीश यांना करावा लागला होता तेव्हा तात्पुरती वाहतूक पोलीस पाठवून ही वाहतूक सुरळीत करण्यात आली होती.

पण सध्या डोणगाव बसस्थानकावर चक्क प्रवासी लग्झरी तसेच प्रवासी वाहतूक करणारी वाहने चक्क बसस्थानकावर राज्य महामार्गोवर खुले आम अवैध प्रवासी वाहतूक करतांना दिसतात एवढेच नव्हे तर या वाहनांमुळे वारंवार वाहतूकीचा खोळंबा होत आहे तरीही याकडे संबधित पोलीस प्रशासन दुर्लक्ष करून बघ्यांची भुमिका घेत आहे. त्यामुळे वरीष्ठांनी याकडे लक्ष देऊन कारवाई करुन कायमस्वरूपी वाहतूक पोलीस नियुक्त करणे गरजेचे आहे.

# अल्युमिनियमची तार चोरणारी तीन जणांची टोळी जेरबंद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१९

जिल्ह्यात विद्युत खांबावरील अल्युमिनियम तारांच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करीत तिन जणांच्या टोळीला अटक केली आहे. यावेळी आरोपीच्या ताब्यातुन ३५ किलो ॲल्युमिनियमची तार व वाहन असा एकुण तीन लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई १६ मे रोजी करण्यात आली आहे.

जळगाव जामोद पोलिस ठाण्याम विद्युत पोलवरील तार चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या चोरी प्रकरणाचा समांतर तपास करीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संतोष पावरा, बेलरसिंग पावरा, शेख सईद सर्व रा. पिंपळगाव काळे, ता. जळगाव जामोद यांना अटक केली. यावेळी त्यांच्या ताब्यातुन अल्युमिनियम तार व वाहन असा एकूण तीन लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त तीनही आरोपी विद्युत खांबाजवळ पडलेल्या ॲल्युमिनियमच्या तारांची चोरी करुन ती भंगार विक्रेत्याांना विकत होते.




पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर केले असता, त्याापैकी दोन जणांना पोलिस कोठडीत तर एकाला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. यावेळी पोलीसांनी आरोपीची चौकशी केली असता, त्याांनी वीज तार चोरी केल्याची कबुली दिली आहे. उर्वरित मुद्देमाल हस्तगत करण्याचे काम सुरू आहे. पोलिस कोठडीत असलेल्या आरोपीच्या चौकशीतून इतर चोरीच्या घटनांची माहिती मिळण्याची शक्यता आहे. ही कारवाई स्थागुशाचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पोलिस कर्मचारी शारदा कणसे, एजाज खान, गणेश पाटील, गोपाल तारुळकर व शिवानंद हेलगे यांनी केली आहे.

# जिल्हा नियोजनच्या निधीचा विनियोग दर्जेदार कामासाठी करावा : पालकमंत्री

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१९

जिल्हा वार्षिक योजनेतून सन २०२५-२६ करीता जिल्ह्याला ६१२.३९ कोटी रुपयांचा निधी प्राप्त होणार आहे. या निधीतून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने प्रयत होणे अपेक्षित आहे. यासाठी सर्व यंत्रणांनी त्याांना प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग मुलभूत सुविधासह दर्जेदार कामासाठी करावा, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी दिली.

जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली. यावेळी केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव, विधान परिषद आमदार किरण सरनाईक, धीरज लिंगाडे, विधानसभा आमदार चैनसुख संचेती, संजय गायकवाड, मनोज कायंदे, सिद्धार्थ खरात, श्वेता महाले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा पोलिस अधीक्षक विश्व पानसरे, जिल्हा नियोजन अधिकारी राहूल पवार उपस्थित होते. पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले, शाळांमध्ये चांगल्या सोयी मिळण्यासाठी शाळा सुस्थितीत असणे गरजेचे आहे. शाळा खोल्यांचे वारवांर दुरुस्तीवर होणारा खर्चाचा स्ट्रॅक्चरल ऑडीट करुन घ्यावे. पावसाळ्याच्या दिवसात विद्युत तारांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी महावितरणाने तातडीने कामे मार्गी लावावे. पीक विमा योजनेंतर्गत प्रलंबित असलेले नुकसान भरपाई शेतकऱ्यांना विनाविलंब मिळेल यासाठी कृषि विभागाने प्रयत करावे. तसेच पिकांच्या नुकसानीचे पंचनामे योग्य पद्धतीने होणे आवश्यक असून यासाठी कृषि विभाग व विमा कंपनी यांनी संयुक्त पंचनामे करुन शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळवून द्यावा, असे निर्देश यावेळी दिले.




जिल्ह्याला यावर्षी ६१२.३९ कोटी रूपयांचा निधी मिळणार आहे. यामध्ये जिल्हा वार्षिक योजनामध्ये (सर्वसाधारण) ४९३ कोटी, विशेष घटक योजनेमध्ये १०० कोटी व आदिवासी उपयोजनामध्ये १९.३९ कोटी एवढा नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे. ३२५.४३ कोटी गाभा, तर १४४.५२ कोटी बिगर गाभा क्षेत्राला मिळणार आहे. तसेच नाविण्यपूर्ण व इतर क्षेत्राला निधी मिळणार आहे. यासाठी सर्व यंत्राणानी तातडीने मागणी सादर करुन प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घ्यावी. जिल्ह्याचा विकास समतोल व्हावा यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. मंजूर नियतव्यय खर्च करण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणेने सुक्ष्म नियोजन करावे. प्रशासकीय दिरंगाई आणि कामांच्या गुणवत्तेतील चालढकल सहन केली जाणार नाही, असे निर्देश पालकमंत्री पाटील यांनी यावेळी दिल्या.

# दिव्यांग व जेष्ठ नागरिकांसाठी तालुकास्तरावर शिबिराचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.१९

बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्ती व ६० वर्षा वरील जेष्ठ नागरीक यांचे कृत्रीम अवयव व आवश्यक साधणाकरीता तपासणी शिबाराचे आयोजन तालुकास्तरावर करण्यात आले आहे. दि. १९ ते ३१ मे २०२५ दरम्यान सकाळी ९ ते ४ वाजेपर्यंत संबंधित तालुक्याच्या शिबीराच्या ठिकाणी दिव्यांग व्यक्ती व ६० वर्षा वरील जेष्ठ नागरीकांचे तपासणी करण्यात येणार आहे. तरी शिबीरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.



तालुकानिहाय शिबीर याप्रमाणे : मंगळवार दि. २० मे रोजी चिखली तालुक्यातील अपंग विद्यालय, बुधवार दि. २१ मे रोजी मेहकर तालुक्यातील विवेकानंद आश्रम हिवरा आश्रम मेहकर, गुरुवार दि. २२ मे रोजी लोणार तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय, शुक्रवार दि. २३ मे सिंदखेड राजा तालुक्यातील जिजामाता मुकबधीर विद्यालय, शनिवार दि. २४ मे रोजी देऊळगाव राजा तालुक्यातील संत ज्ञानेश्वर मुकबधीर विद्यालय दे.मही, रविवार दि. २५ मे रोजी मोताळा तालुक्यातील पंचायत समिती सभागृह, सोमवार दि. २६ मे रोजी मलकापूर तालुक्यातील भ.महावीर मुकबधीर विद्यालय वसतिगृह, मंगळवार दि. २७ मे रोजी नांदुरा तालुक्यातील पंचायत समिती सभागृह, बुधवार दि.२८ मे रोजी खामगाव तालुक्यातील मुकबधीर विद्यालय, गुरुवार दि. २९ मे रोजी शेगावा तालुक्यातील मतीमंद विद्यालय, शुक्रवार दि. ३० मे रोजी जळगाव जामोद तालुक्यातील पंचायत समिती सभागृह, व शनिवार दि. ३१ मे रोजी संग्रामपूर तालुक्यातील पंचायत समिती सभागृह येथे तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी बुलढाणा जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्ती व ६० वर्षा वरील जेष्ठ नागरीक यांनी या याजनेचा लाभ घ्यावा, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
मंगळवार, दि. २० मे २०२५

# राज्यात १४ लाख ८९ हजार विद्यार्थी घेणार अकरावीत प्रवेश

## २१ मे पासून विद्यार्थ्यांच्या नोंदणीला प्रारंभ, ३ जूनला अंतिम गुणवत्ता यादी होणार जाहीर

अजिंक्य भारत । सुधीर केने

**अमरावती, दि. १९ :** राज्यात यावर्षीपासून अकरावी ऑनलाइन प्रवेशास प्रारंभ झाला आहे. यंदा राज्यात १४ लाख ८९ हजार ८२६ विद्यार्थी अकरावीत प्रवेश घेणार आहे. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष नोंदणीला २१ मे पासून प्रारंभ होणार असून ३ जूनला अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे. यावर्षी उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या १४ लाख ८९ हजार ८२६ एवढी असली तरी राज्यात मात्र अकरावी प्रवेशासाठी २० लाख ४३ हजार २५४ जागा आहेत. यामध्ये विज्ञान शाखेच्या ८लाख ५२,हजार २०६ ,वाणिज्य शाखेच्या ५ लाख ४० हजार ३१२ तर कला शाखेच्या ६ लाख ५० हजार ६८२ जागा आहेत. अकरावी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर झाले असून २१ मे पासून २८ मे पर्यंत विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष नोंदणीला प्रारंभ होणार आहे .३० मे रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर होईल .३० मे ते १ जून या कालावधीत प्रवेशावर हरकती घेतल्या जाणार



आहेत. ३ जूनला अंतिम गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल. ५ जूनला गुणवत्ता यादीवर आधारित प्रवेश वाटप करण्यात येतील .६ जून रोजी वाटप केलेल्या महाविद्यालयांची यादी पोर्टलवर प्रकाशित केली जाणार असून ६ ते १२ जून या कालावधीत प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे .याचवेळी कागदपत्रांची तपासणी केली जाईल. त्यानंतर १४ जून रोजी दुसऱ्या फेरीकरिता रिक्त जागांची यादी जाहीर करण्यात येईल.यावर्षी दहावीच्या निकालात १४ लाख ५५ हजार ४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर ३४ हजार ३९३ विद्यार्थी एटी-केटीसाठी पात्र ठरले आहेत त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांचा अकरावीत प्रवेश होणार आहे.

### कोटा प्रवेश ६ जून पासून

अकरावीचे प्रवेश करत असताना व्यवस्थापन कोटा, इन हाऊस कोटा आणि अल्पसंख्यांक कोटा ठरवून दिला आहे .त्यानुसार या तिन्ही कोट्यातील विद्यार्थ्यांचे प्रवेश सहा जून पासून सुरुवात करण्यात येणार आहे. अकरावीच्या प्रवेशासाठी नोंदणी शुल्क हे डिजिटल पद्धतीने भरावे लागणार आहे.

| विभाग | एकूण क्षमता | कला | वाणिज्य | विज्ञान |
|---|---|---|---|---|
| अमरावती | १,८६,४७५ | ८०,७४० | २४,३४० | ८१,३९५ |
| छत्रपती संभाजीनगर | २,६६,७५० | १,११,१६५ | ४२,६१५ | १,१२,६७० |
| कोल्हापूर | १,९३,२७८ | ६४,५७२ | ४८,४६६ | ८०,२४० |
| लातूर | १,३७,५५० | ५२,८६० | २१,२६० | ६३,४३० |
| मुंबई | ४,६१,६४० | २२,९५५ | २७,२९३० | १६०७१५ |
| नागपूर | २,१४,३९५ | ७६,३९५ | ३८,८३० | ९९,८७० |
| नाशिक | २,०७,३२० | ८३,००० | ३७,०२० | ८६,७३० |
| पुणे | ३,७५,८४६ | १,०३,७०५ | १,०१,९७१ | १,७०,१७० |

## थोडक्यात

### आ. रवी राणांनी स्वीकारला आश्वासन समितीचा पदभार



**अमरावती :** आमदार रवि राणा यांची आश्वासन समितीचे अध्यक्षपदी नियुक्ती झाल्या बद्दल विधानसभा अध्यक्ष श्री राहुल नार्वेकर विधानपरिषद सभापती श्री राम शिंदे साहेब आणि विधानपरिषद उप सभापती डॉ निलमताई गोऱ्हे यांनी पुष्प गुच्छ देऊन स्वागत करून आणि अभिनंदन केले व यशस्वी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे. उपाअध्यक्ष अण्णा बनसोडे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, विधानसभा सचिव जितेंद्र भोळे, विलास आठवले, सचिव मेघना तळेकर, आदींची यावेळी उपस्थिती होती.

### महिलांनी आरोग्याची काळजी घेणे काळाची गरज– ॲड.नमिता कुचे

**अमरावती :** धकाधकीच्या या काळात महिलांनी आपल्या



आरोग्याकडे दुर्लक्ष न करता आरोग्याची काळजी घेणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन नमिता फिटनेस क्लबच्या संचालिका ॲड.नमिता कुचे यांनी केले. वरद महिला बचत गट आणि नमिता फिटनेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत महिला मेळाव्यात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.सौ.सुलभा खोडके होत्या. संत गाडगे बाबा महाराज संस्थान हॉलमध्ये पार पडलेल्या या मेळाव्याला मोठयासंख्येने महिला उपस्थित होत्या. यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या धकाधकीच्या जीवनात स्त्रिया आपल्या आरोग्याकडे कशा दुर्लक्ष करतात तसेच महिला या संसाराचा केंद्रबिंदू असतात. त्यामुळे सतत त्या राबत असतात, मुलाचं करताना, त्याच्या कुटुंबाचं करताना कधी त्याचं हिमोग्लोबीन कमी होत, कधी त्यांचा बीपी कमी होतो, कधी त्यांना शुगर होते हे लक्षातच येत नहीं, पण महिला ही कुटुंबाचा महत्वाचा भाग असल्यामुळे तिने स्वतःला स्वस्थ ठेवणं आवश्यक आह असे नमिता कुचे म्हणाल्या. यावेळी आ. खोडके यांनीसुद्धा नमिता कुचे यांच्या कर्याची प्रशंसा केली व कौतुक केले.महिलांनी २४ तासांमध्ये एक तास स्वतःला देणे गरजेचे आहे. तुम्ही कुठलाही व्यायाम केला तरी चालेल,, सक्षम महिला निरोगी राहिली तर घर आपोआप निरोगी राहील. आज सांगताना वाईट वाटत की डायबेटिसमध्ये महिलांचा नंबर पहिला आहे. तरी आपण आपले रोजचे रूटीन व्यवस्थित करून काळजी घेणं गरजेचे आहे. मान्यवरांचे आभार वरद महिला बचत गटाच्या उपाध्यक्ष साधना गणेशपुरे यांनी मानले.

### ‘मधाचे गाव’ आमझरी येथे आज जागतिक मधमाशा दिन

**भारत वरठे, धारणी :** जिल्ह्यातील मधाचे गाव असलेल्या आमझरी येथील निसर्ग पर्यटन संकुलात मंगळवार, दि. २० मे रोजी सकाळी ११ वाजता जागतिक मधमाशा दिन साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे मधपाळाचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. नैसगिक संसाधनांचे संवर्धन व ग्रामीण भागातील युवक आणि महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे मधाचे गाव संकल्पना राबविण्यात येत आहे. त्यानुसार चिखलदरा तालुक्यातील आमझरी या गावाची ‘मधाचे गांव’ म्हणून निवड करण्यात आली आहे. आमझरी गाव चिखलदरा पर्यटनस्थळाच्या नजिक आहे. आमझरी वन नर्सरी पर्यटनस्थळ आहे. या गावामधे स्थानिक आदिवासी आग्या मधमाशाचे मध काढण्याचा व्यवसाय पारंपारीक पद्धतीने करतात. त्यामुळे या गावात खादी आणि ग्रामोद्योग मंडळाने स्थानिक लाभार्थींना आग्या मधमाशाचे शास्त्रीय पद्धतीने मध काढण्याचे प्रशिक्षण देऊन मध काढण्यासाठी लागणारे साहित्य वाटप करण्यात आले आहे. महत्व याबाबत माहिती होण्यासाठी विविध उपक्रम प्रस्तावित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमात मधमाशी पालन तज्ज्ञाचे मार्गदर्शन मधपाळाना लाभणार आहे. जिल्ह्यातील मधपाळ आणि शेतकऱ्यांनी मेळाव्याला उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी केले आहे.

# व्हीलचेअर अभावी रुग्ण खांद्यावर

## २५ व्हीलचेअर तर २८ स्ट्रेचर असल्याचा प्रशासनाचा दावा; रुग्णांची जिल्हा सामान्य रुग्णालयात हेळसांड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १९ :** जिल्हा सामान्य रुग्णालय येथे साहित्य उपकरणा अभावी रुग्णासह नातेवाईकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दिवसेंदिवस रुग्ण संख्या वाढल्याने सुविधांचा अभाव वाढत चालला आहे. व्हीलचेअर, स्ट्रेचर वेळेवर रुग्णांना न मिळाल्याने रुग्णाच्या नातेवाईकांना कसरत करावी लागत आहे.

रुग्णालयात सध्या स्थितीत २५ व्हीलचेअर आणि २८ स्ट्रेचर असूनही नातेवाईक रुग्णाला आपल्या खांद्यावर घेऊन वार्डापर्यंत पोहोचत असल्याचे विदारक चित्र सध्या पाहायला मिळत आहे. अनेकदा तर स्ट्रेचर असूनही ते ढकलण्यासाठी कोणी उपलब्ध राहत नाही. जिल्हा




सामान्य रुग्णालयामध्ये रोज विविध आजारांचे शेकडो तसेच अपघात ग्रस्त रुग्ण उपचारासाठी येत असतात. परंतु रुग्णालयात सोयी सुविधा अपुऱ्या पडत आहे. मनुष्यबळ कमी असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे चित्र तर रुग्णालयात रोजच पाहायला मिळत असते. त्यासोबत आता व्हीलचेअर, स्ट्रेचर वेळेवर उपलब्ध न झाल्याने रुग्णासह नातेवाईकांना कसरत करावी लागत आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात १७ वार्ड असून प्रत्येक वार्डात दोन व्हीलचेअर, स्ट्रेचर असल्याचा



रुग्णालय प्रशासनाने दावा केला आहे. तसेच ओपीडी मध्ये चार्ट ठेवण्यात आले तेही सांगण्यात येते. गंभीर रुग्ण रुग्णालयात आल्यास वेळेवर व्हीलचेयर स्ट्रेचर मिळत नाही. त्यामुळे अनेकदा खांद्यावर रुग्णांना घेऊन यावे लागते. तसेच अनेक स्ट्रेचरची चाके तुटलेली आहे. एका वार्डातून दुसऱ्या वार्डात घेऊन जाण्यासाठी अटेंडंट व रुग्णाच्या नातेवाईकांना त्याला जोराने धक्का मारत न्यावे लागते. काही महिन्यापासून रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढली आहे. इर्विन रुग्णालयाचा गलथान कारभार दिवसेंदिवस चव्हाट्यावर येत आहे. २८ एप्रिलला ब्राह्मणवाडा गोविंदपुर येथील ७० वर्षे वृद्ध प्रमिला मोहर यांना उपचार साठी दाखल करण्यात आले असता हेल्पर व स्ट्रेचर न मिळाल्याने त्यांना हा त्रास सहन करावा लागला यावेळी या वृद्ध महिलेच्या नातेवाईकांना हातावर उचलून आणावे लागले. प्रगत महाराष्ट्रात आजही असे चित्र आहे. हे दुर्दैव म्हणावे लागेल. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्णांना योग्य उपचार दिला जात नाही. वैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचारी सुद्धा रुग्ण व त्यांच्या नातेवाईकासोबत नेहमीच अरेरावीची भाषा वापरतात. त्यामुळे अनेकदा या रुग्णालयात वाद होऊन हानामारी पर्यंत बरेच प्रकरणे घडली.

असे प्रकार घडल्यास उलट रुग्णांच्या नातेवाईकांवर पोलिसात गुन्हे दाखल केल्या जातात. हा सर्व प्रकार गेल्या काही दिवसापासून जिल्हा सामान्य रुग्णालयात राजरोसपणे सुरू आहे. या प्रकारणाची आतापर्यंत कुठल्याही नेत्याने किंवा वरिष्ठ अधिकाऱ्याने दखल घेतली नाही. उलट जिल्हा सामान्य रुग्णालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांची व दलालांची मनमानी वाढलेली आहे. दलाला मार्फत रुग्णालयात बरीच मोठी कामे केली जातात. वैद्यकीय अधिकारी कर्मचारी कामे करीत नाही. उघडकीस येत आहे. या गंभीर बाबीकडे जिल्हा प्रशासनाने, नेत्यांनी लक्ष द्यावे अशी मागणी जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांनी केली आहे.

### मागणी तसा पुरवठा नाही

जिल्हा सामान्य रुग्णालयात २५ व्हीलचेअर आणि २८ स्ट्रेचर आहे. दरवर्षी आपण मागणी करतो, मात्र मागणी ५० ची केली तर पंधरा ते वीस व्हीलचेअरचे किंवा स्ट्रेचर प्राप्त होतात. सर्व विभागात दोन ते तीन व्हीलचेअर व स्ट्रेचर ठेवले आहे. रुग्णांना स्ट्रेचरच्या सह्याने वार्डापर्यंत नेले जाते.

**राजेंद्र सिरसाट,** औषधी व भंडार विभाग इर्विन

# गाडगेनगर ठाण्यात महिलेचे ठिय्या आंदोलन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १९ :** गाडगेनगर पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या जिजाऊ कॉलनी येथील गोकुळ आश्रमच्या संचालक यांना फोन वर अश्लिल भाषेत धमकी दिली. महिलेने याबाबत पोलिसात तक्रार दाखल केली. मात्र पोलिसांनी थातूर मातूर कारवाई केली. परंतु महिलेचे सम ाधान न झाल्याने सोमवारी महिला ही कार्यकर्त्यांसह गाडगेनगर ठाण्यात पोहचली जोपर्यंत आरोपीवर कठोर कारवाई केली जात नाही तो पर्यंत ठाण्यातून उठणार नाही असा पवित्रा घेतल्याने अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची चांगलीच खळबळ उडाली होती. गोकुळ आश्रमच्या संचालक गुंजन अश्विण तळेगावकर यांना एक महिन्यापासून एक इसम फोनवर अश्लिल शिविगाळ करीत आहे. या महिलेच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी इम्रान



नामक व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गुंजन तळेगावकर या गोकुल आश्रम चालवितात. एक महिन्यांपासून १५ वर्षिय नाबालिकेला तिच्या आश्रममध्ये सोडले होते. त्यामुळे त्या बालिकेचा उदर निर्वाह गोकूल आश्रम संस्था करीत होती. १४ मे रोजी दुपारी गुंजन तळेगावकर यांना एका नंबरवरून फोन आला. तो व्यक्ती आश्रमात असलेल्या त्या नाबालिक मुलीशी बोलने करून द्या असे म्हणत होता. त्यानंतर गुंजन तळेगावकर यांनी त्या बालिकेला घेऊन जाण्यासाठी सांगितले. त्यानंतर इब्रान नामक युवकाने गुंजन तळेगावकर यांना फोनवर अश्लिल शिविगाळ केली. गाडगेनगर पोलिसात तक्रार केली. त्यावरून पोलिसांनी कारवाई केली परंतु गुंजन यांचे पोलिसांनी केलेल्या कारवाईवर समाधान न झाल्याने त्यांनी गाडगेनगर पोलिसात कार्यकर्त्यांसह ठिय्या आंदोलन केले. जो पर्यंत आरोपीवर कठोर कारवाई केली जात नाही तो पर्यंत ठाण्यातून उठणार नाही त्यामुळे पोलिस प्रशासनात एकच खळबळ उडाली होती.

# दक्षिणेकडे जाणाऱ्या रेल्वेमध्ये अकोला स्टेशनवर दारू पकडली

## आरपीएफ, क्राईम ब्रांच आणि अकोल्याची संयुक्त कारवाई

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बडनेरा, दि. १९ :** गेल्या काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात दक्षिणेकडे जाणाऱ्या रेल्वे स्टेशन वर रेल्वे गाड्यांमध्ये दारूची सर्रास विक्रीकरिता रेल्वेने दारूची अवैद् तस्करी केली जात आहे त्यामुळे आज दुपारी रेल्वे सुरक्षा बल क्राईम ब्रांच निरीक्षक. के एन राय संतोष शेटे .प्रवीण मालवीय व अकोला निरीक्षक लक्ष्मण यादव व पंकज गवई, - यांनी संयुक्त रीत्या सापळा रचून गाडी नंबर १९३०१ इंदोर यशवंतपूर एक्सप्रेस मध्ये अकोला स्टेशन वरून आरोपी चढत असताना त्याच्या ताब्यातून अनेक कंपनीच्या इंग्लिश




दारूच्या बाटल्या तसेच देशी दारूचे बॉटल एकूण ६० आरोपी सहित ताब्यात घेण्यात आले आरोपी मोहनलाल भावले खरगोन आणी विनय विजय कुमार कानपुर यावर कारवाई करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसापासून अकोला या स्टेशनवर दारूची तस्करी मोठ्या प्रमाणात चोरून लपून सुरू आहे त्यामुळे भुसावळ सुरक्षा रक्षक दलाचे क्राईम ब्रँच चे निरीक्षक के. एन राय यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

### वाढत्या तापमानामुळे कोंबड्यांना एसी सारखी गार-गार हवा

# प्रगतिशील शेतकरी रवींद्र मेटकरांनी बनविले अनोखे जुगाड!

अजिंक्य भारत। साहेबराव राऊत

**अंजनगावबारी, दि. १९ :** उन्हाळ्यामध्ये विदर्भातील तापमान हे ४० अंशांच्या पार जातं. वाढत्या तापमानाचा फक्त नागरिकांनाच नाही तर प्राणी आणि पक्षांना सुद्धा त्रास होतो. ज्यांच्याकडे पोल्ट्री फार्म आहे त्यांना तर उन्हाळा अतिशय कठीण जातो. त्यांचे अनेक वेळा नुकसानही होते. हे नुकसान टाळण्यासाठी आणि उन्हाच्या त्रासापासून कोंबड्यांचा बचाव करण्यासाठी अमरावती तालुक्यातील अंजनगाव बारी म्हसला येथील शेतकरी रविंद्र मेटकर यांनी एक सिस्टीम सुरू



केली आहे. त्यांनी टाइमर असलेले फॉगर कोंबड्याच्या बचावासाठी लावले आहे. त्याचबरोबर ठिबकची नळी लावून सुद्धा एक वेगळा



प्रयोग केलाय.अंजनगाव बारी येथील प्रगतशील शेतकरी रविंद्र मेटकर यांनी शून्यातून विश्व निर्माण केले आहे. त्यामुळे ते प्रत्येक परिस्थितीमध्ये जागरूक असतात. त्यांना मिळालेल्या अनुभवातून ते अजूनही शेती आणि पोल्ट्री फार्म असे दोन व्यवसाय चालवतात.

रविंद्र मेटकर यांच्यकडे आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगतात की, माझ्याकडे १ लाख ८० हजार कोंबड्या आहेत. त्याचे उन्हाळ्यात व्यवस्थापन करायला खूप त्रास होतो. अनेक कोंबड्या मरतात आणि नुकसान होते. तर यावर उपाय म्हणून मी टाइमर असलेले फॉगर लावले आहे. १ लाख ८० हजार कोंबड्यांच्या बचावाचे नियोजन करणे खूप कठीण होते.

त्यामुळे काहींसाठी स्वयंचलित सिस्टीम आहे. ती पूर्णतः वातानुकूलित असल्याने त्यात इतका त्रास होत नाही. पण, पत्राच्या शेडमध्ये तापमान संतुलित ठेवण्यासाठी वेगवेगळे प्रयोग आम्ही करून बघितले. एक प्रयोग म्हणजे टाइमर असलेले फॉगर. दुसरे म्हणजे शेडच्या सभोवताल बारदानी लावली. त्यावर एक ठिंबकची नळी लावली. त्यातून थेंब थेंब पाण्यामुळे ती फारी ओली होते आणि पक्षांना थंड वातावरण मिळते. या दोन्ही सिस्टीममुळे मला खूप फायदा होत आहे. फॉगरला टाइमर असल्याने कोंबड्या ओल्या होत नाही. त्यामुळे त्यांना अन्न व्यवस्थित सेवन करता येत. अन्न व्यवस्थित मिळाल्याने अंडी छान देतात. त्याचबरोबर पक्षांची मर कमी होते आणि नुकसान होत नाही. बाहेर जर तापमान ४४ अंश सेल्सिअस इतके असेल तर हे प्रयोग केल्यानंतर शेडमध्ये ३७ अंश सेल्सिअस इतके तापमान अनुभवायला मिळते, असे रविंद्र सांगतात.

## थोडक्यात

### श्री शिवाजी हायस्कूल व क.म.वि., रामतीर्थचा १० वी चा निकाल ९६.४६ टक्के



**रामतिर्थ :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी हायस्कूल व क. म. वि. रामतीर्थ ता. दर्यापूर दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १० वी परीक्षा २०२५ ची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली विद्यालयातून प्रथम क्रमांक कु.कृतिका गणेश सुरजुसे हिला प्राप्त झाला त्याचप्रमाणे कु. संजना संतोष बावणे, यश चंद्रशेखर शेंडोकार ,प्रथमेश समाधान सुरजुसे, यश भूषण खडे ,सुशांत संजय घुसे, यांना अनुक्रमे द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पाचवा क्रमांक प्राप्त झाला. विद्यालयातील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक श्री आर. बी. गव्हाळे व शिक्षक श्री. के. एम. पाटील ,श्री आर.एच.ठोसर , कु. के. एस. काळे मॅडम व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी शाळा समितीचे सदस्य व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांनी अभिनंदन व कौतुक केले.

### जीवन विकास विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन



**दर्यापूर :** इथून जवळच असलेल्या कमलापूर तरोडा येथील जीवन विकास विद्यालय विद्यालयांमध्ये २५ वर्षानंतर प्रथमच सन २००० मधील दहावी माजी विद्यार्थ्यांचा सहस्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ठाकरे सर तर प्रमुख अतिथी पातुर्डे सर जामणीक सर,महल्ले सर डालके सर यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी आपले अनुभव विशद केले कार्यक्रमाचे संचालक डॉक्टर सुबोत घाटे तर आभार प्रवीण बायस्कर यांनी मानले.

### विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे आवाहन

**अमरावती :** विद्यार्थी हिताच्या योजनांचे फलक सर्व महाविद्यालयांनी आपापल्या महाविद्यालयांमध्ये दर्शनी भागात लावावे, जेणेकरुन विद्यार्थ्यांना त्या त्या योजनांचा लाभ घेता येईल, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात आले आहे. पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता श्रमसंस्कार, सामाजिक बांधिलकी, आर्थिक सहाय्य याकरिता योजना तयार करण्यात आल्या आहेत. संत गाडगे बाबा कमवा व शिका योजना, संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना, संत गाडगे बाबा विद्याधन योजना, विद्यापीठ विद्यार्थी दायित्व निधी योजना/महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना, संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना, संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना, संत गाडगे बाबा विद्यार्थी विकास निधी शिष्यवृत्ती, स्व. प्रा. रामप्रकाश शामलालजी राठी स्मृती शिष्यवृत्ती, कौशल्य विकास योजना, संत गाडगे बाबा सायकल योजना, विद्यार्थी सुरक्षा विमा, विविध पुरस्कार यांचा यात समावेश आहे. विद्यार्थी हितार्थ असलेल्या या योजनांचे फलक सर्व महाविद्यालयांना आपापल्या महाविद्यालयांमध्ये दर्शनी भागात लावावयाचे आहे. फलकांबाबतचा तपशील सर्व महाविद्यालयांना विद्यापीठाच्या विकास विभागामार्फत पाठविण्यात आला असून त्यानुसार महाविद्यालयांनी फलक तयार करुन ते लावावयाचे आहे. सविस्तर माहितीकरिता संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

## सावकारी विरोधात धाडसत्र

### वरुड पोलिसाच्या मदतीने राजुरा बाजार येथे कारवाई

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. १९ :** वरुड तालुक्यातील राजुरा बाजार निवासी निलेश सिद्धेश्वर साबळे हे अवैध सावकारी करतात अशी तक्रार येथे जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला प्राप्त झाली होती. त्यानुसार एका विशेष पथकाच्या साह्याने धाडसत्र राबविण्यात आले या धाडीमध्ये दोन चिठ्ठ्या शंभर रुपयाचा कोरा स्टॅम्प पेपर आणि एका लोखंडी कपाटात व पेटीत असलेले नऊ लाख ९७ हजार ४९९ जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई वरून पोलिसांच्या सहकार्याने करण्यात आली.

जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या कार्यालयात अवैध सावकारी संदर्भात तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने कारवाईसाठी कुंभार यांनी पथकाची नेमणूक केली. त्यानंतर राजुरा बाजार येथील निलेश साबळे यांच्या घरी दहा टाकली. सकाळी साडेअकरा वाजता सुरू झालेली ही कारवाई दुपारी अडीच वाजेपर्यंत सुरू होती. धाड पथकात सहाय्यक निबंध अशीच चर्चा सहकार अधिकारी सुधीर मानकर सहाय्यक निबंध

उज्वला मोहोळ व नंदकिशोर जवळ जाळ पंच मयूर कोहळे व रोशन चौधरी आणि पोलीस कर्मचारी अंजली नांदुरकर व चंद्रकांत केंद्रे यांचा समावेश होता. संबंधितांनी घरातील प्रत्येक साहित्याची पडताळणी केली या कारवाईत प्राप्त झालेल्या दत्त आयोगाची पडताळणी जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार सहाय्यक निबंध स्वाती गुडघे यांच्या मार्गदर्शनात वरुड चे सहाय्यक निबंध अशी चर्जन करतील असे सहकार अधिकारी सुधीर मानकर यांनी कळविले आहे.

## शिक्षण व्यवस्थेवर परिणाम करणारा निर्णय होणार रद्द!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १९ :** ग्रामीण शिक्षण व्यवस्थेवर परिणाम करणारा व शिक्षकांवर गंडांतर आणणारा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून या कामी भाजपचे प्रदेशाध्यक्ष व राज्याचे महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी पुढाकार घेतला आहे. तर शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सयोजक चंद्रशेखर भोयर हे या संदर्भात पाठपुरावा करीत आहे. मुंबई येथील भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयात चंद्रशेखर भोयर यांनी प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली आणि आणि नवीन संच मान्यते संदर्भात १५ मार्च २०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णय संदर्भात सविस्तर चर्चा केली. या शासन निर्णयामुळे ग्रामीण भागातील बहुजन, शेतकरी, शेतमजूर, गोरगरीब यांची मुले मोफत शिक्षणापासून वंचित राहणार आहेत. याचा थेट परिणाम हजारो शिक्षक, विद्यार्थी आणि पालकवर्गावर होणार असल्याचे सांगून चंद्रशेखर बावनकुळे यांचे या गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्यात आल त्यांनीही या विषयाचे गांभीर्य लक्षात घेत, तत्काळ राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेवर परिणाम करून शिक्षकांना अतिरिक्त ठरवणारा शासन निर्णय तत्काळ मागे घेण्यात यावा, हीच माझी शासनाकडे आग्रही मागणी आहे. गरीब व गरजू विद्यार्थ्यांचे हक्काचे शिक्षण वाचवण्यासाठी मी लढा देत असून हा लढा सुरूच राहणार असल्याचे शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व शिक्षक भाजप आघाडीचे प्रदेश संयोजक चंद्रशेखर भोयर यांनी म्हटले आहे.

## ग्रामीण शिक्षणात आणणार नवीन एआयचे नवे पर्व–राजाभाऊ देशमुख

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**चांदुर बाजार, दि. १९ :** नुकतीच श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था तळवेल व मायलीन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. एआय अंतर्गत झालेल्या कार्यशाळेच्या अध्यक्ष स्थानी राजाभाऊ देशमुख (अध्यक्ष श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था), नरेन्द्रराव देशमुख (सचीव श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था तळवेल) सदस्या जयश्रीताई देशमुख यांच्या उपस्थितीत तर्फे श्री मनोज देशपांडे, नेहा देशपांडे नेहा दरेकर यांनी सर्व मुख्याध्यापक, शिक्षक यांना एआय यासंदर्भात कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था तळवेल आपल्या पाच मराठी माध्यमाच्या शाळा आणि एक इंग्रजी माध्यमाच्या शाळेसह ग्रामीण भागात शिक्षण देण्याचे कार्य करीत आहे ग्रामीण शिक्षणात क्रांती घडवण्यासाठी आता नवीनचा अवलंब संस्थेच्या पाचही शाळेत शिक्षक सक्षमीकरण व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास याकरिता करण्यात येणार आहे श्री राजाभाऊ देशमुख अध्यक्ष यांचे नेतृत्वात श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था व यांच्यासोबत २४ महिन्यांचा करार केला आहे हा उपक्रम प्रत्यक्ष १५ मे २०२५ पासून शिक्षक कार्यशाळेने सुरू झाली. श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्थां आणि परिसरातील शिक्षकांसाठीचे प्रादेशिक केंद्र म्हणून उदयास येईल त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांचा दर्जा उंचावेल आणि पालकांमध्ये



मराठी माध्यमाच्या शाळेकडे कल निर्माण होईल त्यामुळे इंग्रजी माध्यमांच्या गैरसमजनांना सुद्धा आव्हान मिळेल.आमच्या शाळेतील प्रत्येक मुलाला मराठी माध्यमातून शिकताना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे हा माझा संकल्प आहे यामुळे इंग्रजी भाषा येत नाही हा न्यूनगंड आता दूर होईल शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने देऊन आम्ही त्यांना समक्ष सक्षम बनवत आहोत ज्यामुळे ते आपल्या विद्यार्थ्यांना आणि परिसरातील इतर शिक्षकांना सुद्धा प्रेरणा देतील असे राजाभाऊ देशमुख म्हणाले.

श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्थाच्या माध्यमातून स्थानिक सांस्कृति आणि तंत्रज्ञान यांचा संगम घडवून आणेल त्यामुळे पालकांना खात्री पटेल की आपले मुले स्थानिक भाषेत उज्वल भविष्य घडवू शकतात २०20 च्या अंमलबजावणी मध्ये पुढचे पाऊल राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे व्हिजन नुसार बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी कटिबद्ध आहे श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्थां आता वर आधारित मूल्यांकन आणि वैयक्तिक शिक्षण पद्धती लागू करेल या विद्यार्थ्यांची उच्चस्तरीय कौशल्य, विश्लेषण ,सर्जनशीलता वाढवणे त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळा ग्रामीण भागात जागतिक दर्जाच्या बनतील आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या तुलने त्यांचा नावलौकिक वाढेल. श्री राजाभाऊ देशमुख यांचा शिक्षक सक्षमीकरणावर दृढ विश्वास आहे त्यांच्या मते शिक्षक शिक्षणाचा कणा आहे आणि त्यांना नव्या तंत्रज्ञाची साधने देऊन आपण त्यांचे समर्थ्य वाढू शकतो. यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे संचलन माधुरी देशमुख प्रस्तविक विनोद तिरमारे तर आभार डॉ. तुषार देशमुख यांनी मानले.यावेळी संस्थेतील मुख्याध्यापक शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## संस्कार शिबिरातूनच व्यक्तीमत्व घडते–डॉ.राजरत्न आंबेडकर

अजिंक्य भारत। संजय सरवटकर

**बिहाली (मेळघाट), दि. १९ :** माणसाचा सर्वांगीन विकास घडवून आणायचा असेल व आपलं अष्टपैलू व्यक्तीमत्व तयार करायचं असेल तर ते संस्कार शिबिरातूनच तयार होते म्हणून आपण भारतीय बोद्ध महासभेच्या माध्यमातून गावागावत असे विधी संस्कार शिबीर राबवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असणारा समाज घडवायचा आहे. व हे सर्व संस्कार शिबिरातूनच घडत असल्याचे मत डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी शुक्रवार, १६ लां बिहाली (मेळघाट) ता चिखलदरा येथील निसर्गरम्य ठीकाणी असलेल्या अचलभूमी धम्म



प्रशिक्षण शिबीर केंद्रात मांडले. भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र राज्य द्वारा येथे तीन दिवसीय विधी संस्कार मार्गदर्शन शिबीर आयोजित केले होते. या शिबिराचा समारोह डॉ. राजरत्न आंबेडकर यांच्या अध्यक्षते खाली. राहुल शेंडे, शशिकांत जाधव, विजय बनसोड, राजूभाऊ जाधव, पत्रकार, मनोज मेळे, रत्नाकर वाहने, अरुणा इंगळे यांच्या राजेंद्र छापाने, रविकांत गवई, शिरीष गवई, इंगोले, सिध्दार्थ सावळे, रमेश सावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या तीन दिवासीय निवासी शिबिरात राज्यभरातून असंख्य शिबिरार्थी सहभागी झाले होते. याप्रसंगी अचलपूर युनिट च्या वतीने संविधान उध्येशीकेचे वाटपही करण्यात आले असून प्रत्येक जिल्हा युनिटच्या प्रतिनिधिने शिबिरात आलेले अनुभव आपल्या मनोगतातून व्यक्त केले. या तीन दिवशीय संस्कार शिबिरात, लग्न विधी, गृह प्रवेश विधी, साखरपुडा विधी, व अनेक विधीचे प्रशिक्षण देऊन संचालक तयार करण्यात आले कार्यक्रमाचे संचालन शशिकांत जाधव यांनी तर आभारप्रदर्शन भारतीय बौध्द महासभेच्या महाराष्ट्र प्रदेश अध्येक्षा संगीता इंगळे यांनी केले.

## आचार्य पदवी कोर्सवर्क परीक्षेसाठी अर्ज प्रक्रिया

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १९ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने आचार्य पदवी (पीएच.डी.) कोर्स वर्क परीक्षेच्या प्रक्रियेची घोषणा केली आहे. विद्यापीठाने यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून, शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या संशोधन विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. विद्यापीठाने जारी केलेल्या माहितीनुसार, इच्छूक आणि पात्र संशोधन विद्यार्थी २२ मे, २०२५ पर्यंत आपले परीक्षा अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करू शकतील. अर्ज प्रक्रिया आणि शुल्क आचार्य पदवी कोर्स वर्क परीक्षेसाठी अर्ज शुल्क रु. ५००/- निश्चित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी आपले परीक्षा अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील स्टुडंट लॉगीन मधून भरायचे आहेत. नियमित विद्यार्थ्यांनी एक्झॅमिनेशन फॉर्म फॉर रेग्युलर स्टुडंट समर २०२५ हा पर्याय निवडावा. त्यानंतर कोर्स टाईप मध्ये पी.एच.डी. कोर्स, मध्ये फॅकल्टी, सेमिस्टरमध्ये कोर्स वर्क आणि नेम ऑफ कॉलेज/इन्स्टिटुटमध्ये कॉलेज तसेच स्टुडंट टाईपमध्ये रेग्युलर सिलेक्ट करून पुढील प्रक्रिया करावी. अनुत्तीर्ण (फेल्युअर/ माजी / बॅकलॉग) विद्यार्थ्यांनी एक्झॅमिनेएशन फॉर्म फॉर बॅकलॉग स्टुडंट समर २०२५ हा पर्याय निवडावा आणि त्यानंतर नियमित विद्यार्थ्यांप्रमाणेच प्रक्रिया पूर्ण करावी.

## बेघरांच्या सर्वेक्षणाला ३१ मे पर्यंत मुदतवाढ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. १९ :** प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत सन २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीत समाविष्ट न झालेले परंतु सध्या स्थिती पात्र असलेल्या कुटुंबीयांना तसेच बेघर व कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबीयांना घरकुलाचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील ८४१ ग्रामपंचायत मध्ये एक ते ३० एप्रिल दरम्यान सर्वेक्षणाचे आदेश देण्यात आले होते. त्याला नंतर पंधरा दिवसाची मुदत वाढ देण्यात आली या दीड महिन्यात ४२ हजार १६५ लाभार्थ्यांचे संरक्षण पूर्ण करण्यात आले. त अद्यापही सर्वेक्षण शिल्लक असल्याने याला आता ३१ मे पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

जिल्ह्यात घरकुल मिळण्याकरता २०१८ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले होते. यात मोठ्या प्रमाणात लाभार्थी समाविष्ट झाले असली तरी बहुतांश लाभार्थी पात्र असताना सुटल्याची देखील ओरड झाली. दरम्यान कित्येक लाभार्थ्यांनी घरकुलाकरिता मागणी केली. परंतु त्यांचे नाव यादीत नसल्याने त्यांना घरकुल देणे प्रशासनाकडून अशक्य होते त्यामुळे वंचित लाभार्थ्यांमध्ये रोष व्यक्त होत असताना शासनाकडून यंदा पंतप्रधान आवास योजना टप्पा दोन अंतर्गत सुमारे ५६ हजारावर घरकुल मंजूर झाले आहे. याच धरतीवर यादीतून सुटलेल्या लाभार्थ्यांना देखील लाभ देण्याकरिता अशा पात्र लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करून त्यांना यादीत समाविष्ट केले जात आहे. एक ते ३० एप्रिल दरम्यान गावस्थळावर ग्रामपंचायत अधिकारी यांना सर्वे क्षणाचे निर्देश देण्यात आले आहे. यापासून एकही लाभार्थी वंचित राहू नये याकरिता सर्वेक्षणाला १५ मे पर्यंत मुदत देण्यात आली होती. या दरम्यान जिल्ह्यात १३,१४९ लाभार्थ्यांनी सेल्फ सर्वे क्षण तर कार्यालयामार्फत २९ हजार सोळा लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. असे एकूण ४२,१६५ लाभार्थ्याचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे परंतु अद्यापही लाभार्थी शिल्लक असल्याने या सर्वे क्षणाला ३१ मे पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

## दर्जेदार व्हिडीओ निर्मिती स्पर्धेतील ४४ विजेत्या शिक्षकांचा सन्मान

### अमरावती पंचायत समितीचे आयोजन : बक्षिस व प्रमाणपत्राचे मान्यवरांच्या हस्ते वितरण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी





**अमरावती, दि.१९:** राज्यस्तरीय दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धेतील अमरावती पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद व खासगी शाळेतील विविध विजेत्या ४४ शिक्षकांना बक्षिस व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच याप्रसंगी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र विद्यार्थी व शिक्षक यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन तर, महावाचन उत्सवात प्रथम क्रमांक क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांचादेखील मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षिस देऊन सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद माध्यमिक मुलींची शाळा कॅम्प,अमरावती येथील सभागृहात बक्षिस वितरण व सत्कार सोहळ्याचे मंगळवारी करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे होते. प्रमुख उपस्थिती उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने यांच्यासह विस्तार आधिकारी संदीप बोडखे, अजित पाटील, सुधीर खोडे, गटसमन्वयक अफसर खान व सर्व केंद्र प्रमुख यांची उपस्थीती होती. शालेय शिक्षण विभागाच्या राज्य शैक्षणिक व संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे सन २०२३ ला इयत्ता पहिली ते बारावी व अध्यापक विद्यालय अशा सहा गटात तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर ही स्पर्धा घेण्यात आली होती. त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला. एकूण २८ विषयांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली होती. अमरावती पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद व खासगी शाळेतील शिक्षकांनी या स्पर्धेत मोठया संख्येने सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मीती स्पर्धेतील सर्व गटातील ४४ विजेत्या शिक्षकांचा प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यानंतर शिष्यवृत्ती परीक्षा २०२४-२५ मध्ये पात्र विद्यार्थी व शिक्षक यांची शाल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या सत्कार घेण्यात आला. तसेच महावाचन उत्सवमधे ज्या विद्यार्थ्यांनी क्रमांक पटकाविले अशा विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षिस देण्यात आले. यावेळी उपशिक्षणाधिकारी बुद्धभुषण सोनवणे यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. तर, गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांनी शिक्षक चांगले कार्य करत आहेत. असे कौतुकास्पद वक्तव्य करुन विद्यार्थी व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला सर्व सन्मानित शिक्षक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. गटसाधन केंद्राच्या विषय तज्ञ अल्का लुंगे, नलीनी गोरे, छाया मिरासे, सारिका काळे, कविता उघडे, वैशाली पाचकवडे, सचिन वानखडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन केंद्र प्रमुख नंदकिशोर झाकर्डे यांनी केले. अल्पोहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

**या शिक्षकांचा झाला सन्मान**

दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धेतील विजयी शिक्षकामधील विनायक लकडे, संगीता ठाकरे, असलम अब्दुल रशीद मोहम्मद, कुवरसिंह कासदेकर, अनूप डीके, वीना ठाकरे, तेजश्री निकम, सुनील साबले, रश्मि खाडे, विजया झाडे, विद्या डकरे, सुरभी अडवाणी, स्नेहा गवई, प्रणाली गाड़वे, योगिता डहाणे, सचिन अवघड, राजकन्या कावळे, विजया झाडे, अर्चना धाबे, संगीता बदुकले, मुकेश बिजवे, सरफराज दिदायत खान खान, वंदना मालधुरे, उषा तुंबडे, जयकुमार कांडलकर, सविता रामटेके, सतीश दुबे, तेजल मेहता, प्रमोद घरडे, प्रशांत डोंगरे, पवनकुमार आहूजा, सीमा तिखे, कृष्णा पाल, श्रीकांत लाजुरकर, अतुल ठाकरे, हरीश लड्डा, कविता वऱ्हाडे, सुमती सोनेकर या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

**विद्यार्थ्यांचाही गौरव**

शासनाकडून महावाचन उत्सव विविध गटातून विद्यार्थ्यांकरिता राबवण्यात आला होता. वर्ग ३ री ते १२ वी च्या विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवून वाचलेल्या पुस्तकाच्या माहितीचे उत्कृष्ट लेखन केले. तसेच मुख्यकार्यपालन आधिकारी संजीता मोहपात्र यांच्या संकल्पनेतून शिष्यवृत्ती परीक्षेत सर्व शाळेतील वर्ग ५ वी व ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना परिक्षेला बसविण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे मोठया प्रमाणात शाळांनी १००% विद्यार्थी परीक्षेला बसविले होते. या परीक्षेत काही शाळांचे शंभर टक्के विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. म्हणून अशा शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव या कार्यक्रमात करण्यात आला.

## घटना - घडामोडी



### छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**नेर (परसोपंत) :** स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती येथे दि. १४ मे रोजी छत्रपती संभाजी राजे चौकात विविध सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. सार्वजनिक जयंती उत्सव समिती, भारत मुक्ती मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा, छत्रपती क्रांती सेना आदी संघटनांनी अनावश्यक खर्च टाळून विधायक उपक्रमांवर भर दिला. यावेळी दहावी परीक्षेत तालुक्यातून प्रथम आलेल्या प्रज्वल प्रदीप ढोरे व नव्याने नोटरी पद प्राप्त केलेले ?ड. रमेश जुनघरे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, छत्रपती संभाजी उत्सव समितीचे प्रमुख नितीन खैरे यांच्या पुढाकारातून गेल्या १५ वर्षांपासून सुरू असलेला ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे (पुस्तके, वह्या, कंपास, बॅग) मोफत वाटप करण्याचा उपक्रमही पार पडला. विचारवंतांनी आपल्या भाषणातून महापुरुषांचे विचार समाजात रुजवून त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव बगमारे, प्रास्ताविक दीपक शिंदे यांनी केले, तर सुनील गवई यांनी आभार मानले.



### गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**महागाव :** येथील लेवा ग्रामपंचायतीच्या वतीने शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये इयत्ता १०वी व १२वीच्या परीक्षेत यश मिळवलेल्या ५२ गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा नुकताच सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा माजी सरपंच श्रीराम दगडू खंदारे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते व मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव डॉ. संदीप शिंदे, दलितमित्र एस. टी. भगत, उपसरपंच दिलीप शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमापूजनाने झाली. प्रदीप देशमुख, किशोर खंदारे, डॉ. संदीप शिंदे, एस. टी. भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानपत्र, पेन, पुष्पगुच्छ व पेढे देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन अनिल देशमुख यांनी, तर प्रास्ताविक संजय देशमुख यांनी केले. सरपंच मुन्ना भगत, पोलीस पाटील गणेश देशमुख, सुभाष देशमुख, डॉ. ज्ञानेश्वर खंदारे, पंजाब देशमुख आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



### आश्रमातील वृद्धांना अन्नदान

**आर्णी :** काँग्रेस पक्षाचे माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांचे चिरंजीव तथा युवा नेते जितेंद्र मोघे यांचा वाढदिवस आज, सोमवारी (दि. १९) आर्णी येथे काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला. सर्वधर्म समभावाचे प्रतीक असलेल्या बाबा कंबलपोष दर्गा शरीफ येथे चादर चढवून व पुरातन महादेव मंदिरात पूजा-अर्चा करून कार्यक्रमांची सुरुवात झाली. यानंतर शिवाजीराव मोघे यांच्या जनसंपर्क कार्यालयात जितेंद्र मोघे यांना शुभेच्छा देण्यासाठी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. त्यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यात आले. तसेच, स्वर्गीय मातोश्री सुशीलाबाई नागपुरे रुद्र आश्रमातील वृद्धांना अन्नदान करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. या कार्यक्रमांना माजी नगराध्यक्ष अरीज बेग, राजू विरखडे, अनिल आडे, सुनील भारती, छोटू देशमुख, रवी नालमवार, संजय राऊत, प्रवीण मंदुलवार, परसराम राठोड, नरेश राठोड, अमोल मांगुळकर, पवन बजाज यांच्यासह काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अवैध रेतीची वाहतूक

**उमरखेड :** अवैध रेतीची वाहतुक करतांना आढळुन आल्याने कारवाई करण्यात आली. याप्रकरणी टाटा कंपनीचे टिप्पर वाहन क्र. एम.एच. ३ एम. ५०४० यामध्ये १ ब्रास रेती किंमत ५००० रूपयाची अवैधरित्या विनापरवाना चोरून घेवुन जात असतांना मिळून आल्याने रेती व वाहन जप्त करण्यात आली. याप्रकरणी सरतर्पेâ पोकॉ पवार यांच्या तक्रारीवरून शेख अरबाज अहमद हुसेन विरूध्द गुन्हा नोंद केला.

## निधन वार्ता

### अजय देशमुख



**यवतमाळ :** येथील बाजोरिया नगरातील रहिवासी अजय ओंकारराव देशमुख (वय ५७) यांचे रविवारी, दि. १८) रात्री निधन झाले. ते वाटखेड (खु.), ता. बाभूळगाव ग्रामपंचायतीचे सदस्य व माजी उपसरपंच होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी व भाऊ अमोल देशमुख (माजी सभापती, नगरपरिषद यवतमाळ) यांच्यासह मोठा आप्त परिवार आहे. पांढरकवडा मार्गावरील मोक्षधामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शहरात मान्सूनपूर्व कामांना प्रारंभ

## नगरपालिकेने शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उचलली पावले

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि. १९ :** आगामी मॉन्सूनच्या पार्श्वभूमिवर यवतमाळ नगरपरिषदेने शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी कंबर कसली आहे. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूरस्थिती आणि इतर समस्यांवर मात करण्यासाठी नगरपरिषदेने युद्धपातळीवर मॉन्सूनपूर्व कामांना सुरुवात केली आहे.

शहरातील प्रमुख नाले आणि लहान-मोठ्या गटारींची कसून साफसफाई केली जात आहे. अनेक दिवसांपासून साचलेला कचरा, प्लास्टिक आणि गाळजेसीबी आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने बाहेर काढला जात आहे, ज्यामुळे पावसाळ्यात पाणी तुंबण्याची समस्या उद्भवणार नाही. अनेक भागांमध्ये नाले कचऱ्याने आणि गाळाने पूर्णपणे भरले होते, ज्यामुळेपाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊन पाणी साचण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेऊन नगरपरिषदेने तातडीने सफाई मोहीम हाती घेतली आहे. काही ठिकाणी मोठ्या नाल्यांमधील गाळ काढण्यासाठी पोकलेन मशिनचा वापर केला जात आहे. अतिवृष्टीमुळे धोकादायक इमारती आणि पडक्या घरांचा भाग कोसळून कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी अशा मालमत्तांचे सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत. विद्युत सुरक्षा: शहरातील विद्युत खांब आणि तारांचीही तपासणी केली जात असून, धोकादायक ठिकाणी दुरुस्तीचे काम लवकरच पूर्ण केले जाईल. या मॉन्सूनपूर्व कामांचे महत्त्व अनमोल आहे. शहरात चांगल्या प्रकारे पाणी निचरा झाल्यास पावसाचे पाणी वेळेत निघून जाईल आणि यामुळे पूर येण्याची शक्यता लक्षणीयरीत्या कमी होईल. नाल्यांमध्ये साठलेला कचरा आणि गाळ पावसाळ्यात साथीच्या रोगांना आमंत्रण देऊ शकतो, त्यामुळे ही साफसफाई मोहीम शहरवासीयांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची आहे.

नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांनी सांगितले की, 'आम्ही मॉन्सूनपूर्व कामांना गांभीर्याने घेतले आहे. आमचे कर्मचारी दिवसरात्र काम करत आहेत, जेणेकरून पावसाळ्यापूर्वी शहरातील सर्व नाले आणि गटारी स्वच्छ होतील. नागरिकांनीही यात सहकार्य करावे आणि कचरा योग्य ठिकाणीच टाकावा, असे आवाहन आम्ही करतो.'

### नगरपरिषदेला सहकार्य करावे

**मॉन्सूनपूर्व कामांमुळे यंदा पावसाळ्यात शहराला पुराच्या आणि अन्य समस्यांच्या धोक्यापासून नक्कीच दिलासा मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. आता नागरिकांचीही जबाबदारी आहे की, त्यांनी शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नगरपरिषदेला सहकार्य करावे आणि पावसाळ्यात कोणतीही अडचण आल्यास तातडीने नगरपालिका प्रशासनाला माहिती द्यावी.**

# पुसदमध्ये राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसची तिरंगा सन्मान रॅली

## 'भारत माता की जय'च्या गजराने दुमदुमली नगरी



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि. १९:** राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने पुसद शहरात नुकतीच तिरंगा सन्मान रॅली काढण्यात आली. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्', 'भारतीय सैन्याचा विजय असो' अशा देशभक्तिपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

टिळक स्मारक येथून निघालेल्या या रॅलीचा समारोप वसंतराव नाईक चौक येथे करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी, जात-धर्म-पंथ विसरून आपण सर्व प्रथम आणि अंतिमतः भारतीय आहोत, ही जाणीव प्रत्येक नागरिकाने कठीण प्रसंगात जगाला दाखवून द्यावी, असे मत व्यक्त केले. या तिरंगा सन्मान रॅलीमध्ये पुसद शहर व ग्रामीण भागातील विविध क्षेत्रांतील युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### शिवणकला प्रशिक्षण शिबिर

**मारेगाव, दि.१९:** तालुक्यातील (किन्ही) जवादे येथील महिलांना सक्षमीकरण करण्यासाठी शिवणकला प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. एक महिनाभर हे प्रशिक्षण चालणार आहे. यापूर्वी असे प्रशिक्षण शिबिर घेऊन ४० महिलांना डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जनवन विकास समितीमार्फत ७५टक्के अनुदानावर शिलाई मशिन उपलब्ध करून देण्यात आली. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन सरपंच सुधीर पाटील जवादे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी कल्पना वाडगुरे , दुर्गा वडते, माला लोणबले, प्रियांका उईके, ग्रामपंचायत उपसरपंच रमेश तलांडे, सदस्य प्रसाद निकुरे, प्रतिभा मोहर्ले, सीमा उईके, सुषमा जवादे, सचिव राजू निवल, राजू मोहुर्ले, किशोर गमे, पवन खैरकार, आत्माराम गानफाडे, नरेश ठाकरे, पुंडलिक लोणबले, मारुती विठाळे आदी उपस्थित होते.

# बिबट्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ

## सावळी वनपरिक्षेत्र परिसरात ट्रॅप कॅमेऱ्यांव्दारे गणना

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**सावळी सदोबा, दि. १९ :** दक्षिण आर्णी वनपरिक्षेत्रातील सावळी सदोबा आणि परिसरातील जंगलांमध्ये गेल्या तीन वर्षांत बिबट्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे वनविभागाच्या ताज्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने ही बाब अत्यंत आशादायक मानली जात आहे. विशेषतः तुलनेने विरळ जंगल असलेल्या या भागात वन्यजीवांची वाढती उपस्थिती सुखावणारी आहे.

वनविभागाने रात्रीच्या वेळी लावलेल्या ट्रॅप कॅमेऱ्यांच्या मदतीने ही गणना केली. बिबट्यांची वाढलेली संख्या जंगलातील परिसंस्थेची सुधारत असलेली स्थिती दर्शवते. २०२५ मध्ये पाळीव प्राण्यांवरील हल्ल्यांच्या वाढलेल्या घटनांवरूनही बिबट्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे संकेत मिळत असल्याचे अहवालात म्हटले आहे. तथापि, या गणनेत इतर वन्यप्राण्यांच्या हालचाली फारशा आढळून आलेल्या नाहीत, जी चिंतेची बाब आहे. काही ठिकाणी वाघाचेही संकेत मिळाले, परंतु बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी (१२ मे) ढगाळ वातावरण आणि अंधार असल्याने त्यांच्या हालचाली कॅमेऱ्यात कैद होऊ शकल्या नाहीत, त्यामुळे वनप्रेमींची काहीशी निराशा झाली. वन्यजीवांचे संवर्धन आणि त्यांच्या अधिवासाची सुरक्षितता वाढवण्यासाठी प्रशासन व स्थानिक नागरिकांनी अधिक सक्रिय होण्याची गरज या अहवालातून अधोरेखित होते. नुकत्याच पार पडलेल्या व्याघ्रगणनेदरम्यान, दक्षिण आर्णी वनपरिक्षेत्रातील अंजनखेड, सावळी सदोबा व बेलोरा या वर्तुळांमध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी चंदू गावंडे यांच्या नेतृत्वात चार मचाण उभारण्यात आले होते. यावेळी वनपाल अनंत कोरडे, घोडमारे, धुर्वे तसेच वनरक्षक मंजलवाड, गोहकार, नाटकर, भिमटे, मेटकर, ढेपले, शिंदे, फड, तंगडवार व इतर कर्मचाऱ्यांनी गणनेचे काम पाहिले.

# जिल्ह्यात वाळूतस्करी जोरात

## अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष; विभागीय आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली?

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. १९ :** विभागीय आयुक्तांनी वाळू चोरी रोखण्याचे कठोर आदेश देऊनही यवतमाळ जिल्ह्यात, विशेषतः आर्णी तालुक्यात, वाळू तस्करांचे चांगलेच फावले आहे. राणी धानोरा येथे पैनगंगा नदीपात्रात नवीन रेती घाट तयार झाला असून, शिवण, दातोडी, चिमटा या घाटांवरही मोठ्याप्रमाणात अवैध उपसा सुरू आहे.

विभागीय आयुक्त सिंघल यांनी २ मे रोजीच्या बैठकीत वाळूचोरी आढळल्यास संबंधितांवर एमपीडीएअंतर्गत कठोर कारवाईचे निर्देश दिले होते. मात्र, या आदेशांना जिल्ह्यात केराची टोपली दाखवली जात असल्याचे चित्र आहे. आर्णी तालुक्यातील राणी (धानोरा) येथील नवीन घाटावरून दिवसाढवळ्या ट्रॅक्टर व टिप्परद्वारे वाळूची खुलेआम वाहतूक सुरू आहे. पारवा आणि आर्णी पोलिस ठाणे हद्दीतील इतर घाटांवरही तस्कर सक्रिय आहेत. यवतमाळ शहरात मोठ्याप्रमाणात बांधकामे सुरू असून, रात्रीच्या वेळी या बांधकामांवर ही अवैध वाळू टाकली जाते. शहरात अनेक ठिकाणी वाळूचे ढिगारे दिसून येत असून, या तस्करीत अनेकांचे हात ओले असल्याचा गंभीर आरोप नागरिक करत आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे, आयुक्तांच्या सूचनेनंतरही अद्याप एकाही तस्करावर एमपीडीएअंतर्गत कारवाई झालेली नाही. आर्णी तालुक्यात रात्री मजुरांच्या साहाय्याने रेतीचा उपसा करून ती शेतात साठवून विकली जाते. पारवा पोलिस ठाणे हद्दीतील चिमटा घाटावरील रेती अनेक ठिकाणी साठवलेली असतानाही घाटंजीचे तहसीलदार व पारवा ठाणेदार कारवाई करत नसल्याचे बोलले जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांचे पालन होत नसल्याने वाळू तस्करी नियंत्रणाबाहेर गेली असून, शासनाचा महसूल बुडत आहे, पर्यावरणाची हानी होत आहे. आता जिल्हा व पोलिस प्रशासन काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

### रेती वाहतूक करणारा टिप्पर जप्त

**यवतमाळ, दि. १९ :** येथील वडकी परिसरात शासकीय परवानगीशिवाय अवैधपणे रेतीची वाहतूक करणाऱ्या टिप्परवर पोलिसांनी कारवाई केली. याप्रकरणी एमएच २९ टी ०९४३ क्रमांकाचा टिप्पर व त्यातील सुमारे तीन ब्रास रेती (अंदाजित किंमत २,४०० रुपये) जप्त करण्यात आली असून, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी सुरज रामजी सुरपाम आणि फिर्यादी पोलिस हेडकॉन्स्टेबल किन्नाके आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गस्तीवर असताना सदर टिप्परमधून रेतीची वाहतूक होत असल्याचे आढळले. चालकाकडे चौकशी केली असता, अधिकृत परवाना किंवा रॉयल्टी पावती आढळली नाही. ही रेती चोरीची असल्याच्या संशयावरून वाहन व रेती जप्त करण्यात आली. किन्नाके यांच्या तक्रारीवरून सुरपामविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू आहे.

# विजेच्या धक्क्याने माकडाचा मृत्यू

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १९ :** महाजनवाडी येथील जुन्या पंजाब नॅशनल बँकेच्या बाजूला असलेल्या हाय व्होल्टेज इलेक्ट्रिक डीपीवर विजेचा धक्का लागल्याने माकडाचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती सचिन येवले यांनी दिली. रेंज फॉरेस्ट ऑफिसर अमर सिडाम यांनी तत्काळएम. एच.२९ हेल्पिंग हॅन्ड वन्यजीव संस्थेचे अध्यक्ष नीलेश मेश्राम यांना माहिती दिली. त्यांच्या चमूने घटनास्थळी धाव घेतली. मृत माकडाला दक्षतेने बाहेर काढले. या अभियानात अजित गजभिये, जुनेद मलनस, शुभम तेलगोटे, महेश शेळके, बॉबी बगमारे, श्रेयश साकरगे आणि प्रा. पंढरी पाठे यांची उपस्थिती होती.

# महसूल आणि कृषी विभागाची माहिती आता एका क्लिकवर

## 'शासन आपल्या मोबाईलवर' : पालकमंत्र्यांच्याहस्ते शुभारंभ, जिल्हाधिकाऱ्यांची संकल्पना

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि. १९ :** शासकीय योजनांची किचकट माहिती आणि किचकट प्रक्रिया सुलभ करण्यासाठी यवतमाळ जिल्हा प्रशासनाने 'शासन आपल्या मोबाईलवर' हा अभिनव यु-ट्यूब चॅनल उपक्रम हाती घेतला आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांना घरबसल्या शासकीय कामकाजाची माहिती मिळत असून, नुकताच पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते यामध्ये कृषी विभागाच्या विशेष माहितीचा समावेश करण्यात आला.

सोमवारी (दि. १९) महसूल भवन येथे पार पडलेल्या कार्यक्रमात पालकमंत्री संजय राठोड यांनी या कृषी विषयक उपक्रमाचे उद्घाटन केले. यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. 'शासन आपल्या मोबाईलवर' या यु-ट्यूब चॅनलच्या माध्यमातून प्रशासनाने विविध शासकीय विभागांच्या योजना, कायदे आणि कार्यपद्धती यांची माहिती सोप्या व्हिडीओ स्वरूपात नागरिकांपर्यंत पोहोचवण्यास सुरुवात केली आहे. महसूल विभागाशी निगडित जमिनीची नोंदणी, फेरफार, अकृषक परवानगी, विविध शासकीय दाखले, वनहक्क कायदा, शिधापत्रिका, सातबारा, वारस नोंदी, भूसंपादन, मतदार नोंदणी, नैसर्गिक आपत्तीतील मदत, जन्म-मृत्यूची उशिरा नोंदणी, शेती खरेदीतील दक्षता आणि गौणखनिज यांसारख्या अनेक महत्वपूर्ण विषयांवरील माहितीचा खजिना या चॅनलवर उपलब्ध आहे. आता खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाचा समावेश झाल्याने शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि योजनांची माहिती सहज मिळणार आहे. पालकमंत्री संजय राठोड यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना, सर्वसामान्यांना योजनांची माहिती नसल्याने ते लाभापासून वंचित राहतात, ही खंत व्यक्त केली. त्यामुळे अशा उपक्रमांतून सोप्या भाषेत माहिती देणारे व्हिडीओ अधिकाधिक प्रसारित करण्याची सूचना त्यांनी केली. अल्पावधीतच या उपक्रमाने मोठी झेप घेतली असून, विविध २४ महसूल विषयक आणि ९ कृषी विषयक व्हिडीओंमुळे ४५ हजारांहून अधिक नागरिकांनी याचा लाभ घेतला आहे, ही या उपक्रमाच्या यशस्वीतेची पावती आहे.

### तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर

**'शासन आपल्या मोबाईलवर' हा उपक्रम शासकीय माहिती सुलभ करण्यासाठी तंत्रज्ञानाचा उत्कृष्ट वापर दर्शवतो. यु-ट्यूबसारख्या लोकप्रिय माध्यमाचा वापर करून, जिल्हाधिकारी विकास मीना यांनी प्रशासकीय क्लिष्टता कमी करत थेट नागरिकांशी संवाद साधला आहे. विविध योजना आणि प्रक्रियांच्या माहितीचे छोटे व्हिडीओ बनवून लोकांपर्यंत पोहोचवण्याचे हे कार्य प्रशंसनीय आहे.**

### शेतकरी केंद्रित विशेष मार्गदर्शन

**खरीप हंगामाच्या तोंडावर कृषी विभागाचा या उपक्रमातील समावेश अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. माती परीक्षण, बीज प्रक्रिया, बियाणे खरेदी, सोयाबीन उगवण क्षमता चाचणी, सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग, रुंद वरंबा सरी लागवड, हुमणी अळी व्यवस्थापन आणि फळबाग लागवड योजनांसारख्या विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन आता शेतक?यांच्या मोबाईलवर उपलब्ध झाले आहे.**

# हिवऱ्यात विजेचा उद्रेक; कर्मचारी कोंडले

## ग्रामस्थ संतप्त; महावितरणच्या मनमानीला चाप; अनियमित पुरवठ्याने नागरिक हैराण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ विनोद कोपरकर





**महागाव, दि.१९:** महावितरणच्या गेल्या अनेक दिवसांपासूनच्या अनियमित वीजपुरवठ्याला आणि मनमानीला कंटाळलेल्या हिवरा (संगम) येथील ग्रामस्थांचा संताप अखेर सोमवारी (दि. १९) अनावर झाला. संतप्त ग्रामस्थांनी महावितरणच्या कर्मचाऱ्यांना थेट ग्रामपंचायत कार्यालयात सुमारे दोन तास डांबून ठेवत आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या. कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय वीजपुरवठा खंडित करणे, भारनियमनाचे अघोषित वेळापत्रक आणि त्यामुळे दैनंदिन जीवनावर होणारे गंभीर परिणाम या विरोधात हा उद्रेक झाला.

अनंतवाडी उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या हिवरा (संगम) आणि परिसरातील नागरिक मागील अनेक महिन्यांपासून विजेच्या लपंडावाने त्रस्त आहेत. वारंवार निवेदने देऊन आणि अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊनही परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याने ग्रामस्थांच्या सहनशक्तीचा अंत झाला. रविवारी रात्री हिवरा परिसरात सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस कोसळला. त्यानंतर नेहमीप्रमाणे वीजपुरवठा खंडित झाला. उन्हाळ्यातील प्रचंड उकाड्यामुळे गावकरी मोठ्याप्रमाणात हैराण झाले होते. वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी लाइनमन सतीश जाधव यांना गावकऱ्यांनी फोनवर संपर्क केला, परंतु त्यांनी आपला फोन स्वीच ऑफ करून ठेवला, परिणामी गावकऱ्यांना संपूर्ण रात्र उघड्यावर काढावी लागली. सोमवारी, दुपारी ३ वाजताच्या सुमारास लाइनमन सतीश जाधव आणि वीज वितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ बंडू भांडवले हिवरा (संगम) येथे दाखल होताच ग्रामस्थांचा पारा भडकला. वीज कर्मचाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती करत गावकऱ्यांनी त्यांना गराडा घातला. संतापलेल्या गावकऱ्यांनी या दोन्ही विद्युत कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायत कार्यालयात डांबले. कार्यालयाला बाहेरून कुलूप लावून गावकऱ्यांनी आतील वीजपुरवठा बंद केला. वीजपुरवठा खंडित असताना बंद खोलीत बाया बापड्यांचे व आबाल वृद्धांचे कसे हाल होतात याची जाणीव विद्युत कर्मचाऱ्यांना व्हावी, हा यामागे गावकऱ्यांचा उद्देश होता. विद्युत कर्मचाऱ्यांना जवळपास दीड तास ग्रामपंचायत कार्यालयात डांबून ठेवण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच महागाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मिलिंद सरकटे हे पोलिसांची कुमक घेऊन हिवरा येथे पोहचले. पोलिसांनी ग्रामपंचायत कार्यालयाचे कुलूप फोडत डांबून ठेवलेल्या विद्युत कर्मचाऱ्यांची सुटका केली. यावळी संतप्त नागरिकांनी पोलिसांवरही प्रश्नांची सरबत्ती केली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### लाइनमनवर गावकऱ्यांची नाराजी

- लाइनमन सतीश जाधव यांच्या कार्यप्रणालीवर हिवरा येथील बहुतांश नागरिकांची नाराजी आहे. सतीश जाधव हे नेहमीच कामात दिरंगाई करतात. विद्युत बिघाड झाल्यास तत्परतेने दुरुस्त करत नाहीत. गावकऱ्यांच्या समस्यांना प्रतिसाद देत नाहीत. गावकऱ्यांनी फोन केला तर तो रिसीव्ह करत नाहीत, अशा त्यांच्याबाबत अनेक तक्रारी आहेत. काल रात्रीही त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही, त्यामुळे त्यामुळे रात्रभर नागरिकांना अंधार आणि उकाड्याचा सामना करावा लागला. त्यामुळे लाइनमन सतीश जाधव आज गावात येताच नागरिकांच्या संतापाचा भडका उडाला आणि ही घटना घडली.

### अधिकाऱ्यांचा पोलिस ठाण्यात ठिय्या

- दोन विद्युत कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायत कार्यालयात डांबण्यात आल्याचे पडसाद संपूर्ण जिल्ह्यात उमटले आहेत. विद्युत वितरणचे वरिष्ठ अधिकारी आणि वर्कर फेडरेशनचे पदाधिकारी यांनी महागाव पोलिस ठाण्यात ठिय्या मांडला आहे. विद्युत वितरणचे पुसद येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता अफसर खान, गुंज येथील कनिष्ठ अभियंता विश्वजित कदम, फुलसावंगी येथील कनिष्ठ अभियंता बाळू राठोड, वर्कर फेडरेशनचे जिल्हा सचिव प्रशांत गिरी, अतुल नेरकर, विजय कांबळे, प्रफुल्ल शिंदे यांच्यासह अनेक कर्मचारी महागाव पोलिस ठाण्यात पोहोचले असून तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. संबंधितावर एफआयआर दाखल करून, जिल्हा बंद आंदोलन करण्याची भूमिका वर्कर फेडरेशनच्या वतीने घेण्यात येईल असे संकेत आहेत.

## थोडक्यात

### अपघातात इसम जखमी

**दारव्हा :** अपघातात इसम जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी दारव्हा येथे वाहन क्र. एम.एच. २९ सी.डी. ०८७३ ने येत असतांना तरोडा गावाचे जवळ आरोपी प्लॅटीना दुचाकी क्र. एम.एच. २९ वाय ९५४ च्या चालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन दुचाकीला धडक दिल्याने अपघात होवून इसम गंभिर जखमी झाला. चालकाविरूध्द गुन्हा नोंद केला.

### टिप्परच्या धडकेत युवक जखमी

**आर्णी :** टिप्परच्या धडकेत युवक जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी आर्णी वरून देवगाव येथे दुचाकी क्र. एम.एच. सी.क्यु १८४१ ने येत असतांना टीप्पर वाहन क्र. एम.एच. ०५ ए.एम. ९८९७ च्या चालकाने वाहन निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मुलाचे दुचाकीला धडक दिल्याने युवक जखमी झाला.

### ॲटोच्या अपघातात इसम जखमी

**महागाव :** ॲटोच्या अपघातात इसम जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी ॲटो वाहन क्र. एम.एच. ०४ ए.एक्स ३४१५ हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने आरोपीचे वाहनावरील नियंत्रण सुटून वाहन पलटी होवून अपघात झाल्याने आरोपीच्या डोक्याला, छातीला तसेच दोन्ही हाताला मार लागुन जखमी झाले. याप्रकरणी सरतर्पेâ पोहेकॉ येडतकर यांच्या तक्रारीवरून प्यारेलाल किसन पुरी विरूध्द गुन्हा नोंद केला.

## CAPTION — उंट की सवारी...



**यवतमाळ :** उंटाला वाळवंटातील जहाज असे संबोधले जाते. राजस्थान, गुजरातच्या सीमावर्ती भागात उंट व्यवसायाचे महत्त्वाचे साधन आहे. परंतु, अलीकडे उन्हाळ्यात पाणी व चाऱ्याच्या शोधात उंट विदर्भात येतात. उंटावर बसण्याची मजा काही औरच असते, म्हणून सारवान गावात उंटावर बसून सवारी घडवून आणतात. यातून त्यांना चार पैसेही मिळतात. आपल्या चिमुकल्याला उंटावरील सवारीचा आनंद घडवून आणताना येथील अवधूतवाडीतील प्रतिष्ठीत नागरिक हिमांशू शाह.

## पिंपळगाव शिवारात वीज पडून शेतकरी महिलेचा मृत्यू

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**महागाव, दि.१९:** तालुक्यातील पिंपळगाव शिवारात आज, सोमवारी (दि. १९) दुपारी चार वाजताच्या सुमारास शेतात काम करत असलेल्या एका शेतकरी महिलेचा अंगावर वीज पडून तिचा मृत्यू झाला. विमल किसन भिसे (वय ३५) असे मृत महिलेचे नाव आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसासह विजांच्या कडकडाटाने दुर्घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विमल भिसे या आपल्या शेतात काडीकचरा गोळा करण्याचे काम करत होत्या. त्यावेळी अचानक आलेल्या जोरदार पावसासह विजांचा कडकडाट सुरू झाला. यातच एक वीज थेट विमल यांच्या अंगावर कोसळल्याने त्या जागीच ठार झाल्या. या घटनेमुळे पिंपळगाव परिसरात शोककळा पसरली आहे. अवकाळी पावसामुळेउन्हाळी पिकांचेही नुकसान होत असून, वीज पडण्याच्या वाढत्या घटनांमुळे शेतात काम करणाऱ्या मजुरांमध्ये भीतीचे वातावरण आहे. घटनेची माहिती मिळताच तहसील कार्यालयाच्या महसूल अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

## घरातून मोबाईलसह रोकड लंपास

**पांढरकवडा, दि. १९ :** मोबाईल व रोख लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी घराचा दरवाजा उघडा असल्याने घरात प्रवेश करून आरोपीने फिर्यादीच्या घरात प्रवेश करून डब्ल्यामध्ये ठेवलेले २०,००० व व्हिवो कंपनीचा मोबाईल असा एकुण २८,००० रूपयाचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी भारती बजरंग हेमके यांच्या तक्रारीवरून विजय उर्फ गोलु विकास तुमराव विरूध्द गुन्हा नोंद केला. गत काही दिवसांपासून चोरी, घरफोडी, जबरी चोरी आदी घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. त्यामुळे पोलिसांनी या घटनांकडे लक्ष देण्याची गरज आहे. नव्हेतर नागरिकांनीही काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. बाहेर जातेवेळी आपल्या घरातील मौल्यवान वस्तु व्यवस्थितपणे ठेवणे गरजेचे आहे.

## कृषी सहाय्यकांचे विविध मागण्यांसाठी धरणे

### जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; कृषी मंत्र्यांनी दिलेले आश्वासन विरले हवेत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.१९:** महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेने आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारी, (दि.१९) एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन केले. दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या विविध मांगण्यांचे निवेदन देण्यात आले.

यापूर्वी कृषी मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत संघटनेला विविध मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु त्याची पूर्तता न अद्याप झाली नाही. त्यामुळे कृषी सहाय्यकांना अखेर आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागला. यवतमाळ जिल्ह्यातील कृषी सहाय्यकांनी सोमवारी येथील बसस्थानका शेजारी असलेल्या लॉर्ड बुद्धा भवनात धरणे आंदोलन करीत आपल्या विविध मागण्या लावून धरल्या. त्यात कृषिसेवक कालावधी रद्द करून नियमित नियुक्ती देणे, कृषी सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी करणे, लॅपटॉप देणे, ग्रामस्तरावर कृषी मदतनीस देणे, निविष्ठा वाटपातील समस्यांचे निराकरण करणे, पदे वाढवून पदोन्नतीमधील अडचणी दूर करणे, पोकरा योजनेत समूह सहाय्यकांची पदे भरणे, एमआरईजीएस योजनेत लक्ष्यांक निश्चित करताना अडचणी विचारात घेणे, नैसर्गिक आपत्तीच्या पंचनाम्याबाबत कार्यपद्धती निश्चित करणे, सिल्लोड येथील घटनेतील दोषींवर कारवाई करणे, आस्थापना विषयक अडचणी सोडवणे, या प्रमुख मागण्या घेऊन आज धरणे आंदोलन करण्यात आले, यावेळी कृषी सहाय्यक हरीश रामटेके, सुदर्शन रामेलवर, देवेंद्र पांचभाई, जयवंत सावरकर, ज्ञानेश्वर गाडगे, राजाभाऊ ठाकरे, राजेश राठोड, प्रल्हाद बोइंवड, प्रवीण गोळे, सचिन भाग्यवंत, गणेश राठोड, प्रफुल्ल धुमाळ, राकेश अपल्लवड व विजय बठे आदी उपस्थित होते.

## पालिका निवडणुकीसाठी काँग्रेसची मोर्चेबांधणी

### आर्णी येथील बैठकीत नियोजनावर चर्चा; संघटनात्मक बळकटीकरण व एकजुटीवर भर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि.१९:** सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश दिल्याच्या पार्श्वभूमिवर, आर्णी नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी काँग्रेसने तयारी सुरू केली आहे. येथील धुमाजी नाईक मंगल कार्यालयात रविवारी तालुका व शहर काँग्रेस कमिटीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

माजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस शहरातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यकर्त्यांनी आपली मनोगते व्यक्त करत महत्त्वाच्या सूचना केल्या. निवडणुकीच्या दृष्टीने पक्षाची पुढील वाटचाल, संघटन मजबूत करण्यासाठी बूथ व वॉर्ड कमिट्यांच्या नियुक्त्या, तसेच वॉर्ड निश्चिती व आरक्षणानंतर उमेदवार व संभाव्य आघाड्यांबाबत योग्य वेळी निर्णय घेण्यावर चर्चा झाली. सध्या पक्ष म्हणून एकजुटीने कामाला लागण्याचा सूर उपस्थितांनी आळवला. शिवाजीराव मोघे यांनी मार्गदर्शन केले. तसेच, काँग्रेसचे विधानसभेचे उमेदवार राहिलेले जितेंद्र मोघे, माजी नगराध्यक्ष आरिफ बेग मिर्झा, डॉ. रामचरण चव्हाण, राजू गावंडे, देवानंद चांदेकर, राहुल मानकर यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहराध्यक्ष अमोल मांगुळकर व तुळशीदास मोरकर यांनी केले. माजी नगरसेवक छोटू देशमुख यांनी आभार मानले. बैठकीस तालुकाध्यक्ष सुनील भारती, माजी पं.स. सभापती राजू विरखेडे, माजी नगरपरिषद उपाध्यक्ष कादर इसानी, उमेश कोठारी, नरेश राठोड, नंदकिशोर राठी, अतुल देशमुख, यासीन नागानी, गफूर शाह, संजय ठाकरे, नाना बंगळे, प्रकाश अंदुरे, झाकिर सोलंकी, अतुल मुनगिनवार, खुशाल ठाकरे, शेख जाफर पेंटर, मकबूल शाह, इस्राईल शेख, पवन बजाज, सय्यद अय्यूब, अशोक अग्रवाल, जफर पठाण, प्रसेनजीत खंदारे, सिराज बैलीम, श्रीकृष्ण जावळकर, उस्मान गनी, जयराज मुनेश्वर, गजानन सुरटकर, दिलीप चव्हाण, दीपक देवतळे, कुणाल भगत, चिकू सय्यद, सचिन निकडे, अक्रम शाह, अकबर दौला खान, संजय राऊत व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ लवकरच आर्णीत



बैठकीत काँग्रेसचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ लवकरच यवतमाळ जिल्हा दौऱ्यावर येणार असून, ते आर्णी तालुक्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पदयात्रा करणार असल्याची माहिती देण्यात आली. या पदयात्रेच्या नियोजनावरही चर्चा झाली व सर्वांनी तयारीला लागण्याचे आवाहन करण्यात आले.

## एसटी महामंडळाच्या 'रातराणी' बसला ब्रेक

### लांब पल्ल्याचा रात्रीचा प्रवास थांबला, नागपूरहून रात्री एकही एसटी बस नाही

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ उमेश इंगोले

**यवतमाळ, दि.१९: महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने लांब पल्ल्यांच्या रात्री धावणाऱ्या लोकप्रिय 'रातराणी' बसेस बंद केल्याने सर्वसामान्य प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. एकेकाळी एसटीच्या वैभवात भर टाकणारी आणि प्रतिष्ठेची समजली जाणारी ही सेवा आता इतिहासजमा झाल्याने, महामंडळाच्या उत्पन्नात मोठी घट झाल्याची चर्चा आहे. विशेषतः राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर येथून इतर जिल्ह्यांमध्ये जाण्यासाठी रात्री एकही 'रातराणी' बस उपलब्ध नसल्याने प्रवाशांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागत आहे.**



### रातराणी : एसटीचा अभिमानबिंदू

- 'गाव तिथे एसटी'हे ब्रीद सार्थ करणारी 'रातराणी' बस एकेकाळी राज्य परिवहन महामंडळाचा अभिमानबिंदू होती. लांब पल्ल्याच्या रात्रीच्या प्रवासासाठी सुरक्षित, आरामदायी आणि वेळेची बचत करणारी म्हणून तिची ओळख होती. रात्रीच्या शांत वातावरणातील तिचा प्रवास अविस्मरणीय असे.

मागील अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या या रातराणी बसेस कोणत्याही ठोस कारणाशिवाय बंद करण्यात आल्या आहेत. याउलट, खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या रात्रीच्या बसेस मात्र सर्रास सुरू असल्याने प्रवाशांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे. नागपूरसारख्या महत्त्वाच्या शहरात कामानिमित्त येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना याचा सर्वाधिक फटका बसत असून, त्यांच्या वेळेचा आणि पैशांचा अपव्यय होत आहे. या निर्णयामुळे राज्यातील पर्यटन व्यवसायावरही नकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून येते. सात किंवा चौदा दिवसांच्या पास सवलतीमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रात्रीच्या वेळी लांब पल्ल्यांच्या बसेससाठी तासन्तास वाट पाहत बसावे लागते. रातराणी बसमुळे होणारी प्रवाशांची आर्थिक बचत आणि रात्रीच्या शांत वातावरणात मिळणारी आरामदायी झोप, स्थानक आल्यावर चहाचा आस्वाद घेणे, या सर्व गोष्टी आता केवळ आठवणीत उरल्या आहेत. 'प्रवाशांच्या सेवेसाठी'हे ब्रीदवाक्य असलेल्या महामंडळाने रातराणी बसेस बंद करून प्रवाशांना वाऱ्यावर सोडल्याची भावना जनसामान्यांमध्ये आहे. 'गाव तिथे एसटी' हे ब्रीद अभिमानाने मिरविणाऱ्या महामंडळाची ही कृती त्यांच्या ध्येय धोरणांशी विसंगत असल्याचे बोलले जात आहे. परिवहन मंत्र्यांनी या गंभीर बाबीची दखल घेऊन रातराणी बसेस पुन्हा सुरू कराव्यात, जेणेकरून महामंडळाच्या उत्पन्नात भर पडेल आणि प्रवाशांची सोय होईल, अशी जोरदार मागणी जोर धरत आहे.

## जिल्हा परिषदेच्या केंद्र प्रमुख पदोन्नती प्रक्रियेला स्थगिती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१८:** जिल्हा परिषदेची केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेची कार्यवाही सुरू होती. पदोन्नती नियमांचा भंग करून केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया शिक्षण विभागाकडून राबविली जात होती. त्यामुळे पदोन्नती प्रक्रियेत अन्याय होत असलेल्या पुरुषोत्तम मेश्राम यांच्यासह इतरांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, त्यानंतर न्यायालयाने जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या केंद्र प्रमुखाच्या पदोन्नती प्रक्रियेला २५ जूनपर्यंतची तात्पुरती स्थगिती दिली.

जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत केंद्रप्रमुख पदोन्नती गेल्या दोन महिन्यांपासून चालू झाली आहे. प्रत्यक्षात केंद्रप्रमुख पदोन्नती/करताना, १० जून २०१४ च्या अधिसूचनेनुसार विषयावर म्हणजेच भाषा, गणित, सामाजिक शास्त्रे अशा याद्या विषयवार करावयाच्या असताना वेतन्नोत्ती दिनांकापासून सेवाज्येष्ठता हा निकष लावून याद्या प्रकाशित केल्या, त्यामुळे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा शिक्षकांनी नागपूर उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर न्यायालयात १० जून २०१४ च्या अधिसूचनेच्या कलम (२) च्या उपकलम (४) वर अवलंबून जिल्हा परिषद सेवा नियम, २०१४ मध्ये सुधारणा करून, हा वकिलांचा युक्तिवाद आहे. याचिकाकर्त्यांसाठी विषयनिहाय विभागणी प्रदान करण्यात आली आहे आणि त्यानुसार पदोन्नती यादी तयार करण्यात आली आहे. ज्याकडे प्रतिवादींनी लक्ष दिले नाही.